मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८१


जा, मे-जून, जुलै-ऑ, स-ऑ, नो-डी — ५

[अनुक्रमणिका](#)

र्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(राष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

श्री पांडुरंग श्रावण गोरे




२५ अंक ९
नेवारी १९७१

वणी येथे ता. २५, २६ व २७ डिसेंबर रोजी भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या २९ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष.

अनुक्रमणिका

श्रीमंत माननीय आबासाहेब पारवेकर- देशमुख



संमेलनाचे स्वागताध्यक्ष

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] जानेवारी १९७१ [अंक ९

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर-१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पांडुरंग श्रावण गोरे : अल्प परिचय

श्री. वा. ना. देशपांडे

यवतमाळजवळ निळोणे नावाचे निसर्गरम्य खेडेगाव आहे. तेथील श्री. पांडुरंग श्रावण गोरे हे रहिवाशी होत. त्यांचा जन्म १९०५ मध्ये एका खानदानी मराठा कुळात झाला. इंग्रजी शिक्षणानिमित्त ते यवतमाळ येथे राहू लागले.

यवतमाळच्या त्या वेळच्या सरकारी हायस्कुलात मी शिकत असताना गोरे माझे वर्गबंधू होते. तेव्हा-पासून गेली पन्नास वर्षे आम्ही दोघे निकटचे मित्र आहोत. अभ्यासापेक्षा इतर पुस्तके वाचण्यावरच त्यांचा भर होता ! दहाव्या वर्गाची वार्षिक परीक्षा चालू असतांना माझ्या समोरच्या बाकावर बसलेले गोरे गडकऱ्यांचे नुकतेच प्रसिद्ध झालेले 'भावबंधन' वाचीत बसले होते ! लौकरच महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ सुरू झाली. तिच्या प्रभावामुळे गोरे यांनी दहाव्या वर्गातून शिक्षणास 'राम राम' ठोकला, तो कायमचा !

त्यांनी निळोणे येथे स्वतःची शेती करण्यास आरंभ केला. लेखणीप्रमाणे नांगर चालविण्यातही ते कुशल होते ! दुर्दैवाने त्यांच्या शेतीवर कर्जाचा बोजा होता. गोरे यांनी शेतात भरपूर घाम गाळूनही 'सावकारी पाशा'त शेती जाण्याची आपत्ति ते टाळू शकले नाहीत ! निळोण्याचे त्यांचे घर त्याच सुमारास अग्निमुखी पडले ! निरुपायाने त्यांना यवतमाळच्या तत्कालीन जिल्हा कौंसिलमध्ये नोकरी पत्करावी लागली ! तीतून ते काही वर्षांपूर्वी निवृत्त झाले. अलीकडे त्यांनी यवतमाळास स्वतांचे घर बांधले आहे.

प्रापंचिक अडचणींना सतत तोंड देत असतांना देखील गोरे यांचे वाचन–लेखन सुरूच होते. जुने मराठी वाङमय त्यांनी कसोशीने अभ्यासिले आहे. त्याचप्रमाणे, वऱ्हाडी बोलीचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला आहे. त्यांच्या लेखनावर त्या दोन्ही गोष्टींचा परिणाम झाला आहे. वऱ्हाडी बोलीतील सुंदर शब्द व वाक्प्रचार यांचा गोरे यांनी आपल्या लेखनात जितका उपयोग केला, तितका इतर कुणीच केला नाही, हे त्यांच्या लेखनाचे मुख्य वैशिष्टच होय.

आतापर्यंत गोरे यांचे, 'बोवडे बोल' 'वाणीचा हुरडा' व 'बोरकूट' हे तीन काव्यसंग्रह, 'वऱ्हाडी लोकगीते' हा लोकगीतसंग्रह व 'कात टाकलेली नागीण' ही कादंबरी असे पाच ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या पहिल्या व तिसऱ्या काव्यसंग्रहाला डॉ. वि. भि. कोलते यांची आणि दुसऱ्या काव्यसंग्रहाला प्रा. भ. श्री. पंडित यांची प्रस्तावना आहे.

गोरे यांची कविता विविध-विषयपर आहे. ती गेयही आहे. भाषा व वृत्त या दोहोंवर त्यांचे असामान्य प्रभुत्व आहे. शेतकरी जीवनाची सुख-दुःखे रंगविणे हे त्यांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्टच आहे. वऱ्हाडी बोलीने नटलेली त्यांची शेतकरी जीवनावरील किती तरी काव्ये उत्तमोत्तम आहेत. 'पाटलाची पोर' ('बोरकूट' क्रमांक ७०) 'साय' (कित्ता क्र. ९०) यासारख्या कविता अजरामर होणार आहेत.

'वऱ्हाडी लोकगीते'हा संग्रहही इतका बहुमोल आहे की गोरे यांनी तो एकच ग्रंथ प्रसिद्ध केला असता,

अनुक्रमणिका

तरी त्यांचे नाव वाङ्मयात नमूद झाले असते. या ग्रंथातील फारच थोड्या गीतांना गोरे यांनी सांधेजोड केला आहे. आणि, तीही त्यांची पदरची नसून लोकगीतातीलच आहे. काही थोडी गीते सलग मिळाली नाहीत, त्याचे अपुरे भाग भिन्न ठिकाणाहून मिळाले, यामुळे गोरे यांनी ते अपुरे भाग जोडले, एवढेच काय ते. प्रकाशकाच्या एका विधानावरून श्रीमती दुर्गा भागवत यांनी 'वऱ्हाडी लोकगीते' या संबंध ग्रंथालाच गौणत्व दिले, हा प्रकार उद्वेगजनक होय ! या ग्रंथाचे कच्चे हस्तलिखित गोरे यांनी दीर्घकाळ मजजवळ ठेवले होते व ते मी बारकाईने कैक वेळा वाचले होते. त्या आधारावरच मी हा खुलासा करीत आहे.

गोरे यांची 'कात टाकलेली नागीण' ही मला 'कादंबरी' या नात्याने बांधेसूद वाटली नसली, तथापि तीतील किती तरी भाग उत्कृष्ट गद्यकाव्य वाटतो. तिच्यातील वऱ्हाडी बोलीचा थाट व कैक वर्णने बहारीची आहेत.

गोरे स्वभावाने अतिशय उमदे व दिलदार आहेत. ते एरवी नम्र असले, तथापि प्रसंगोपात्त स्पष्टवक्तेही होऊ शकतात. विदर्भीय साहित्यिकांची प्रसिद्धीपराङ्मुखता त्यांच्यात पुरेपुर प्रमाणात वास करते.

अशी विविध स्वरूपाची व श्रेष्ठ दर्जाची साहित्यसेवा करणारे पां. श्री. गोरे यांची वणी येथील वि. सा. संघाच्या २९ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी निवड झाली, याबद्दल अतिशय आनंद होतो. गोरे माझे परममित्र आहेत, यामुळे तर हा आनंद द्विगुणित झाला आहे. 'रघुवंशा'च्या धर्तीवर 'शिववंश' नामक शिवाजीच्या घराण्यावरील महाकाव्य लिहिण्याची गडकऱ्यांची इच्छा होती, पण ती मूर्त रूपाला आली नाही. तसा प्रयत्न करण्याचा विचार फार पूर्वी गोरे यांनी माझ्याजवळ प्रदर्शित केला होता. तो विचार प्रत्यक्षात आणण्याचा त्यांनी अजूनही यत्न करावा, अशी त्यांना मित्रभावाने सूचना करतो.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

श्री. पां. श्रा. गोरे

—श्री. नारायण नागोराव हूड, यवतमाळ

प्रत्यग्र सौहार्द !

माझे मित्र श्री. पांडुरंग श्रावण गोरे यांना या वर्षीच्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला, याबद्दल मला अत्यानंद होत आहे. याचे कारण म्हणजे ते माझे परमप्रिय मित्र आहेत हे तर आहेच; पण त्याचबरोबर ते या पदाकरिता योग्य असे साहित्यिक असून संमेलनकार्याची धुरा वाहण्यास सर्वस्वी समर्थ आहेत.

अशी समजूत असते की जवळची जी व्यक्ती वा वस्तू असते तिचे गुण अतिपरिचयादवज्ञा या न्यायाने साधारणतः डोळयांत भरत नाहीत एखाद्या चित्राचे किंवा शिल्पाचे सौंदर्य यथातथ्य लक्षात येण्यास ते काही अंतरावरूनच पाहावे लागते; नाहीतर त्यावरील सौंदर्ययुक्त रेषा नेत्रोत्सव होण्याऐवजी त्याच्यावरील डागच आपल्या नेत्रांना खुपतात अजिठयाच्या लेण्यांत भिंतीवर रंगविलेली प्रचंड चित्रे जवळ जाऊन पाहिली तर रंगाचा केवळ जाडा लेप दिल्यासारखी वाटतात. चंद्रासारख्या मृत गोलावरील खडक व कुरूपता केवळ दूर अंतरावरून पाहिल्यामुळे नितांत सुषमेचे स्वरूप घेतात.

श्रीयुत गोरे हे हायस्कूलमध्ये असल्यापासून (जवळजवळ पन्नास वर्षांपासून) माझे एक घनिष्ठ मित्र आहेत. व्यवसायभिन्नत्वामुळे, नंतर आमच्या भेटीगाठी क्वचितच होत असत. परंतु दहा वर्षांपासून ते व मी वरेच जवळ आलो व गेल्या पाच-सहा वर्षांनंतर बहुतेक दोन-चार दिवसांनी आमच्या गाठी पडतातच; त्यावेळी बोलण्यात दोन-तीन तास कसे निघून जातात, हे कळतही नाही एकमेकांच्या साहित्याविषयी एकमेकास आतापर्यंत पूर्ण कल्पना झाल्यामुळे, आम्ही स्वतःच्या साहित्यावर क्वचितच वोलतो; पण इतर वाङ्मय व चर्चा बरीच होते. त्यांत काही स्थानिक गमतीही असतात. श्रीयुत गोरे हे आता नुसते उत्कृष्ट कवीच राहिले नाहीत; तर अनेक प्रकारच्या वाचनाने त्यांच्या ज्ञानात बरीच भर पडलेली असून ते विद्वानही होऊ लागले आहेत !

इतकी वर्षे इतक्या एकमेकांच्या सहवासात जवळून घालवूनही त्यांचे व्यक्तिमत्व व सौहार्द पूर्वीइतकेच प्रत्यग्र नूतन राहिलेले आहे. त्यांच्या आजपर्यंतच्या कवितांचा काव्यसंग्रह (काही थोडयाशा कविता वगळून) 'बोरकूट' हा नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. त्यासंबंधी थोर साहित्यिक श्री. वा. ना. देशपांडे म्हणतात, 'शेतकरी जीवनाची उत्कृष्ट चित्रे रंगविणारे गोरे हे मराठीतील एकमेव कवी आहेत. त्या दृष्टीने त्यांचा हा काव्यसंग्रह मराठी काव्यवाङ्मयात कायम राहणार आहे. 'पाटलाची पोर', 'साथ', 'अकारण' इत्यादी त्यांच्या कविता साहित्याची भूषणे आहेत. त्यांचे भाषाप्रभुत्व आश्चर्यकारक आहे.'

त्यांच्या पूर्वीच्या काव्यसंग्रहांबद्दल डॉ. अ. ना. देशपांडे यांनी सप्टेंबर-ऑक्टोबर १९४६ च्या 'युगवाणी'च्या अंकात खालीलप्रमाणे उद्गार काढलेले होते ! 'जीवननिष्ठ सांप्रदायात ज्याने आपल्या कर्तबगारीने हक्काचे आणि मानाचे स्थान मिळवून घेतले

आहे अशा एका कवीचा अत्यादरपूर्वक उल्लेख केला पाहिजे.' माझ्या विनम्र मुजऱ्यांचे धनी असलेले हे कवी दुसरे तिसरे कुणी नसून यवतमाळचे श्री. पांडुरंग श्रावण गोरे हे होत. खेडेगावातील सुखदु:खात्मक प्रसंगांत दिसून येणारी त्यांची भावोत्कटता नितांत रम्य आहे.

वरील रसिक विद्वानांची मते उद्धृत केल्यानंतर श्री. गोरे यांच्या काव्याच्या श्रेष्ठत्वाबद्दल विशेष लिहिण्याची जरूरी उरत नाही.

वर्डस्वर्थची वनकन्या

श्री. गोऱ्यांची कविता वाचताना माझ्यापुढे वर्ड-स्वर्थच्या 'The reaper' या कवितेतील निरागस वनकन्या उभी राहते.

'Behold her single.
In the field
You solitary
Highland lass
Alone she cuts
And binds the grain
And sings a
Melancholy strain
No nightingale
Did ever chant
More we'come notes
To the weary lands
Among Arebian sands!—

यावरून ती एकीकडे विफलतेची गीते गात असते, तर दुसरीकडे तिच्या गीतातून दुर्दम्य उत्साहाचाच ठेवा ऐकणाऱ्याला लाभत असतो.

त्या कवितेत वर्णन केल्याप्रमाणे श्री. गोरे यांच्या काव्यात भूतकालातील दुर्घटनांविषयी अगतिक हळहळ तर वर्तमानकालातील क्षुद्रतेविषयी काळवंडलेल्या खिन्नतेचे शब्द आहेत. तसेच भूतकालाविषयीचे जसे गौरवपर उद्गार आहेत, त्याचप्रमाणे वर्तमानकाला-संबंधीही स्पृहणीयतेचे आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी उज्ज्वल भावीकालासंबंधीही नव-आशेच्या भावना व्यक्त केल्या आहेत. प्लक्ष वृक्षाप्रमाणे त्यांची गीते एकीकडे खिन्नतेच्या विकलतेने ओथंबलेली असतात तर दुसरीकडे कदंब वृक्षाप्रमाणे उत्साहाच्या कणखर-तेने भरलेली दिसतात.

श्री. गोरे यांच्या काव्याचे पारडे वैफल्याची विफल गीते आळविण्यापेक्षा शृंगाराची प्रसन्न उल्हासयुक्त गीते गाण्याकडेच जास्त झुकते, हे वाचकास दिसून येईल.

'तो प्रसंग' या कवितेत—त्या बोरवनी हिरव्या कुरणीं—लवणाच्या गे कलत्या वळणीं—स्मरतो तो मज प्रसंग अजुनी... परंतु शंका—कुणि पाहिल का—तरी घेतला तुझा मी मुका—बावरली कशि नवाट हरिणी!' या ओळींत शृंगाराचा बराच मार्ग गाठलेला आहे. डॉ. कोलते यांनी या कविता लावणीवजा असल्या तरी त्यांत लावणी वाङ्मयातील उच्छृंखलता नाही. त्यांतील भावना उत्कट असूनदेखील त्याचे आविष्कार संयत शब्दांतून व्यक्त झालेले आहेत. त्यावरून श्री. गोरे ह्यांच्या सौंदर्यलोलुप पण निर्मल मनाची साक्ष पटते.' हे जे उद्गार 'बोरकूट'च्या प्रस्तावनेत काढले आहेत, ते अत्यंत मार्मिक वाटतात.

त्यांच्या ह्या प्रणयकवितांतील एखादीदुसरी काव्यपंक्ती—विशेषत: रानगीतातील हालाच्या सप्त-शतीतील एखाद्या दुसऱ्या लडिवाळ व सुकुमार काव्य-पंक्तीची सहज स्मृती जागृत करते.

इतकेच नव्हे तर त्यांनी काही थोड्या कविता 'गाव गाठ ते—चाल पुढे—लाव नजर गे पलीकडे', 'नजरे पुढून गेला' 'आता कधी', 'वंदना', 'सांजवात' इत्यादी कवितांत अलौकिकाच्या कल्पनेलाही स्पर्श केला आहे एक-दोन कवितांमध्ये त्यांनी 'जागवा सर्वत्र मानव्याचा मंत्र' असे म्हणून मानवतेची पूजा बांधली आहे.

याशिवाय 'उत्कंठा', 'पाटलाची पोर', 'उणीव', 'दळण' इत्यादी त्यांच्या कविता उत्कृष्ट असून त्यांतही विविध प्रकारच्या भावना खेळवलेल्या आहेत.

श्री. गोरे यांच्या साहित्यांत लोकानुगामी धर्तीच्या काव्यावर जास्त भर असला, तरी त्यात चिरलक्षी काव्य काही ठिकाणी आले आहे. वास्तववादाच्या मेघाला त्यांच्या काव्यात कित्येक ठिकाणी ध्येयवादाची चंदेरी किनार दृष्टीस पडते.

त्यांच्या 'सखा' म्हणून लौकरच प्रकाशित होणाऱ्या संग्रहात 'समाधान', 'हुरहूर', 'प्रयाण', 'ध्यास', 'वेडी' इत्यादी उत्कृष्ट कविता आहेत. मात्र त्यांच्या का—

क्षेत्र व आशय विनायक कवींच्या राष्ट्रीय काव्याप्रमाणे जानपद काव्यापुरताच बहुधा मर्यादित असला, तरी त्यात त्यांचे कर्तृत्व सर्वोच्च आहे यात शंका नाही.

श्री. गोरे यांची भाषा अत्यंत सफाईदार असून जवळ जवळ अत्रे किंवा विनायक ह्यांच्या भाषेइतकीच रेखीव आहे. आमच्या या बिचाऱ्या कवीस रसनिष्पत्ती करण्याकरिता मुक्तछंदाची, नवीन प्रतिकांची, तिरकस आशयाची, कशाला तरी कशाने छेद देण्याची, अरुंद रुंदीची व जाड-पातळपणाची वगैरे काहीच जरूरी भासली नाही. 'भूपति खरे ते', 'केशवकरणी', 'शार्दूलविक्रीडित', 'नृपममता' इत्यादींसारख्या साध्या छंदात व चालीत ते इतक्या लीलेने लिहितात की शृंगार, करुण इत्यादी रसांचा मूर्तिमंत आविष्कार अगदी सहजतेने होत जातो.

श्री. गोरे यांचे दुर्दैव असे की, त्यांचे पूर्वीचे तीनही काव्यसंग्रह 'बोवडे बोल', 'वाणीचा हुरडा', 'बोरकूट' यांच्या प्रती आज दुर्मिळ आहेत. 'बोबडे बोल'च्या काढलेल्या प्रती कमी म्हणून लवकरच संपल्या. तर 'वाणीचा हुरडा'च्या प्रती प्रकाशकाने आपल्याच प्रेस-मध्ये ठेवून दिल्या. 'बोरकुट'च्या प्रतीही प्रकाशकाकडून आजवर बाहेर आल्या नाहीत. तरीही त्यांच्या काव्याचा प्रसार जनतेत बराच झालेला आहे. यावरून त्यांच्या काव्यात श्रोते, वाचक, रसिक यांच्या अंतःकरणाची पकड घेण्याचे सामर्थ्य आहे, हेच प्रत्ययास येते.

त्यांच्या काव्याविषयी मी 'तरुण भारत'च्या दि. २३-२-६९ च्या अंकात लिहिलेले असल्यामुळे त्याची येथे पुनरुक्ती करीत नाही. या लेखात त्यांची 'कात टाकलेली नागीण' या कादंबरीचे दिग्दर्शन विशेषे-करून प्रस्तुत आहे.

स्वर्गीय देवता की वेश्या ?

'कात टाकलेली नागीण' या त्यांच्या कादंबरीत त्यांनी वऱ्हाडच्या इजारदार घराण्याचे जीवन चित्रित केलेले आहे.

बाळासाहेब नावाच्या इजारदाराने आपला बागवान हिंमतराव याच्या पत्नीचे जीवन बलात्कार करून उध्वस्त केले. त्यामुळे ती जातीबाहेर पडून प्रवाहपतित झाली; व पुढे योगायोगाने तिची अत्यंत श्रीमंत असलेली मावशी तिला भेटते व आपली अफाट इस्टेट तिला मृत्युपत्राने देते व नायिका मंजुळा (पुढे हिरकणी) ही समाजसेवेचे अखंड व्रत पत्करते असे या कादंबरीचे कथानक आहे.

या कादंबरीवर अनेक आक्षेप घेण्यासारखे आहेत. एक तर 'कात टाकलेली नागीण' या कादंबरीच्या नावावरून नायिका हिरकणी ही एक अदम्य उत्साहाने सळसळणारी, आपल्या स्वतःच्या कर्तृत्वाने विरुद्ध परिस्थितीवर मात करणारी अशा तऱ्हेची तिखट वृत्तीची तडफदार स्त्री आहे अशी वाचकांची समजूत होते.

पण ती तशी नसून अगदीच थंड प्रकृतीची स्त्री आहे. व कादंबरीत तिची स्वतःची कर्तबगारी अशी जवळ जवळ काहीच नाही. तिची मावशी तिच्या पुढील जीवनात भेटते व तिला इस्टेटीची मालकीण करते हा केवळ अद्भुत योगायोग आहे.

त्याचप्रमाणे या कादंबरीत अनेक लांबलचक संवाद, पाल्हाळिक निसर्गाची वर्णने, लांबलचक चर्चा व इतर अवांतर गोष्टी आल्यामुळे कथानकात गतिमानता येण्याऐवजी ठिकठिकाणी संथपणा आलेला आहे.

हे जरी कादंबरीत काही तांत्रिक दोष असले तरी नायिका हिरकणी ही मराठी कादंबरीसृष्टीत अगदी आगळ्या तऱ्हेची स्वतंत्र नायिका असून, ती आपल्या वैशिष्ट्याने नेहमीच तळपत राहील. ती कर्तृत्ववान नसेल व दुसरेही काही गुण तिच्या ठिकाणी नसतील; ती फक्त उदात्त आहे. जीवनामधील अत्यंत अकल्पित अशा दुःखपूर्ण घटनांतून भाजून निघणारी ती एक दुर्दैवी व प्रवाहपतित (काही काळ) दुर्दैवी स्त्री आहे.

खाऱ्या पाण्यातील मोती ज्याप्रमाणे गोडया पाण्या-तील मोत्यांपेक्षा तेजदार व सरस असतात त्याचप्रमाणे दुर्दैवाच्या चक्रात भरडल्या गेलेल्या या स्त्रीच्या व्यक्ति-मत्वावर उदात्ततेचे एक मनोज्ञ तेजोवलय निर्माण झालेले आहे.

ज्या नरपशूने तिला देशोधडीला लावले, त्याचे नाव माझे शरीर धडापासून वेगळे केले तरी मी सांगणार नाही, असा तिचा दृढनिश्चय आहे. तिने त्या वेळेला ते नाव जर सांगितले असते तर कदाचित तिला जमाती व गावाबाहेर पडण्याचा प्रसंग आला नसता आणि बाळासाहेबांच्या अब्रूचे दिवाळे वाजले

असते. ज्या बाळासाहेबाने तिला जीवनातून उठविले तो अधःपतित माणूस जेव्हा बऱ्याच काळाने तिला तिच्या ऐश्वर्यावस्थेत भेटला असता, ती त्याच्याबद्दल थोडाही द्वेष दाखवत नाही. जबरीसंभोगाचा परिणाम केवळ दारुण द्वेष असून देखील तिच्या मनात त्याचा प्रादुर्भाव होत नाही. उलट त्याला ती घरी राहाण्याचा प्रेमळ आग्रह करते. एवढेच नव्हे तर आपल्या स्वतःच्या इस्टेटीमधील अर्धा हिस्सा ती पुढे त्याच्या मुलाच्या नावाने करून देते.

'उज्ज्वल परिस भंगण्याकरिता लोखंडाचा त्यावर घाव घातला तरी, तो त्याचे सोनेच करतो.' असा सर्वोत्कृष्ट व हृदयस्पर्शी दृष्टांत देऊन लेखकाने नायिकेच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव पूर्णतया व्यक्त केला आहे.

'मानवजातीचे सातत्य टिकविण्याकरता स्त्रिया या आवश्यक आहेत. मानवजातीच्या ललाटावर सुख-दुःखांचा जो लेख लिहिलेला आहे, तो अटळ आहे. त्यागी देवता म्हणून स्त्रीने देखील त्या दुःखाचा मोठा वाटा उचलला पाहिजे' अशी तिची धारणा आहे. तिचा पती आजारी असताना 'तुमचं आयुष्य वाढण्याकरिता मी माझं आयुष्य आनंदाने देईन.' 'सोनबाजी माझा राम जवळ असता तर मी वल्कले नेसून देखील भयाण वनात आनंदाने दिवस काढले असते.' ही तिच्या मनाची विचारसरणी आहे.

बर्नार्ड शॉची कॅंडिडा ही हिरकणीपेक्षा निराळ्या प्रकारची स्त्री नायिका असली तरी एका बाबतीत मात्र त्या दोघींतही पूर्णपणे साम्य आहे. शॉच्या कॅंडीडेला ब्रिट्रियस वेब नावाच्या विदुषीने हीन मनोवृत्तीची वेश्या म्हणून संबोधिले आहे तर काही टीकाकारांनी तिला स्वर्गीय देवता (Super woman) असे गौरविले आहे त्याची येथे आठवण येते.

तिच्यावर बलात्कार झाला त्यावेळी तिची अगतिक स्थिती असल्यामुळे ती त्याला बळी पडली. त्याबद्दल तिला दोष देता येणार नाही. ही बलात्काराची घटना वाचकांच्या मनाला अतिशय धक्का देणारी आहे. नायिकेच्या कर्तृत्वामुळे कोणाच्या तरी अचानक मदतीमुळे किंवा परिस्थितीच्या अनुकूलतेमुळे हा प्रसंग टळला असता तर बरे झाले असते असे वाचकांस राहून राहून वाटते. नायिकेवरील दुसरा बलात्काराचा प्रसंग तर अजिबात आणावयास नको होता. पण कोणाची कितीही इच्छा असली तरी सत्य सृष्टीत मात्र असे विपरीत प्रसंग घडतातच. त्याला इलाज नाही.

बलात्कार न घडलेला दाखवूनही इजारदारांच्या घरी काय प्रकार चालतो, याची कल्पना वाचकांस आलीच असती व नायिकेची कर्तबगारीही थोडीशी दिसली असती. स्वतःवर बलात्कार झाल्यानंतर पुढेही बाळासाहेबांच्या बरोबर चविष्टपणे लीलाविलास करीत राहून त्याच्या दररोजच्या संगमाकरिता बेचैनपणे तळमळत राहण्याची नायिकेची वृत्ती पाहून वाचकांस अतिशय दुःख होते.

'मी तुमच्या आईला शेवटचे पाणी पाजून आपली अखेरचा इच्छा पुरी करीन' असे वचन दिल्यामुळे जरी तिला तिच्या समाजात मान्यता असलेल्या पाटाच्या रीतीचा फायदा घेता आला नाही व त्या बाबतीत ती इतकी कणखर राहिली. तिचे ते पुढचे वर्तन हे वेश्यावृत्तीचेच लक्षण नव्हे काय? तरी तिच्या कादंबरीतील वेळोवेळीच्या पुढच्या पराकाष्ठेच्या त्यागावरून ती स्वर्गीय देवतेचीच बरोबरी करीत असलेली दिसून येते.

इथे जाता जाता चंद्रकांत काकोडकर यांच्या 'तूच जीवाचा सखा' ह्या कादंबरीतील अनुराधा या नायिकेचा उल्लेख करावयास हरकत नाही. वेश्या असूनदेखील या दोन्ही स्त्रियांच्या मनोवृत्ती कधी कधी गरती स्त्रियांच्या आचरणापेक्षाही अधिक पवित्र वाटतात.

नैसर्गिक सृष्टचालोक !

ह्या कादंबरीत तथाकथित तंत्रे काटेकोरपणाने पाळली गेली नसली तरी, तीत ग्रामीण जीवनातील कडूगोड अनुभव, चालीरीती, जीवनातील बारकावे, (मद्यपान, उघळेपणा, भाऊबंदकी, शंकरपट, नाच-तमाशे, बाटलं वहाद्दरांच्या मर्कटचेष्टा) याचे एक वेगळेच दृश्य लेखकाने वाचकांसमोर उभे केले आहे. तसेच पानोपानी सुंदर उपमा, उत्प्रेक्षा, कल्पना, भावना, सुभाषिते, प्रास, अनुप्रास, वऱ्हाडी शब्द, वाक्प्रचार व म्हणी ह्यांची एवढी समृद्धी दिसून येते की वाचक जरासा स्तिमितच होतो. वऱ्हाडी म्हणी व वाक्प्रचार यांचा तीत संदर्भ कोश तयार झाला असून, वऱ्हाडी भाषेचे ऐश्वर्य व्यक्त झालेले आहे.

'भरल्या जगांत आशा व सफलता पुसवतीप्रमाणे नांदतात.' 'आयुष्यात अक्कल येते केव्हा? तर माणसाचे आयुष्य संपल्यानंतर' 'श्रीमंताची कृपा ही निव्वळ रसायनासारखी असते. रसायन पचले तर काया पालटते नाहीतर ते उलट अंगावर उतून निघते' 'इजारदाराच्या दमदाटीचा इंगा गावभर पिंगा घालत असल्यामुळे त्याच्या विरूद्ध दंगा करण्याचे अवसान गावकऱ्यांत मुळीच नव्हते.' 'पडला हस्त तर कुणबी झाला मस्त', 'आषाढांत तट, श्रावणात भट आणि आश्विनात कुणबट' इत्यादि हृद्य तत्त्वे गोरे सहज बोलून जातात. 'वय सतरात लाज नेत्रांत', 'बाप लेक मसाला एक' अशी कितीतरी अनुप्रासयुक्त वाक्ये विखुरलेली आहेत. 'भजन संपताच महाराजासंबंधीच्या जयघोषाने आकाशाच्या चिंधड्या उडाल्या.' 'ते हृदय-द्रावक दृश्य पाहून वडाच्या झाडांची सारी पाने फडफडली'; इत्यादी प्रभावी अभिव्यक्तीही आहे. नारायण हरिणीचा विनोद व हरिणीच्या तोंडचे गीत सूचक असून मंजुळेच्या मनात भयंकर खळखळ उडवणारे होते. कारण त्यावेळी ती गरोदर असते. त्याने वाचकाच्या मनांत खळखळ उडते.

श्री. गोरे यांचे अनुभव दत्तक नसून औरस असल्या-मुळे कादंबरी हृदयस्पर्शी झालेली आहे.

कादंबरीत बांधेसूदपणा नसला तरी ठिकठिकाणी सजविलेल्या कृत्रिम उद्यानापेक्षा एखादा नैसर्गिक अस्ताव्यस्त पसरलेला सृष्टालोकच (Landscape) ज्याप्रमाणे मनाला जास्त मोहिनी घालतो, त्याप्रमाणे तीतील प्रमाणशीरपणापेक्षा मोकळा अनियतपणाच वाचकाला आकृष्ट करतो.

व्हर्जिनिया वुल्फनी कथेपेक्षा स्वभावदर्शनावर जास्त भर दिला आहे. किंवा सॉमरसेट मॉमने कथानक-प्रधान तंत्रच कायम ठेवले. तरी एच. जी. वेल्स सारख्या सर्वश्रेष्ठ कादंबरीकाराने जीवनातील प्रवाह, तत्त्व-दर्शन, सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्यांनाच श्रेष्ठ मानून आपल्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. व कित्येक तंत्राच्या दृष्टीने अत्यंत चोखंदळपणे लिहिलेल्या कादंबऱ्यांपेक्षा वरून अनाकर्षक पण आतून गरयुक्त असलेल्या फळाप्रमाणे त्या वाङमयात श्रेष्ठ ठरलेल्या आहेत.

आपल्या इकडील डॉ. केतकर, वा. म. जोशी इत्यादिकांच्या सामाजिक प्रवाह व राजकीय आकांक्षा व ठिकठिकाणी तत्त्वज्ञानासंबंधी व इतर समस्यां-विषयी चर्चा असलेल्या कादंबऱ्या जरी तथाकथित तंत्रदृष्टीने कमी प्रकारच्या असल्या तरी, वैचारिक वैभवाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. कारण कलेपेक्षा सत्य व रसापेक्षा कस हाच शेवटी कोणत्याही साहित्यात श्रेष्ठ ठरतो.

"कथानकाची बांधणी शिथिल व मांडणी अव्यवस्थित झाली; काही ठिकाणी कंटाळवाणा पाल्हाळ झाला तरी पत्करले. विचार-प्रवर्तन व सद्भावना-पोषण हे महत्त्वाचे आहे." अशा अर्थाचे विधान वा. म. जोशी यांनीच एके ठिकाणी केलेले आहे.

या कादंबरीत श्री. गोरे यांनी विशेषतः वेश्यांचा प्रश्न सहानुभूतिपूर्वक हाताळला आहे. वेश्यावृत्तीस जी कारणे आहेत, त्यांमध्ये आर्थिक विषमता हेच प्रमुख आहे व तिचा नायनाट झाला पाहिजे, असे मत प्रतिपादन केले आहे. आर्थिक विषमता नाहीशी केल्याशिवाय जगात चोरी, जुगारी आणि वेश्यावृत्ती नाहीशी होणार नाही. पातिव्रत्याच्या संरक्षणासाठी वेश्यावर्गाची आवश्यकता ही प्रतिपादिली आहे. त्याचप्रमाणे दलितांचा उद्धार, वऱ्हाडचे दारिद्र्य जाति-भेद, चातुर्वर्ण्य, संस्कृती, इत्यादीविषयी अनेक प्रश्नोप-प्रश्न तीत चर्चिले आहेत.

या कादंबरीतील बहुतेक साऱ्याच व्यक्तिरेखा उत्कृष्ट रंगविलेल्या आहेत. खुद्द विशाल अंतःकरणाची नायिका हिरकणी बाळासाहेबासारखा हाडाचा सज्जन पण कामलोलुप इजारदार, विठ्यासारखा उबजणारा खलपुरुष रंगराव, अनाथाश्रम काढून समाजसेवा करणारा बाबासाहेब देशपांडे, ही पात्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'माझ्याकरता केवळ ती (मंजुळा) जातीबाहेर पडणार असल्यामुळे ही गोष्ट आपण सांभाळून नेली पाहिजे.' 'तिचा नवरा बरा होईपर्यंत तिच्याशी हा डाव न खेळणे बरे. ते माणुसकीचे लक्षण नाही' असे बाळासाहेब म्हणतात पण रंगराव 'श्रीमंतानी मनसोक्त हाताळल्यावर हातावेगळे झालेले त्याचे अंगवस्त्र शेवटी त्यांच्या चाकराच्याच वाट्याला येते' असे निर्लज्जपणे म्हणून, पुढील घटना घडून आणतो. बाळा-साहेबाने शेवटी 'कोळशाचा रंग धुवून जात नाही, त्यासाठी त्याला आगेत जळावे लागते.' 'मानव मरत असला तरी मानवता अमर आहे.' असे म्हणून स्वतःची आत्महत्या करून घेतली आहे. या त्याच्या आत्म-

बलिदानाने त्याचे संपूर्ण जीवन उजळून निघालेले आहे. मात्र या सर्व पात्रांच्या मागाहून श्री गोरे हेच बोलत आहेत असा भास झाल्याशिवाय राहात नाही.

मंजुळेच्या मावशीची भेट झाल्यानंतर दुसरी कादंबरी सुरू होते. कथानकात बराच संथपणा येतो व वाटते की आता वाचकाची उत्सुकताही इथेच संपणार. 'परंतु हिरकणी शेवटी बाळासाहेबाशी लग्न करील काय?' हा प्रश्न निर्माण झाल्यामुळे कादंबरी-विषयी जिज्ञासा व उत्सुकता पुन्हा निर्माण होते. ती शेवटपर्यंत टिकते. ही कादंबरी साडेआठशे पानांची आहे. तिची संक्षिप्त आवृत्ती काढली तर ती तंत्राच्या वगैरे दृष्टीने उत्कृष्ट होण्यासारखी आहे. समृद्धी हा दोष नसून दुर्भिक्ष्य हे मात्र दोषास्पद आहे.

'इजारदार गेले. इनामदार गेले. त्यांचे जीवन हे आता इतिहासात जमा झाले आहे. त्यावरील विचार आजच्या जमान्याच्या दृष्टिकोनातून मागासलेले वाटतील व ही कादंबरी लोकांना जुनी वाटेल' अशा तऱ्हेचे विचार काही मित्रांनी व्यक्त केले होते. पण ह्या कादंबरीचे बहुतेक विद्वान व रसिक वाचकांनी सहर्ष स्वागत केले. यावरून अस्सल साहित्याला जुन्या नव्याच्या उपाधी चिकटत नाहीत, हेच तत्त्व सिद्ध होते.

सामान्य व तरुण वाचकांना ही कादंबरी कोठे कोठे कंटाळवाणी वाटत. असली तरी प्रगल्भ बुद्धीच्या रसिकांना या कादंबरीचे पानन् पान वाचून काढावेसे वाटेल असे म्हणण्यास हरकत नाही.

लोकगीतांचे संकलन

श्री गोऱ्यांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे लोकगीतांचे संकलन. वऱ्हाडातील भागात फिरून त्यांनी ही गीते देशमुख, पाटील, शेतकरी, किसान वगैरे समाजांतून मोठ्या परिश्रमाने मिळविलेली आहेत.

लोकगीतांचे साहित्य गोळा करण्याकरता काही वर्षांपूर्वी किती अडचणी व धोका असे, याची अनेक उदाहरणे देता येतील.

माझा एक मित्र, एका खेडेगावात लोकगीते मिळविण्याकरता गला त्याच्या बरोबर त्या खेड्यांतील एक माणूसही होता. तेथे एक हरिजन काही दिवसांपूर्वी राहावयास आला. त्यावेळी तो कुठं बाहेर कामाला गेला होता. त्याच्या बायकोजवळ आमच्या मित्राने गाणी मागितली व ती खालील ओळी म्हणू लागली—

'शेजीचा भरतार—लसणाची कळी
पराया नारीसाठी—नेते खिशामंदी चोळी
शेजीच्या भरताराले—भरतार म्हणू नये
पेटारी नाग आहे!—'

तितक्यांत त्या बाईचा नवरा आला व तिच्यावर खवळून म्हणाला 'काय वो रांडे, तिऱ्हाइता जवळ माही वट्टी करतं?' व आमच्या मित्राच्या अंगावर चालून गेला. पुढे त्याच्या बरोबरच्या माणसाने व पाटलाने त्या हरिजनाची समजूत घातली!

ज्यावेळेस श्री. गोऱ्यांनी लोकगीते जमविली त्याच सुमारास साधारणत: श्री. वा. वि. जोशी, श्री वा. कृ. चोरघडे, श्री आनंदराव जोशी, कै. सौ. शांताबाई माडखोलकर (हिंदु सणांवरील लेख) वगैरे व्यक्तींनी लोकगीतांकरता प्रयत्न केले होते. व त्यानंतर श्री. ना. रा. शेंडे वगैरेंनी या बाबतींत कार्य केले. गोरे यांनी आपल्या लोकगीतांच्या संग्रहांत मूळ ओळी व शब्द कायम ठेऊन विकास व उत्कर्ष साधलेला असल्यामुळे त्यांत जास्त आकर्षकता आलेली आहे.

लोकगीतांचे महत्व अनन्य साधारण आहे. या गीतांतून सांस्कृतिक, सामाजिक, भाषा विषयक, संशोधनाला विपुल साधनसामग्री मिळू शकते. मराठी भाषेच्या अभ्यासात तिच्या या सर्व बोलभाषा व उप-भाषांचा अभ्यास उपयोगी आहे.

लोकभाषेतील कथानकांवरून व गीतांवरून रामायण महाभारत इ पुराणग्रंथांची रचना करण्यात आली असे काही संशोधकांचे मत आहे.

लोकगीतांतील काही रूढींचा व आचाराचा उगम वेदात आहे, व त्या त्या चालीरीती त्या त्या काळापासून. कमीजास्त प्रमाणांत चालत आलेल्या आहेत हे मी

'अर्वाची सुभगे सीते वंदामहे त्वां—
इंद्रः सीता नि गृह्णातु तां पुषानु यच्छतु—'
ऋ. मं. ४, सू. ५७-६-७

इत्यादी ऋचांवरून व काही लोकगीतांतील सीता-देवीच्या पूजेच्या गीतांवरून वगैरे माझ्या 'विदर्भ संशोधनाच्या इतिहासात' दाखविले होते. त्याचप्रमाणे लेखनविशेषावरून (Orthographical peculiar-

ties) व व्याकरणविषयक प्रक्रियेवरून कोणते लोकगीत कोणत्या विभागातील, (चांदा, जबलपूर वगैरे) आहे हे समजण्याच्या अभ्यासाची दिशाही त्यांत दाखविली होती.

श्री. गोरे यांनी या उत्तरोत्तर नाहीशा होणाऱ्या लोकगीतांच्या सांस्कृतिक धनाचे संकलन करून, ते काळाच्या दाढेतून वाचविण्याचे श्रेय घेतले हे त्यांचे विदर्भावर मोठे ऋण आहे.

व्यक्तित्वाचे चमकदार पैलू

श्री. गोरे यांचे सर्व जीवन त्यागमय आहे. १९२० मध्ये त्यांनी असहकारितेच्या वेळी शाळेला रामराम ठोकला. पुढे तीन वर्षेपर्यंत राष्ट्रीय शाळेत शिक्षकाचे निर्वेतन काम केले. नातलगांच्या जमानती घेतल्या. त्या बाबतीत त्यांची काही वडिलोपार्जित इस्टेट गेली. व काही राहिलेली त्यांनी भावाला देऊन टाकली! मध्यंतरी काही लोकांच्या राजकारणी कारवायांमुळे त्यांची नोकरी गेली.

त्यांचे शिक्षण प्रवेश परिक्षेपर्यंतच झाले असले तरी त्यांनी आपला साहित्यविषयक व्यासंग आजतागायत चालू ठेवलेला आहे! प्रथम जिल्हा कौंसिल व त्यानंतर जनपद व जिल्हा परिषदेत त्यांनी नोकरी केली. अशा संस्थांत मान ताठ ठेवून जीवन कंठणे किती कठिण आहे, हे सर्वांस ज्ञात आहेच; पण त्यांनी तिथे आपला स्वाभिमान केव्हाही सोडला नाही. ते बाणेदार वृत्तीचे असले तरी गर्विष्ठ नाहीत. व स्पष्टवक्ते असले तरी फटकळ नाहीत. त्यांच्या ठिकाणी हळवी भावनाप्रधानता असली तरी कणखर दृढताही आहे!

ते कोणासमोर वाकणारे नसले तरी जेथे त्यांना पूजनीय असे काही दिसते तेथे ते त्याच्या पायावर आपले डोके ठेवण्याकरताही तयार असतात, हे त्यांनी बी कवीवर लिहिलेल्या--

'मानाचा मुजुरा म्हणून चरणी
वाहीन वागीश्वरा
जेथे पाय पडेल होइन तुझ्या
मी पायरीचा चिरा'

या ओळींवरून व त्यांच्या इतरत्र वागणुकीवरूनही दिसते.

प्रांजल दिलदारपणा, गोड स्पष्टवक्तेपणा, सहृदय रसिकता हे त्यांच्या स्वभावाचे चमकदार पैलू आहेत. शिवाय आपल्या सामर्थ्यशील नम्रतेने ते कोणाचेही अंतःकरण जिंकून त्यावर विराजमान होतात! थोर कवि, श्रेष्ठ कादंबरीकार व लोकगीतांचे कष्टाळू संकलनकार या त्रिविध नात्याने त्यांनी मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविले आहे.

वणी येथील हे साहित्य संमेलन मान्यवर श्री यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, आबासाहेब पारवेकर, गोरे यांच्या नेतृत्वाखाली व प्रा. राम शेवाळकर, ना. मा. सरपटवार, श्री म. का. राजूरकर, म. रा. सरपटवार, दादासाहेब हूड यांच्यासारख्या साहित्यिक व कार्यकर्ते यांच्या परिश्रमामुळे पूर्णपणे यशस्वी होईल, यांत मला शंका वाटत नाही.

ईश्वर त्यांना उदंड आयुरारोग्य देऊन त्यांच्या हातून अधिक साहित्य व लोकसेवा घडवून आणो हीच सदिच्छा.

अनुक्रमणिका

डॉ. य. खु. देशपांडे यांचे इतिहाससंशोधनकार्य

—डॉ. वा. वि. मिराशी

'युगवाणी'च्या संपादकांनी वरील विषयावर लेख लिहिण्याची मला विनंती केली आणि तो एक आठवड्यात पाहिजे असे कळविले, तेव्हा मी मोठ्या पेचात पडलो. आप्पासाहेबांचा आणि माझा पुष्कळ वर्षांचा परिचय होता खरा, पण त्यांच्या सर्व इतिहाससंशोधनाची मला पूर्ण माहिती नाही. इतिहाससंशोधनाचे दोन भाग होतात—(१) प्राचीन किंवा मुसलमानपूर्व कालाचे आणि (२) तदुत्तर कालाचे. आप्पासाहेबांची बुद्धी चतुरस्र असल्याने त्यांनी दोन्ही प्रकारचे संशोधन थोडेबहुत केले आहे. मी फक्त प्राचीन इतिहासाचा अभ्यासक आहे. शिवाय संदर्भ ग्रंथही हाताशी नाहीत. म्हणून माझे मूल्यमापन त्यांना अन्याय तर करणार नाही ना, अशी शंका माझ्या मनात उत्पन्न झाली आहे. असो.

कै. यादव माधव काळे आणि आप्पासाहेब हे गेल्या पिढीतील वाङ्मय आणि इतिहास यांचे अग्रगण्य संशोधक. यादवरावांनी थोडेसे वाङ्मयसंशोधन केले असले तरी त्यांचा मुख्य भर इतिहाससंशोधनावर होता. त्यांचा 'वऱ्हाडचा इतिहास' या ग्रंथाने विदर्भाविषयी बरीच माहिती प्रकाशात आणली. गेल्या चाळीस–पन्नास वर्षांत पुष्कळच नवीन साधने उजेडात येऊन त्यांतील माहिती जुनी झाली असली तरी काही बाबतीत त्याचे महत्त्व अबाधित राहिले आहे. त्यांचा दुसरा ग्रंथ 'नागपूर प्रांताचा इतिहास'. यांतील आरंभीचा छत्तीसगडविषयक भाग आता विस्ताराने लिहिला पाहिजे, पण इतर भाग अद्यापि प्रमाणभूत आहे. याही ग्रंथाची सुधारून दुसरी आवृत्ती काढणे जरूर आहे. त्याकरिता आमच्या विदर्भ संशोधन मंडळाची आज बरेच दिवस खटपट चालू आहे. पण यादवरावांच्या वारसांची अनुकूलता नसल्यामुळे नाइलाज झाला आहे. याशिवाय यादवरावांनी भोसलेकालीन पत्रव्यवहार इंग्रजीत छापला आहे. या ग्रंथांच्या योगे इतिहासकार म्हणून यादवरावांची कीर्ती चिरकाल टिकेल.

आप्पासाहेबांचे कार्य इतिहासापेक्षा वाङ्मय विभागात जास्त महत्त्वाचे झाले आहे. शारदाश्रम स्थापून त्यांनी विदर्भातील प्राचीन संस्कृत आणि मराठी हस्तलिखितांचा आणि ऐतिहासिक कागदपत्रांचा संग्रह करण्याचे बहुमोल कार्य केले आहे. याशिवाय महानुभाव ग्रंथांच्या लिप्यांचा उलगडा करून त्या पंथाच्या वाङ्मयाचा अभ्यास करणारे विदर्भातले पहिले संशोधक आप्पासाहेबच. त्यांच्या कार्यामुळे स्फूर्ती घेऊन नंतर भवाळकर, वा. ना. देशपांडे, नेने, कोलते, डोळके यांनी त्या वाङ्मयाचे संशोधन केले आहे खरे. पण त्यांना मार्ग दाखविणारे आप्पासाहेबच. याशिवाय सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी त्यांना युरोपमध्ये जाण्याची संधी मिळाली होती. तेव्हा त्यांनी इंडिया ऑफीस लायब्ररीमध्ये व इतरत्र मिळणाऱ्या माहितीची टिपणे केली होती आणि मराठी भाषेचा आणि वाङ्मयाचा इतिहास इंग्रजीमध्ये लिहिण्याचा त्यांचा मानस होता. दुर्दैवाने पंचवीस वर्षांच्या दीर्घ अवधीतही त्यांच्या हातून हा ग्रंथ लिहून पुरा झाला नाही. पण शारदाश्रमाचे संस्थापक, त्यांतील बहुमोल संस्कृत आणि मराठी ग्रंथांचे संग्राहक आणि महानुभावी ग्रंथांचे पहिले संपादक म्हणून आप्पासाहेबांची कीर्ती चिरस्थायी होईल.

त्यांचे इतिहाससंशोधनाचे कार्य त्या मानाने गौण ठरेल. प्रथम त्यांचे प्राचीन इतिहासाचे संशोधन घेऊ.

(१) **कायरचे लेख**–डॉ. देशपांडे वणी तालुक्यातील कायर येथे गेले असताना त्यांना ब्राह्मी लिपीत लिहिलेले दोन भग्न शिलालेख सापडले. एकातील 'महासेनापति' हा शब्द वाचता आला. दुसऱ्याचे वाचन 'घरे दया पेङ्क एच्छी' असे करून त्याचा अर्थ 'घरोघर दयेचा प्रसार करावा' असा आप्पासाहेबांनी केला आहे. हे लेख कोणत्याही संशोधनपर नियतकालिकात अद्यापि प्रसिद्ध झाले नाहीत. त्यांचे छापही अद्यापि कोठेही छापले नाहीत. संशोधकांची प्रथा ही की आपल्या वाचनाबरोबर मूळ लेखाचे छाप प्रसिद्ध करावयाचे. तसे केले म्हणजे इतर संशोधकांस त्या वाचनाची शहानिशा करता येऊन सत्यनिर्णयास मदत होते. प्रस्तुत लेखाच्या बाबतीत हे झाले नसल्यामुळे 'घरे दया पेङ्क एच्छी' हे वाचन शंकास्पद वाटते. त्यातील भाषा सातवाहन कालातील दोन हजार वर्षांइतकी जुनी वाटत नाही. अजून शारदाश्रमाच्या संचालकांनी हे लेख छापांसह प्रसिद्ध करावे.

(२) **वाशीमचा वाकाटकांचा ताम्रपट**–या ताम्रपटावरील आपला लेख आप्पासाहेबांनी सन १९३९ साली कलकत्ता येथे भरलेल्या इंडियन हिस्टरी कॉंग्रेसमध्ये वाचला होता. त्यामध्ये प्रवरसेन–सर्वसेन–विंध्यशक्ति अशी वंशावळ आली होती. तेव्हापर्यंत विंध्यशक्ति हा वाकाटकांचा मूळ पुरुष मानण्यात येत असे. या ताम्रपटावरून वाकाटकांची वंशावळ आणखी दोन पिढ्या मागे जाते असे आप्पासाहेबांनी आपल्या लेखात प्रतिपादिल्यामुळे त्या सभेत मोठे कुतूहल उत्पन्न झाले. मीही तेथे उपस्थित होतो. त्या वंशावळीत आलेले सर्वसेनाचे नाव अजंठ्याच्या सोळा नंबरच्या वाकाटकांच्या, आता अस्पष्ट झालेल्या, लेखात आले असल्याचे मला आठवले. त्या सभेत या लेखाची बरीच चर्चा झाली. त्यात प्रवरसेनाचे वर्णन अग्निष्टोम, आप्तोर्याम इत्यादी यज्ञ करणारा असे आल्यामुळे तो विन्ध्यशक्तीचा पुत्र असला पाहिजे, त्याचा आजा होऊ शकत नाही. म्हणून हा ताम्रपट बनावट आहे असे एका विद्वानाने प्रतिपादिले तर काहींनी त्या ताम्रपटाची चिकित्सक चर्चा करण्याकरिता माझ्याकडे तो सोपवावा असे सुचविले. आप्पासाहेबांचा लेख पुढे कलकत्ता अधिवेशनाच्या वृत्तांतात छापावयाचा होता आणि पुढे तसा तो छापलाही. पण तो छापण्यापूर्वी कलकत्त्याच्या डॉ.दिनेशचंद्र सरकार या प्राध्यापकाने हिस्टरी कॉंग्रेसच्या ऑफिसातून त्या ताम्रपटाचे छाप हस्तगत करून त्याचे वाचन कलकत्त्याच्या इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली या संशोधनपर जर्नलमध्ये प्रसिद्ध केले. संशोधन क्षेत्रातील ही शुद्ध चाचेगिरी होती! हे पुढे मी डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांच्या समक्ष त्यांच्या तोंडावर सांगितले. आप्पासाहेब मात्र सौजन्याने त्याला काही म्हणाले नाहीत. संशोधनाचे श्रेय ज्याचे त्याला दिले पाहिजे. एकदा मूळ लेख प्रसिद्ध झाल्यावर त्याची चर्चा कोणीही करावी. पण प्रसिद्धीपूर्वी चाचेगिरीने तो हस्तगत करून स्वतःच्या नावावर प्रसिद्ध करणे हे गर्ह्य आहे.

नागपूरला परत आल्यावर मी अजंठा येथील सोळाव्या लेण्यातील वाकाटकांच्या आता अस्पष्ट झालेल्या लेखाचा सूक्ष्म अभ्यास केला. तेव्हा त्यात विंध्यशक्ति–प्रवरसेन–सर्वसेन–विन्ध्यसेन इत्यादी वंशावळ आल्याचे मला आढळून आले. त्यांतील सर्वसेन आणि विन्ध्यसेन यांची नावे त्या लेखाच्या डॉ. भाऊ दाजी, पं. भगवानलाल इंद्रजी आणि डॉ. बुल्हर याना वाचता किंवा अनुमानिता आली नव्हती. तेव्हा वाशीम ताम्रपटातील विन्ध्यशक्ती हा विन्ध्यसेन किंवा द्वितीय विन्ध्यशक्ती असून त्या ताम्रपटावरून वाकाटकांची वंशावळ दोन पिढ्या मागे जात नाही, तसेच वाकाटकांची एक शाखा वत्सगुल्मास राज्य करीत होती हे मला सिद्ध करता आले. आता हे सिद्धान्त सर्वमान्य झाले आहेत. पुढे गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट डॉ. बहादूरचंद छावडा यांच्या सूचनेवरून तो ताम्रपट मला संपादण्यास मिळाला. तो मी 'एपिग्राफिया इंडिका' या भारत सरकारच्या जर्नल (व्हॉ. २६, पृ. १३७-१५५) मध्ये सविस्तर चर्चेसह प्रसिद्ध केला आहे.

(३) **अकोल्याचा नन्नराज-युद्धासुराचा ताम्रपट**-सन १९४८ मध्ये आप्पासाहेबांना अकोल्याच्या श्री समुद्र ॲडव्होकेटकडून हा ताम्रपट मिळाला. त्याचा अभ्यास करून त्यांनी पुण्याच्या 'पराग' या संशोधनपर मासिकात तो प्रसिद्ध केला. त्यानंतर त्यावरचा इंग्रजी लेख एपिग्राफिया इंडिकामध्ये प्रसिद्ध करण्याकरिता त्यांनी पाठवला. त्याच्या संपादकांनी त्यावर काही सूचना करून सुधारण्याकरिता आप्पासाहेबांकडे परत केला. आप्पासाहेबांनी बरेच दिवस तो लेख सुधारून परत

केला नाही. मी वरचेवर त्यांना त्यासंबंधी विचारीत असे. नंतर एक-दोन वर्षांनी आलेल्या 'एपिग्राफिया इंडिका' च्या २९ व्हॉं. (पृ. १०९-११५) मध्ये गव्हर्नमेंट 'एपिग्राफिस्ट'च्या ऑफिसातील वेंकटरामय्या नामक गृहस्थाने तो प्रसिद्ध केलेला मला अचानकपणे आढळला. त्याने आपल्या लेखात श्री. समुद्र यांचा उल्लेख केला आहे, पण आप्पासाहेबांचा नामनिर्देशही केला नाही. सशोधनक्षेत्रातील चाचेगिरीचे हे दुसरे उदाहरण ! आप्पासाहेबांना त्या गृहस्थास याबद्दल खडसून जाब विचारता आला असता पण जन्मजात सौजन्यामुळे ते स्वस्थ बसले.

वरील दोन ताम्रपटांविषयी मी त्याच्या महत्त्वामुळे जरा सविस्तर माहिती दिली आहे. याशिवाय (४) मार्कंडी येथील शिलालेख आणि (५) उनकेश्वराचा शिलालेख असे दोन कोरीव लेख आप्पासाहेबांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात प्रसिद्ध केले आहेत. पहिला लेख ते यादवनृपति कृष्ण याच्या काळचा असे म्हणतात, पण ते विवादास्पद आहे. हे दोन्ही लेख डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी आपल्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या ग्रंथात छापांसह प्रसिद्ध करून त्यांवर नवीन प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि ते प्रथम प्रकाशित करण्याचे श्रेय आप्पासाहेबांस आहे.

युरोपातील आपल्या वास्तव्यात आप्पासाहेबांनी ग्रंथ वाचून काही टिपणे केली होती. त्यांमध्ये जेन्किन्सचा आश्रित विनायकराव औरंगाबादकर याच्या रिपोर्टातील रायपूरजवळच्या आरंग येथील शिलालेखाविषयी उल्लेख मला उपयुक्त वाटला. तो शिलालेख रतनपूर येथील किंवा भांदक येथील, याविषयी पन्नास-पाउणशे वर्षे जो वाद माजून राहिला होता त्यावर निर्णायक प्रकाश पडला आहे. औरंगाबादकराचा रिपोर्ट भारतात उपलब्ध नसल्याने आप्पासाहेबांनी आपली टिपणे प्रसिद्ध केली असती तर बरे झाले असते असे वाटते.

अर्वाचीन कालाच्या इतिहासाचे संशोधन आप्पासाहेबांनी या कालाचे एक हजारावर ऐतिहासिक कागदपत्र शारदाश्रमात जमविले आहेत असे समजते. (श्री. हुडकृत विदर्भ संशोधनाचा इतिहास, पृ. ४१) पण [illegible] ही प्रकाशन त्या संस्थेतर्फे झाले नाही [illegible] न मंडळाला ग्रंथप्रकाशन करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाल्यावर ऐतिहासिक लेखसंग्रह प्रसिद्ध करावा अशा इच्छेने मी आप्पासाहेबांस त्याचे संपादन करण्याची विनंती केली. त्यावेळी वार्धक्यामुळे त्यांची प्रकृती ठीक नव्हती. मोतीबिंदूमुळे दृष्टी बिघडली होती. तरी त्यांनी मोंगल, मराठा आणि ब्रिटिश राजवटीतील ११९ लेख संपादून दिले. ते विदर्भ संशोधन मंडळाने 'विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड पहिला' यांत प्रसिद्ध केले आहेत. या कार्यात श्री. दे. गो. लांडगे आणि श्री. शं. गो. चट्टे यांचे त्यांस साहाय्य झाले असले तरी मूळ कागद वाचून त्यांच्या नकला करणे, त्यांच्या तारखा ठरविणे, लेखपरिचय लिहिणे ही महत्त्वाची कामे आप्पासाहेबांनीच केली आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनतर इतर प्रांतांत त्याप्रमाणे जुन्या मध्यप्रदेश शासनाने स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास लिहिण्याचे काम हाती घेतले. त्याच्या साधनांच्या जमवाजमवीकरिता नागपुरी एक ऑफीस उघडण्यात आले. त्याचे प्रमुखत्व मला देऊ केले होते, पण त्यावेळी भारत सरकारच्या पुरातत्त्वविभागातर्फे 'कलचुरि-चेदि संवताचे कोरीव लेख' हा माझा बृहद् ग्रंथ छापला जात असल्यामुळे मला ते स्वीकारता आले नाही. ते काम आप्पासाहेबांस द्यावे असे मी सुचविले. त्याप्रमाणे आप्पासाहेब ते काम दोन-तीन वर्षे करीत होते. नंतर ज्या चार संपादकांनी History of the Freedom Movement in Madhya Pradesh (मध्यप्रदेशातील स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास) लिहून दिला त्यात आप्पासाहेब होते. भारतातील इतर प्रदेशांनीही असा उपक्रम केला होता. पण मध्यप्रदेशातच तसा इतिहास प्रथम प्रसिद्ध झाला.

आप्पासाहेब हिस्टॉरिकल रिकॉर्डस् कमिशनच्या बैठकींना नियमाने उपस्थित राहत असत. त्यांनी त्याच्या अधिवेशनात आपले काही लेख वाचले होते. ते नंतर त्यांच्या अहवालांत प्रसिद्ध झाले आहेत. त्या कमिशनतर्फे प्रांतिक ऐतिहासिक स्थलांचे निरीक्षण करून अहवाल सादर करण्याकरिता मंडळे नेमण्यांत येत मध्यप्रदेशाच्या मंडळाचे अध्यक्षपद आप्पासाहेबांकडे असे.

आप्पासाहेबांस विदर्भातील स्थलांची पूर्ण माहिती असल्यांमुळे प्राचीन कोरीव लेखातील स्थलाची

निश्चिती करतांना त्यांची मदत होत असे. राष्ट्रकूट नृपति पहिला कृष्णराज यांच्या भांदकच्या ताम्रपटात उल्लेखिलेली स्थळे निश्चित करताना कै. रा. ब. का. ना. दीक्षित यांना त्यांची मदत झाली होती. दोन वर्षांपूर्वी आप्पासाहेबांनी या विषयावर विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकात लेख लिहून त्यात ही माहिती दिली आहे.

आप्पासाहेबांनी स्थापलेल्या शारदाश्रमाने आरंभी बरेच कार्य केले. कांही संशोधनपर व इतर ग्रंथ प्रकाशित केले. त्या संस्थेने वार्षिक काढण्याचा उपक्रम करून एक अंक प्रकाशित केला. पण तो पहिला तसाच शेवटचा ठरला. पुढे त्या संस्थेचे कार्य मंदावत गेले. याचे कारण श्री. हूड यांनी आपल्या 'विदर्भ संशोधनाचा इतिहास' या पुस्तकात (पृ. ४०) पुढीलप्रमाणे दिले आहे—'कोणत्याही संस्थेला मुख्यत: दोन प्रकारची मंडळी लाभावी लागतात. एक डोक्याचे काम करणारी आणि दुसरी हाताचे करणारी. वाङ्मयसेवक हा उत्तम संस्थाचालक असेलच असे म्हणवत नाही. शारदाश्रमाला जी मंडळी लाभली त्यांतील बरीच केवळ वाङ्मयप्रेमी आहेत. फंड गोळा करून प्रचार करणे इत्यादीकरिता राजकीय पक्षोपपक्षात जसे लोक हौसेने पुढे येतात आणि जास्त प्रमाणावर मिळू शकतात, तसे दुर्दैवाने या संस्थेस लाभले नाहीत.' काही अंशी संस्थाचालकांचा अव्यावहारिकपणा तिच्या दुरवस्थेस कारणीभूत झाला असावा. आप्पासाहेब मधून मधून मला भेटत तेव्हा शारदाश्रमाच्या सभासदत्वाची एक रुपया वर्गणी मागून घेत असत. मध्यंतरी तीही दिली नसल्यास बाकी काढीत नसत. अशा अत्यल्प वर्गणीवर कोणतीही संस्था चालणार कशी? आप्पासाहेबांनी अत्यंत कष्ट करून यवतमाळास जाऊन महिना महिना राहून हस्तलिखितांची वर्णनात्मक यादी केली होती. अशा याद्या छापण्यास भारत सरकार मदत करते हे त्यांना माहीत होते. पण तशी मदत मिळविण्याचे प्रयत्न झाले नसावेत. म्हणून ती यादी अद्यापि अप्रकाशित आहे.

महाराष्ट्रातील बहुतेक संशोधन संस्थांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. मनुष्यबळ आणि अर्थबळ या दोन्हींची वाण आहे. तसे म्हटले तर आता संशोधनाला खूप भर आला आहे. प्रत्येक विषयाचे संशोधन करून डॉक्टरेट मिळविलेले अनेक प्राध्यापक विद्यापीठात व महाविद्यालयांत आढळतात पण डॉक्टरेट मिळविल्यावर ते संशोधनाची रजा घेताना दिसतात. एखाद्या संस्थेत निरपेक्षपणे काम करण्याची वृत्ती आढळत नाही. त्यामुळे बहुतेक संस्थांत आता वृद्ध मंडळीच राहिली आहेत. ती गेल्यावर एकखांबी तंबूप्रमाणे त्या संस्था कोसळण्याचे भय आहे.

संशोधनाचा जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंध येत नसल्यांमुळे तिला त्याचे महत्त्व वाटत नाही आणि तिचा आश्रय अशा संस्थांना लाभत नाही. त्यांची प्रकाशने खपत नाहीत. शासनालाही संशोधनाची महती कळत नाही. त्याचे अशा संस्थांना देण्याच्या निर्वाह अनुदानाचे (मेंटेनन्स ग्रँटचे) नियम इतके विलक्षण आहेत की कित्येकदा त्यांना अनुदान मुळीच मिळत नाही, किंवा मिळाले तर १०० किंवा २०० रु इतके अत्यल्प मिळते. तेही मार्चच्या अखेरीस! सबंध वर्षभर आपणास किती अनुदान मिळणार याविषयी संशोधन संस्था अज्ञानात असतात.

आप्पासाहेबांनी ही परिस्थिती अनुभविली होती. म्हणून आपल्या मागे आपण जीवापाड मेहनत करून उभारलेल्या शारदाश्रमाचे काय होणार याची त्यांना सारखी काळजी लागून राहिली होती. शासनाने संशोधन संस्था आपल्या ताब्यात घेऊन चालवाव्या असे ते प्रतिपादित असत. त्यांनी शारदाश्रमाकरिता यवतमाळ येथे मध्यवर्ती ठिकाणी प्लॉटही मिळविला होता आणि त्यावर शासनाने शारदाश्रमाकरिता इमारत बांधून द्यावी अशी खटपट चालविली होती. शासनाने तसे केले तरी त्या संस्थेत काम करण्याकरिता निरपेक्ष वृत्तीची संशोधनप्रेमी तरुण माणसे अहमहमिकेने पुढे आली पाहिजेत. तरच आप्पासाहेबांनी तन–मन–धन खर्चून उभारलेली शारदाश्रम संस्था चिरस्थायी होईल.

कोल्हटकरांची नाट्यसमीक्षा
लेखांक : २

—प्रा. म. ल. वराडपांडे
भाषा–विभाग, संघ लोकसेवा आयोग,
नवी दिल्ली, ११

अभिनय :

नाट्यकलेच्या प्रायोगिक पैलूंचा विचार श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी फारसा केलेला दिसत नाही.'[१] नेपथ्य, रंगसज्जा, प्रेक्षागार यांविषयी कोणतीही प्रमेये त्यांनी मांडलेली नाहीत. त्यातल्या त्यात, अल्प प्रमाणात का होईना पण 'अभिनया'चा विचार मात्र त्यांनी केलेला आहे.

तत्कालीन रंगभूमीवर प्रचलित असलेल्या अभिनयाबद्दल त्यांनी नापसंतीच व्यक्त केली असून अभिनयकलेचा दर्जा यथातथाच असल्याचे नमूद केले आहे[२]··'संगीत शापसंभ्रम नाटक' या आपल्या टीकालेखात ते लिहितात, "आमच्यात व्हावी तितकी अभिनयकलेत सुधारणा झालेली नाही. आमच्यामधील हल्लीचे अभिनयचातुर्य म्हणजे ते अशा प्रकारचे, "नाही झाले षण्मास" यातील षट् शब्दाचा अभिनय करायचा म्हणजे सहा बोटे दाखवावयाची; ऐकण्याचा अभिनय कानाजवळ बोट नेणे व बोलण्याचा तोंडाजवळ बोट नेणे[३]. सारांश, आमच्या हल्लीच्या अभिनयामुळे बहिऱ्या मनुष्यास आमच्या भाषणाचा गोषवारा कळण्याचा संभव आहे पण प्रेक्षकांच्या मनोवृत्ती हालवून सोडण्याची मात्र त्यांच्या अंगात अजून शक्ती आलेली नाही."

नाट्यलेखकाचा आशय नट आपल्या अभिनयाच्या द्वारे प्रेक्षकांपर्यंत पोचवतो. अभिनय हा नट अभिनीत करीत असलेल्या पाठातील भावाशय व नटाची कलाशैली यांचा रंगभूमीवरील दृश्य आविष्कार होय[४]. कोणतेही वाक्य किंवा वाक्यसमूह घेतला तरी तो अनेक प्रकारे अभिनीत करता येईल. पण या वाक्यातील कृती (action) विविध मुद्रांच्या साहाय्याने व्यक्त करणे येवढाच अभिनयाचा ढोबळ अर्थ नाही. त्यातील 'भावाशयाचे' वहन प्रेक्षकापर्यंत झाले पाहिजे. ही सूक्ष्मता प्रचलित अभिनयकलेत नसल्याचो खंत कोल्हटकरांनी व्यक्त केली आहे, व अभिनयाच्या प्रेक्षकाच्या मनोवृत्तीपर्यंत 'भाव वहन' करण्याच्या क्षमतेवर त्यांनी भर दिलेला आहे.

अभिनय म्हणजे अनुकृती होय याचीही जाण कोल्हटकरांना आहे. 'कुशल नटाने एखाद्या इसमाच्या चेहऱ्याची, अंगविक्षेपाची आणि स्वरांची बतावणी केली म्हणजे एकाच वेळी अनेकांना कौतुक उत्पन्न होते.' (तोतयाचे बंड–३१५) असे त्यांनी नमूद केले आहे. या ठिकाणी 'बतावणी' म्हणजे अनुकृती व 'कौतुक' म्हणजे आनंद हे लक्षात घ्यायला हवे. 'मुखाकृती', 'अंगविक्षेप' व 'स्वरपद्धती' ही अभिनयाची तीन अंगे होत. यांपैकी 'मुखाकृतीची बतावणी' हा भाग मेकअपच्या क्षेत्रात येतो तर 'स्वरपद्धती व अंगविक्षेप' या बाबी साक्षात अभिनयाच्या. अभिनयाच्या काटेकोर योजनेवर त्यांचा भर आहे. या सर्व अंगांच्या संपूर्ण संचलनाने उत्तम अभिनय होतो असे नाही. 'संयम' हा एक महत्त्वाचा कलागुण आहे. अल्पतम साधने वापरून जास्तीत जास्त प्रभाव निर्माण करणे हे उत्तम कलाकृतीचे गमक आहे, असे कोल्हटकर

मानतात. 'अल्प साधनांच्या साहय्याने गूढ मनोवृत्ती. व्यक्त करण्याची कला अभिनेत्याला साधली पाहिजे' हातापायांचे, मुखावरील स्नायूंचे भाववाही संचलन व स्वराघात ही अभिनयाची उत्तरोत्तर सूक्ष्म होत जाणारी साधने आहेत. ते म्हणतात, "कुशल नट हातापायांचे साहाय्य न घेता, केवळ चेहऱ्याचे स्नायू पाहिजे तसे हालवून व स्वरात हवा तो बदल करून, वाटेल त्या मनोवृत्ती प्रगट करतो. उलट गावंढळ नटांचे धांगडधिंग्यावाचून चालत नाही." (तोतयाचे बंड–३२२) अभिनयकलेच्या सूक्ष्मतेबद्दल कोल्हटकरांचा आग्रह आहे. अभिनयास सहाय्यभूत होणाऱ्या साधनांचा संयमपूर्ण वापर त्यांना अभिप्रेत आहे.

मध्यवर्ती भावाला उठाव देण्यासाठी इतर अवांतर भाव त्याला उद्दीपनरूप असावे लागतात व त्यांची रचना साम्य किंवा विरोध तत्त्वानुसारी केली गेली असावी. 'स्नानगृहातील बेगम' या राजा रविवर्म्याच्या चित्राकृतीचा उल्लेख या संदर्भात कोल्हटकर करतात. सोबत उभ्या असलेल्या शिद्दीणीची पार्श्वभूमी विरोधरूपीने बेगमचे लावण्य जास्त उठावदार करते. त्यामुळे नाट्याचा संबंध एकाहून जास्त नटांशी असल्यास "अवांतर नटांच्या नाट्याने व्यक्त होणारे भाव मुख्य नटाच्या नाट्याने व्यक्त होणाऱ्या भावांशी सदृश किंवा भिन्न असले पाहिजे," अशी सांघिक अभिनयाची कल्पना ते मांडतात.

एकाच नटाला विभिन्न भाव व्यक्त करावयाचे असल्यास वैचित्र्याची निर्मिती होते. 'प्रकारद्वय' म्हणजे वास्तविक व कृत्रिम भावांचा परस्परविरोध असे प्रमेय ते मांडतात. सैरंध्री कीचकाला खोटे प्रेम दर्शवून नृत्यशालेकडे नेते असा प्रसंग असल्यास सैरंध्रीच्या ठायी वास्तविक भाव व कृत्रिम भाव यांची संयुक्त अभिव्यक्ती साकल्याने होते व वैचित्र्य निर्माण होते. कोल्हटकर म्हणतात, "नाट्य शरीराच्या अनेक अवयवांनी व्यक्त करिता येते. जेव्हा त्याने एकच भाव व्यक्त करायचा असतो, तेव्हा हातपाय मान, ओठ, नाक, गाल, भिवई या सर्वांची प्रवृत्ती तो भाव दर्शविण्याकडेच असते. जेव्हा भावभेद दाखवावयाचा असतो तेव्हा यापैकी काहींनी एक भाव व इतरांनी दुसरा भाव दाखविला पाहिजे, भावांच्या कमीअधिक उत्कटतेप्रमाणे त्यांजमध्ये कमीअधिक आकर्षकत्व असू शकते." (३२६) प्रकारद्वयाचे उदाहरण म्हणजे डोळ्यांत आसू ओठांत हसू' ही म्हण. संभाजीला पाहिल्यावर कमलेची झालेली मुखाकृती (वी कवी).

त्यांनी नाट्याचे 'क्षणिक' व 'दीर्घकालीन', असे भाग केले आहेत. ह्यातील संबंध 'चित्र' व 'चलचित्रे' यासारखा असतो. क्षणिक नाट्य सामान्याने सर्वावयांसहित प्रेक्षकांना एकदम दृग्गोचर होतात, तर साध्य हे अंती असल्यामुळे दीर्घकालीन नाट्य क्रमशः व्यक्त होत जाते म्हणजे दीर्घकालीन नाट्य ही क्षणनाट्यांची एक चढत्या श्रेणीची शृंखला असते. ही नाट्ये अभिनयाद्वारे स्पष्ट करताना कुशल नट 'नाट्यविषयीभूत गुणांची किंचित अतिशयोक्ती' करतो. ही अतिशयोक्ती कोल्हटकरांनी क्षम्य मानली आहे. याचे कारण देताना ते लिहितात. 'जेन आस्टिनच्या कादंबऱ्यांत स्वभाववर्णन यथातथ्य असते, अशी त्याची सर्वोतोमुखी प्रशंसा ऐकू येते. परंतु त्यांतूनसुद्धा ही अतिशयोक्ती दिसून येते. जो स्वभाव कळण्यास वास्तविक सृष्टीत महिनेच्या महिने घालवावे लागतात तो काल्पनिक सृष्टीत अशा अतिशयोक्तीवाचून तावडतोब ओळखू येणे शक्य नसते.' (३३६) या ठिकाणी 'मेलोड्रामा'च्या तत्त्वास त्यांनी मान्यता दिली आहे पण त्यामागील किंचित हा शब्द लक्षात घेतला पाहिजे. नाहीतर हे विधान त्यांच्या 'कलात्मक संयमांच्या तत्त्वाशी' विसंगत वाटण्याची शक्यता आहे.

प्रवेशांची मांडणी व अभिनय यांचा परस्पर संबंध कसा असावा याविषयी आपले मार्मिक विचार कोल्हटकरांनी मांडलेले आहेत. रंगभूमीची सज्जा अभिनयाला वाव देणारी असावी असा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. ते लिहितात, 'नाट्य-शरीराची ऐट, हातपाय, मान, ओठ, गाल, भृकुटी यांच्या चलनवलनाने करता येते. म्हणून या सर्व अवयवांची हालचाल अप्रतिबद्ध चालावी व दिसावी अशी प्रवेशांची मांडणी असावी. पात्रांचा बैठ्या स्थितीत प्रवेश दाखविण्यापेक्षा उभ्याने दाखविणे इष्ट असते. त्याचप्रमाणे अवयवांची सूक्ष्म हालचालसुद्धा नीट दिसावी म्हणून प्रवेश रंगभूमीच्या पुढील भागातच होण्यास अवसर असावा म्हणजे अभिनयप्रदर्शनाचा केंद्रबिंदू रंगभूमीच्या दर्शनी भागात असावा. नाट्य हे दृश्य काव्य असल्यामुळे भावाभिव्यक्तीची दृश्यात्मकता नीट असावी हे ओघानेच आले.

अनुक्रमणिका

स्वगतच्या अभिनेयतेबद्दलही कोल्हटकरांनी काही विचार मांडलेले आहेत. स्वगतांचा आश्रय शक्यतो कमी घ्यावा असे त्यांचे मत आहे, कारण ती रंगभूमीवर सादर करताना अनेक अडचणी येतात. "स्वगत भाषणे स्वाभाविक दिसण्यास हलक्या स्वरात करावी लागतात, पण त्या स्वरात ती प्रेक्षकांना ऐकू जात नाहीत. मोठयाने केल्यास ती ऐकू जातात, पण स्वाभाविक दिसत नाहीत. स्वगत भाषण करणारे पात्र दुसऱ्या पात्राशी बोलत असले, म्हणजे ते भाषण फारच थोडक्यात, लहान स्वरात व दुसरे पात्र स्वाभाविकपणे थांबले असताच आले पाहिजे. या स्वगतांचा अभिनय करण्याच्या मार्गातील अडचणी होत, यावर मात करण्याचा सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे स्वगतांचा अवलंब न करणे. पण त्याशिवाय गत्यंतरच नसेल तर नटाने त्यातील मजकुराबाबत प्रथम प्रेक्षकांची उत्कंठा जागृत करून, नंतर ती मोठ्या स्वरात म्हणणे शोभेल."

प्रेक्षक व नाटक :

कोल्हटकरांनी नाटयविषयक पुष्कळ लिहिले असले तरी प्रत्यक्ष नाटयप्रयोगाचे समीक्षण त्यांनी कधीही केलेले नाही. नाटयाच्या वाङमयीन भागाकडेच त्यांचे लक्ष अधिक होते. त्यामुळे प्रयोगात्मक भागाशी संबंध असलेल्या पैलूंचा विचार त्यांनी विशेषत्वाने केलेला नाही प्रेक्षकांचा नाटयरचनेवर काय परिणाम होतो किंवा व्हावा याविषयी तुरळक उल्लेख त्यांनी केलेले आहेत 'प्रेक्षकांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांच्यामध्ये एकाग्रता उत्पन्न करण्यासाठी नाटकातील प्रमुख पात्रे शक्य असल्यास एक दोनच ठेवावीत, अधिक ठेवू नयेत (३५०) नाटककर्त्यास शेकडो प्रेक्षकांचे चित्त एकदम नाटकारंभाकडे खेचणे जरूर असल्यामुळे पहिला प्रवेश विशेष चटकदार करावा. नाटककारास प्रेक्षकाचा साधयाशी व नायकनायिकांशी शक्य तितक्या लवकर परिचय करून देणे जरूर असते' अशा सूचना त्यांनी केलेल्या आहेत.

नाटयगृहातील गडबडगोंधळाचा विचार कोल्हटकरांनी केलेला आहे. या 'गडबडगोंधळा'ची कल्पना पुढे ठेवून नाटयरचना करावी असे त्यांनी प्रतिपादले आहे. हा मुद्दा मात्र एकदम अभिनव व मौलिक आहे. मूकचित्रपटाचा दाखला देऊन ते म्हणतात,—(नाटयगृहातील गोंधळामुळे) पुष्कळदा नाटकातील वाक्येच्या वाक्ये गडप होतात. त्यामुळे कथानक समजण्यास अडचण पडते. त्यामुळे नाटकाची रचनाच अशी असावी की त्याच्या कथानकचे सर्व भाग दृश्य रूपाने प्रेक्षकांसमोर यावेत व त्याचे कथानक बधिरालाही कळावे. चलचित्रदर्शन प्रयोगाकरिता ज्या कथानकांची निवड केली असते, ती अशाच प्रकारची असतात."

कोल्हटकरांनी एक अत्यंत महत्वाचा सिद्धांत वरील परिच्छेदात मांडला आहे. नाटक हे दृश्यकाव्य आहे. यात काव्यासोबतच दृक्‌तत्वाला महत्व आहे किंबहुना ते प्रथम दृश्य आहे, मग काव्य आहे. त्यामुळे नाटकाच्या रचनेत ही दृक्‌प्रत्ययात्मकता अनुस्यूत असली पाहिजे. वाक्यांचे रूपांतर रंगभूमीवर सुयोग्य दृश्यात समर्थपणे झाल्यास आधारभूत वाक्याशिवाय प्रेक्षकाला बोध होऊ शकतो. हा 'दृक्‌बोध' नाटयातील महत्वाचे अंग आहे.

नाटकाचा प्रेक्षकनिष्ठ विचार करताना नटांची संख्या मर्यादित असल्यामुळे नाटकात पात्रे (फार) नसावीत. नाटकात श्वापदांची किंवा पक्षांची कामे नसावीत. नाटकाचा प्रयोग मर्यादित कालात संपवावयाचा असल्यामुळे त्याचे कथानक लहान घ्यावे लागते व प्रेक्षकास कंटाळा येऊ नये म्हणून ते शक्य तितके चटकदार असावे वगैरे पथ्ये त्यांनी सांगितलेली आहेत.

एकंदरीत पहाता नाटयाच्या प्रायोगिक पैलूविषयी त्यांनी फारसे लिहिलेले नसले तरी त्यांना प्रयोगमूल्यांबद्दल जाण होती असे दिसते.

टीपा :—

(१) श्रीपाद कृष्णांनी रंगभूमीच्या तंत्राचा कधी विचार केला नाही....बहुरूपी –वि. म. कोल्हटकर –पृ १३९.

(२) "Kirloskar Company had never any great reputation of acting" दादासाहेब खापर्डे यांच्या डायरीतील ६-२-१९०२ ची नोंद. सुविख्यात किर्लोस्कर कंपनीची ही अवस्था तर इतरांबद्दल बोलायलाच नको.

काही इसम (मराठी रंगभूमीवरील) गायन व अभिनय यात कुशल आहेत पण असे इसम फार थोडे

(पुढील मजकूर पुढील पानावर)

माझे टीकालेखनांतील काही अनुभव

—श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आपल्या 'साहित्य-शलाका' या टीकालेखांच्या नवीन पुस्तकाला २२ पानांचे विस्तृत निवेदन लिहिलेले आहे. त्यातील काही भाग खाली दिला आहे.

या पुस्तकात कादंबऱ्या, नाटके आणि विनोदी पुस्तकें यावरील त्यांच्या २७ टीकालेखांचा संग्रह केलेला आहे.

१९२६ च्या मार्च–एप्रिलमध्ये महाराष्ट्रीय ज्ञानकोशावरील माझी समालोचक लेखमाला 'महाराष्ट्रा'-तून प्रसिद्ध झाली. 'महाराष्ट्र' कचेरीत नेहमी येणारे एक साहित्यपंडित माझे ते लांबलचक लेख वाचून कंटाळले आणि मला म्हणाले, "भाऊसाहेब, तुमच्या परीक्षणातून परीक्ष्य ग्रंथाच्या गुणदोषदर्शनापेक्षा अनावश्यक तुलना आणि अवांतर माहितीचा पाल्हाळच फार असतो बुवा!" माझ्या 'वाङ्मयविलास' या पुस्तकात समाविष्ट केलेली ही लेखमाला जर वाचकांनी चाळून पाहिली, तर त्या साहित्यपंडितांचा तो अभिप्राय किती समर्पक होता, याची त्यांना कल्पना येईल. मी त्या वेळी त्यांना काहीच उत्तर दिले नाही. पण, अशा प्रकारची परीक्षणे गेली बावीस वर्षे मी का लिहीत आलो, हे आज थोडक्यात सांगत आहे.

'ज्ञानकोशा'वरील ज्या लेखमालेच्या पाल्हाळाला त्या साहित्यपंडितांनी नाक मुरडले, ती लेखमाला मूळ १९२१ च्या सप्टेंबरमध्ये 'केसरी'तून प्रसिद्ध झाली होती. 'महाराष्ट्रा'तील लेखमाला ही तिची परिश्रमपूर्वक सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ती होय. 'हिंदुस्थान आणि जग' हा 'ज्ञानकोशा'चा पहिला प्रास्ताविक खंड ज्या वेळी 'केसरी'कडे अभिप्रायार्थ आला, त्या वेळी मी श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याजवळ रहात होतो. तो खंड त्यांनी स्वतः चाळून नंतर मला दिला; व त्याबरोबरच, 'महाराष्ट्रीय ज्ञान-

---

(मागील पानावरून)

बसून वहुतेक नाटक मंडळींत सर्व खोगिरभरतीच विशेष - मराठी रंगभूमी —आ. वि. कुळकर्णी —पृ. १४४.

(३) अभिनयाच्या बाबतीत प्रत्येक जण पदातल्या प्रत्येक शब्दाचे ॲक्टिंग करी. ती पद्धत चांगली की वाईट याची चर्चा करीत नाही, पण जी होती ती उत्तम रीतीने किर्लोस्करांतच दिसे. इतर ठिकाणी निरनिराळ्या रीतीने हात झिझाडण्यापलिकडे कसलाच अभिनय नसे — माझी भूमिका : नवी आवृत्ती— बोडस–पृ. ४४.

(४) काही एक शब्दोच्चार न करता केवळ शरीरविक्षेपाने आपला मनोभाव इतरांस कळविणे किंवा अंतर्विकार बाहेर दाखविणे याचे नाव अभिनय आणि विवक्षित रीतीने शब्दाचे उच्चार करून त्यावरून आपले मनोगत किंवा मनोविकार प्रगट करणे याचे नाव भाषण होय. अभिनय दाखवावयाचे असतात आणि भाषणे ऐकावयाची असतात–नटास उपदेश– —अनंत वामन वर्वे —इंदुप्रकाश ४-८-१९०२.

कोशा'चा उपक्रम हा मराठीत अगदी अभिनव असल्यामुळे, ज्ञानसंकलनाच्या अशा प्रयत्नांची आणि प्रकारांची पूर्वपीठिका देऊन, केतकरांच्या या उपक्रमाविषयी मराठी वाचकवर्गात उत्सुकता आणि आदर उत्पन्न होईल, अशा धोरणाने 'केसरी'त त्याचे समालोचन केले पाहिजे, अशी सूचनाही त्यांनी केली. त्यानंतर केळकरांनी, वृत्तपत्रांतील परीक्षणांच्या स्वरूपविषयीच्या आपल्या कल्पना मला सांगून, त्या खंडाच्या समालोचनाची कच्ची टिपणें मजकडून तयार करवून घेतली. त्या टिपणांच्या आधाराने मी 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'वर १९२१ च्या सप्टेंबरमध्ये 'केसरी'त दोन आणि १९२६ च्या मार्च–एप्रिलमध्ये 'महाराष्ट्रा'त तीन लेख लिहिले.

श्री. तात्यासाहेबांनी त्या वेळी ज्या सूचना मला केलेल्या होत्या, त्या माझ्या अजूनही चांगल्या स्मरणात आहेत. त्या सूचनांचा आशय असा होता की, "मराठी भाषेला राजाश्रय नाही, विद्यापीठात मान नाही व लोकांच्या निरक्षरतेमुळे आणि दारिद्र्यामुळे त्यांचाही आश्रय मिळू शकत नाही. म्हणून, मराठी वृत्तपत्रांनीच तिच्या आश्रयदात्याची भूमिका स्वीकारून, नवीन ग्रंथ, ग्रंथकार आणि वाङ्मयप्रकार यांना तारतम्याने पण दक्षतेने प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रंथांचे कडक, विस्तृत परीक्षण करावयाला 'विविधज्ञानविस्तारा'सारखी मासिके आहेतच. वृत्तपत्रांतील परीक्षणे होता होई तो कडक असू नयेत. त्यांत दोषांचे दिग्दर्शन आणि गुणांची बूज सहृदयतेने केलेली असावी; व त्याबरोबरच,ग्रंथाच्या वाचनाने आपल्याला सुचलेले विचार आणि त्यांतील प्रतिपाद्य विषयाची आपल्याला असलेली स्वतंत्र माहिती त्या परीक्षणांत देऊन, ग्रंथकार आणि वाचकवर्ग या दोहोंच्याही ज्ञानांत शक्य तोवर भर घालावी." तात्यासाहेबांच्या जवळ असताना, १९२१–२२ साली, 'केसरी'त जी थोडी परीक्षणे मी लिहिली, ती सामान्यतः याच धोरणाने लिहिलेली आहेत.

त्यानंतर १९२२–२३ साली, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या पुणे येथील निवासात राहात असताना, तेथील वाचनालयात येणाऱ्या 'स्पेक्टेटर', 'नेशन' 'न्यू स्टेट्समन अँड नेशन', 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज' 'मँचेस्टर गार्डियन', 'लंडन टाइम्स'ची वाङ्मयपुरवणी वगैरे वृत्तपत्रांतील आणि नियतकालिकांतील पुस्तकपरीक्षणे आणि साहित्यचर्चा मी नेमाने वाचीत असे. वृत्तपत्रातील समालोचनासंबंधी तात्यासाहेबांनी केलेल्या सूचना या ब्रिटिश नियतकालिकात येणाऱ्या परीक्षणांच्या पद्धतीला बव्हंशी धरून आहेत, हे लगेच माझ्या लक्षात आले. या साऱ्या परीक्षणांतून परीक्ष्य ग्रंथ आणि ग्रंथकार यांचा थोडक्यात परिचय, ग्रंथाचे गुणदोषदिग्दर्शन, ग्रंथाच्या वाचनाने सुचलेले विचार, प्रतिपाद्य विषयाची ग्रंथात न आलेली पण परीक्षकाला असलेली माहिती, सदृश ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्याशी सूचक तुलना, ग्रंथातील तत्त्वांची किंवा सिद्धांतांची साधक बाधक चर्चा इतके मुद्दे सामान्यतः असत; व ही परीक्षणे वाचल्यावर, आज आपल्याला एक नवा ग्रंथ आणि ग्रंथकार यांचेच केवळ ओळख झाली असे नव्हे, तर एका नव्या विषयाचेही मार्मिक परिज्ञान झाले, असे मनाला वाटत असे. ब्रिटिश नियतकालिकांच्या या सहृदय आणि व्यापक परीक्षणपद्धतीचा परिणाम माझ्या समालोचनशैलीवर पुष्कळच झाला

१९२४ च्या जुलैमध्ये जेव्हा मी मुंबईहून नागपुरास यावयाला निघालो, तेव्हा माझे गुरु कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांना मुद्दाम पत्र पाठवून माझ्या भावी कर्तव्यासंबंधी मी त्यांचा सल्ला विचारला होता. त्या वेळी मला लिहिलेल्या सूचक उत्तरात तात्यासाहेबांनी, नागपूर–वऱ्हाड प्रांत हा पुण्या-मुंबईच्या मानाने मागासलेला असल्यामुळे, या प्रांतातील वाङ्मयाला उत्तेजन मिळेल आणि वाङ्मयाभिरुची वाढीला लागेल, असे माझ्या वाङ्मयविषयक लेखांचे आणि विशेषतः पुस्तकपरीक्षणाचे धोरण असावे, असा सल्ला मला दिला होता. 'महाराष्ट्रा'त येणाऱ्या माझ्या वाङ्मयचर्चात्मक लेखांविषयीचे आपले विचार ते मला दक्षतेने कळवीत असत. १९३१ साली ते आजारी पडेपर्यंत त्यांची टीकात्मक पत्रे मला बहुतेक नेमाने आली. त्यांच्या या सतत येणाऱ्या पत्रांचाही परिणाम माझ्या परीक्षणपद्धतीवर झाला. 'त्रिदल' या काव्यसंग्रहाचे 'महाराष्ट्रा'त आलेले कडक परीक्षण त्या वेळी फार गाजले. त्या परीक्षणात 'त्रिदला'वर तोंडपुजे अभिप्राय देणाऱ्या इतर अनेक साहित्यशौंडांबरोबर मी तात्यासाहेबांचीही संभावना केलेली होती. तरीही ते परीक्षण त्यांना अतिशय आवडले, पण, विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी यांच्या 'धर्मरहस्य' या ग्रंथावर, केवळ बुद्धिवादाच्या भूमिकेवरून, मी केलेली प्रतिकूल टीका मात्र त्यांना

रुचली नाही. खुद्द त्यांच्या स्वतःच्या 'शिवपावित्र्य' आणि 'परिवर्तन' या नाटकांचे जे अंशतः अननुकूल परीक्षण मी केलेले होते, त्यासंबंधी त्यांनी मला लिहिलेल्या उपरोधिक पत्रातील टोमणे अद्यापही मी विसरलो नाही ते मला नेहमी सांगत की, "एकादा ग्रंथ किंवा ग्रंथकार यांच्या तात्त्विक भूमिकेवर टीका करावयाची असली किंवा त्यांचे दोष दाखवावयाचे झाले, तर ते शक्य तोवर उपरोधाच्या आश्रयाने दाखवावेत; उघड हल्ला होता होईल तो करू नये." पण, 'हिंदु धर्म आणि सुधारणा', 'मुक्ता' वगैरे त्यांच्या स्वतःच्या टीकालेखांतून जो सुंदर उपरोध आणि उपहास आढळतो,तशा प्रकारची टीका करावयाला जो विनोदाची देणगी अवश्य असते, ती मला लाभलेली नसल्यामुळे मला त्यांच्याप्रमाणे उपरोधिक छद्मी टीका लिहिणे फारसे कधी साधले नाही.

वृत्तपत्रातील माझे पहिलें परीक्षण, १९२१ सालीं मुंबईच्या' इंदुप्रकाश' दैनिकात, श्री. आनंदराव टेकाडे यांच्या 'आनंदगीता'च्या पहिल्या भागावर आले असावें, असे स्मरते. प्रो. न. र. फाटक हे त्या वेळी 'इंदुप्रकाश'चे संपादक होते; व त्यांच्या प्रोत्साहनानें मी कांही परीक्षण त्या दैनिकात लिहिलीं. त्यांना माझी परीक्षणपद्धती अगदीच मिळमिळीत वाटत असे. ते स्वतः पट्टीचे टीकाकार आहेत; व त्यांच्या टीका-लेखांतून बहुश्रुततेप्रमाणेच जलाल उपरोधहि भरलेला असतो. कै. ल. रा. पांगारकर यांचा 'आनंदलहरी' हा काव्यसंग्रह आणि 'तुकाराम-चरित्र' यांची जी अत्यंत कडक परीक्षणे त्यांनी 'इंदुप्रकाश'तून केली, ती त्या वेळी पुष्कळच गाजली होती. 'इंदुप्रकाश' नंतर १९२१ सालच्या उत्तरार्धात, श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याजवळ असतांना, मी 'केसरी'तही मधून मधून परीक्षणे लिहिली. १९२३ साली माझा 'ज्ञानप्रकाश'शी संबंध आला. पण, माझ्या संपादकत्वाखाली निघालेल्या 'काव्यशास्त्रविनोद' या वाङमयविषयक साप्ताहिक पुरवणीत, परीक्षणापेक्षा माझे स्वतंत्र लेखच जास्त आले. 'इंदुप्रकाश'चे संपादक प्रो. न. र. फाटक यांना माझे लेख मिळमिळीत वाटत; तर 'ज्ञानप्रकाशा'चे संपादक श्री. कृ. ग. लिमये यांना ते झणझणीत वाटत. रे. एडवर्ड्स् यांच्या 'तुकारामबोवांचे धर्मविचार' या ग्रंथावरील माझ्या टीकालेखाच्या कडकपणाबद्दलची आपली नाराजी त्यांनी मला स्पष्ट शब्दांनी बोलून दाखवली होती. प्रो. फाटक हे दणकट आणि झुंजार; तर श्री. लिमये 'हे परांतरासि न लावावा ढका' अशा वृत्तीचे. त्यामुळे, दोघांनाही माझी टीकापद्धती, आपआपल्या परीने, नापसंत असे. 'विविधज्ञानविस्तारा'चे संपादक रा. सा. रा. मोरमरकर यांनाही, प्रो. फाटक यांच्याप्रमाणेच, माझ्या टीकालेखांत कोणत्याही प्रकारचा दंश नाही, हे एक त्यांचे मोठेच वैगुण्य वाटत असे. कारण, ते स्वतः 'विस्तारा'च्या वेष्टनावर जे छोटे छोटे पण मार्मिक अभिप्राय लिहीत, त्यांत विंचवाच्या नांगीतील दाहक विषार ओतप्रोत भरलेला असे.

वृत्तपत्रांप्रमाणेच नियतकालिकांतूनही मी सतत टीकालेखन केलेले आहे. किंबहुना, माझ्या टीकालेखनाला प्रारंभ, १९२० सालच्या जुलैमध्ये, 'नवयुगां'त आलेल्या 'केशवसुतांचा संप्रदाय' या माझ्या पहिल्या टीकालेखाने झाला. 'आधुनिक कविपंचक', 'विष्णु कृष्ण चिपळूणकर' आणि 'विलापिका' हे माझे तिन्ही टीकाप्रबंध अनुक्रमे 'नवयुग', 'उद्यान', 'विविधज्ञान-विस्तार' आणि 'रत्नाकर' या त्या काळच्या चार प्रमुख मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाले. या मासिकांतून मी किरकोळ परीक्षणेही मधून मधून लिहिली. तथापि, 'आधुनिक कविपंचका'नंतर माझे विशेष गाजलेले असे काव्यविषयक विस्तृत टीकालेख जर कोणत्या मासिकातून आले असतील, तर ते श्री. मो. ग. रांगणेकर यांच्या 'अरुण' या छोटया पण मोठया कुशलतेने चालविलेल्या मासिकातून होत. श्री. रांगणेकर यांच्यास्नेहमूलक आग्रहामुळे, 'आंबराई', 'सुधारक' आणि 'यशोधन' या श्री. गिरीश, श्री माधव जूलियन आणि श्री यशवंत यांच्या काव्यग्रंथांची विस्तृत परीक्षणे मजकडून त्या मासिकांत लिहिली गेली. १९२६ साली 'रत्नाकर' काढण्याचे निश्चित होताच प्रो. ना. सी. फडके आणि श्री अ. स. गोखले यांनी मला त्या मासिकात लिहिण्याचे निमंत्रण दिले. 'रत्नाकरा'त जी थोडी परीक्षणे मी लिहिली, त्यांपैकी 'परांगदा' या कादंबरीचे परीक्षण या पुस्तकात दिलेले आहे. १९३८ साली 'मनोहर' नव्या स्वरूपात काढण्याचे ठरल्यावर पुन्हा प्रो. ना. सी. फडके यांनी मला त्या मासिकात नेमाने लिहिण्याची विनंती केली. म्हणून, श्री. शं. वा. किर्लोस्कर यांच्या इच्छेनुसार, मी 'मनोहर' मध्ये त्या वर्षी एकंदर चार टीकालेख लिहिले. तेही या पुस्तकांत समाविष्ट केलेले आहेत. याशिवाय 'प्रतिमा', 'ज्योत्स्ना', 'कला'

अनुक्रमणिका

वगैरे नियतकालिकांतूनही मी पुस्तकपरीक्षणाचे काम मधून मधून केले. वृत्तपत्रे आणि इतर नियतकालिके यांतील परीक्षणपद्धतीत स्थलकालांच्या मर्यादांमुळे साहजिकच फरक पडतो. वृत्तपत्रातील परीक्षण म्हणजे जणू रेडिओवरील गायन. ते गाणे जसे मोजक्या वेळात संपवावे लागते, तसे हे परीक्षण मोजक्या जागेत बसवावे लागते. उलट, नियतकालिकांतील टीकालेखन म्हणजे जणू ख्याल गाण्याची मैफल ! ते प्रसंगी किती लांबू शकते, याचे एकच एक नमुनेदार उदाहरण द्यावयाचे झाले, तर ते श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या 'मनोरंजना'तून क्रमशः आलेल्या 'तोतयाच्या बंडा'वरील प्रचंड टीकेचे देता येईल. प्रस्तुत पुस्तकातील परीक्षणातही हा फरक वाचकांच्या नजरेस आल्याशिवाय राहणार नाही.

× × ×

* महाराष्ट्रात पाश्चात्य रिव्ह्यूच्या धर्तीवरील या आधुनिक टीकापद्धतीचा पाया 'मराठी शालापत्रका'ने घातला, असे म्हणावयाला शंका वाटत नाही. संस्कृत वाङ्मयात पाश्चात्य स्वरूपाची टीकापद्धती नव्हतीच म्हटली तरी चालेल. व्याख्या, टीका यांच्यापासून तो वार्तिक, भाष्य यांच्यापर्यंत टीकेचे जे एकंदर सोळा सत्रा प्रकार संस्कृतात आहेत, ते सगळे फक्त शब्दांची फोड करून अन्वयमुखाने ग्रंथाचा अर्थ आणि आशय विशद करतात, एवढेच. अव्वल इंग्रजी आमदानीतील या संस्कृत टीकापद्धतीचा उत्कृष्ट नमुना दाखवावयाचा झाला, तर तो कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी मराठी भाषेचे पाणिनि म्हणून ज्यांचा यथार्थ गौरव केलेला आहे, ते एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील थोर ग्रंथकार रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या 'केकावली'वरील 'यशोदा–पांडुरंगी' या विद्वत्तापूर्ण सरस टीकेचा दाखवता येईल. दादोबा पांडुरंग हे जसे मराठीचे पहिले वैयाकरण, तसे कृष्णशास्त्री चिपळूणकर हे तिचे पहिले टीकाकार. १८३६ साली प्रसिद्ध झालेल्या दादोबांच्या 'मराठी भाषेच्या व्याकरणा'वर शास्त्रीबुवांनी जे पंचवीस उत्कृष्ट टीकालेख 'मराठी शालापत्रका'त लिहिले, तो आधुनिक टीकापद्धतीचा प्रारंभ होय. १८६१ च्या मेमध्ये, पुणे येथील नॉर्मल स्कूलच्या सुपरिंटेंडेंटच्या संपादकत्वाखाली, 'पुणे पाठशालापत्रक' हे मासिक सुरू झाले. पहिली तीन वर्षे ते शाळाखात्याचे मुखपत्र म्हणून केवळ शिक्षक आणि विद्यार्थी यांना उपयुक्त होईल, अशा रीतीने चालविण्यात येत असे. १८६३ च्या ऑगस्टमध्ये 'मराठी शालापत्रक' असे व्यापक नाव त्याला देण्यात आले; व नॉर्मल स्कूलचे त्या वेळचे सुपरिंटेंडेंट, विख्यात गणिती प्रो. केरो लक्ष्मण छत्रे हे त्याचे संपादक झाले. पण, या मासिकाला वाङ्मयीन स्वरूप आणि प्रतिष्ठा जी प्राप्त झाली, ती त्याचे संपादकत्व ट्रेनिंग कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल महापंडित श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्याकडे १८६५ साली आल्यावर, तेव्हापासून १८७५ च्या डिसेंबरमध्ये सरकारकडून ते बंद करण्यात येईपर्यंत, अकरा वर्षे या मासिकाने, केवळ पुस्तकपरीक्षणाच्या बाबतीतच नव्हे, तर एकंदर साहित्यसमीक्षणाच्या बाबतीतच मुळी प्रशंसनीय कामगिरी बजावली शास्त्रीबुवांच्या 'मराठी भाषेच्या व्याकरणा'वरील टीकात्मक लेखमालेनंतर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे पुढे 'संस्कृत कविपंचक' या नावाने पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले कालिदासादी प्राचीन महाकवींवरील लेख त्यातून क्रमशः वाचकांसमोर आले. चिपळूणकर पितापुत्रांच्या 'शालापत्रका'तील या दोन्ही लेखमाला भावी टीकाकारांना अनेक बाबतीत मार्गदर्शक ठरल्या. त्यांपैकी धाकट्या शास्त्रीबुवांच्या संस्कृत कवींवरील लेखात आणि त्याहीपेक्षा त्या लेखमालेच्या पाठोपाठ सुरू केलेल्या मराठी कवितेवरील नव्या लेखमालेत पाश्चात्य ग्रंथकार, ख्रिस्ती मिशनरी आणि खुद्द शाळाखाते यांच्यावर जो टीकेचा कडाका उडवलेला होता, त्यामुळे त्या खात्याचे तत्कालीन डायरेक्टर चाटफील्डसाहेब हे रुष्ट होऊन त्यांनी ते मासिकच मुळी बंद करून टाकले.

* तथापि, 'मराठी शालापत्रक' जरी अशा रीतीने बंद करण्यात आले, तरी त्याने सुरू केलेल्या नव्या टीकापद्धतीत मात्र काही खंड पडला नाही. कारण, थोरल्या चिपळूणकरांच्या हाती 'शालापत्रक' गेल्यानंतर दोन वर्षांच्या आतच, १८६७ च्या जुलैमध्ये श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांच्या संपादकत्वाखाली, मुंबई येथे 'विविधज्ञानविस्तार' हे मासिक निघू लागले. या मासिकाने १८६७ पासून १९३७ पर्यंत, पुस्तकपरीक्षण आणि साहित्यसमीक्षण यांचे जे दुहेरी कार्य सुमारे ६८ वर्षे केले, त्याला मराठी वाङ्मयाच्या इतिहासात खरोखरी तोड नाही. रामचंद्र भिकाजी गुंजीकर, हरि महादेव पंडित, विष्णु मोरेश्वर

महाजनी, काशीनाथ नारायण साने, राजाराम रामकृष्ण भागवत, चिंतामण विनायक वैद्य, बाळकृष्ण नारायण देव, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नारायण गोविंद चापेकर, मंगेश शिवाजी तेलंग, नीळकंठ बळवंत भवाळकर, गणेश रघुनाथ अभ्यंकर, गोविंद सदाशिव भाटे, हरि गोविंद लिमये, नारायण महादेव भिडे, वामन मल्हार जोशी, बाळकृष्ण अनंत भिडे, नरहर रघुनाथ फाटक, माधव त्रिंबक पटवर्धन यांच्यासारखे धुरंधर टीकाकार या मासिकाला लाभले; व त्यांनी मराठी टीकापद्धती आपल्या विद्वत्तेने, निःस्पृहतेने आणि रसिकतेने अधिकाधिक व्यापक आणि प्रगल्भ केली. 'विविधज्ञानविस्तार' निघाला, त्या वेळी मुंबई शहर हे जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग, विष्णुबुवा ब्रह्मचारी, दादाभाई नौरोजी प्रभृती अव्वल इंग्रजी अमदानीतील नेत्यांनी सुरू केलेल्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय चळवळीचे केंद्र बनलेले होते. पेशवाईत वैभवाला चढलेल्या पुणे शहरावर जी पुराणमतवादाची पकड होती, तिचा पगडा काही इंग्रजी राज्यकर्त्यांनी सतराव्या शतकात पाश्चात्य धर्तीवर वसवलेल्या मुंबई शहरावर पडलेला नव्हता ते पश्चिमाभिमुख बंदर, पाश्चात्य वाणिज्य आणि विचारसंपदा यांची भरतखंडातील मुख्य उतारपेठ म्हणून, झपाट्याने भरभराटीला येत चाललेले होते, त्यामुळे, 'विविधज्ञानविस्तार' हे मासिक, 'इंदुप्रकाश' दैनिकाप्रमाणेच, विष्णुशास्त्री पंडित,, भांडारकर, रानडे, परमानंद, तेलंग, भागवत प्रभृती उदारमतवादी सुधारकांच्या परंपरेत वाढले. हा त्याचा बाणा वाङ्मयाच्या सर्व शाखांत शेवटपर्यंत कायम टिकला. अर्थात् 'विस्तारा'नंतर सात वर्षांनी निघालेल्या 'निबंधमाले'च्या काही बाबतीत प्रतिगामी भासणाऱ्या राष्ट्रवादी प्रखर धोरणाचा नेमस्त प्रतिवादी म्हणूनच 'विस्तार' प्रथमपासून गणला गेला. त्याची ही वाङ्मयीन आणि वैचारिक कामगिरी महाराष्ट्राच्या विकारविकासाच्या इतिहासात गौरवाने उल्लेखिली जाईल. 'विस्तारा'ला पुढे 'मासिक मनोरंजन' (१८९५) 'उद्यान' (१९१०) आणि 'नवयुग' (१९१३) या मासिकांची जोड मिळाली; व मुंबई शहरातील या चार मासिकांनी उदारमतवादाचे धोरण जीवनाच्या सर्व क्षेत्रांत चिकाटीने पुढे चालवले.

* चाटफील्डसाहेबांनी 'शालापत्रक' बंद करण्यापूर्वीच, १८७४ च्या जानेवारीत, धाकट्या चिपळूणकरांनी 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः' हे ब्रीदवाक्य डोळ्यांपुढे ठेऊन, 'निबंधमाला' सुरू केलेली होती. वस्तुतः चिपळूणकर पितापुत्र हे दोघेही अज्ञेयवादी आणि सुधारक. थोरल्या शास्त्रीबुवांनी तर, अव्वल इंग्रजी अमदानीतील सुधारकांप्रमाणे, कोणताही विधिनिषेध मानला नाही, अशी त्यांची ख्याती त्या काळात होती. धाकटे शास्त्रीबुवा हे पित्याप्रमाणे बुद्धिवादी असले, तरी राष्ट्रवादाची जी इतिहासनिष्ठ भूमिका त्यांनी घतलेली होती, त्यामुळे आर्य समाजापासून तो सत्यशोधक समाजापर्यंत सरसकट सगळ्या नव्या सुधारक पंथांचा उपहास करणे, हे त्यांचे नित्य कर्म होऊन बसले; व त्यांच्या बुद्धिवादावर प्रतिगामित्वाइतकी पुटे चढली की, त्यांचा राष्ट्रवाद हा पुराणमतवाद मानण्यात येऊ लागला 'निबंधमाले'पासून स्फूर्ती घेऊन 'निबंधचंद्रिका' (१८८३), 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिका' (१८८७), 'ग्रंथमाला' (१८९४)' 'सरस्वतीमंदिर' (१९०२), 'विश्ववृत्त' (१९०६), 'चित्रमय जगत' (१९१०), 'लोकशिक्षण' (१९१२) इत्यादी जी मासिके निघाली, त्यांचे वाङ्मयीन, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय वगैरे बाबतीत 'विस्तारा'शी वेळोवेळी झालेले सामने आजही उद्बोधक वाटतात; व १८५० पासून १९२५ पर्यंत महाराष्ट्रात चालू असलेल्या वैचारिक संघर्षाची यथार्थ कल्पना त्यावरून येते. 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिका' हे मासिक रामचंद्र भिकाजी जोशी हरि नारायण आपटे आणि गोविंद वासुदेव कानिटकर यांनी काढलेले असल्यामुळे त्याचे धोरण त्यातल्या त्यात उदारमतवादाला अनुकूल होते. पण, प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर यांची 'ग्रंथमाला' आणि 'विश्ववृत्त' ही दोन्ही मासिके, 'निबंधमाले'प्रमाणेच, "स्वधर्म–स्वदेश–स्वभाषादिकांचा । जगीं मान व्हावा असा हेतु साचा ॥' हा उद्देश डोळ्यांपुढे ठेवूनच मुळी निघालेली होती. 'सरस्वतीमंदिरा'चे संपादक श्री. वामन रामचंद्र जोशी हे आर्य सभेचे संस्थापक होते; व त्याचे सहसंपादक श्री. नारायण कृष्ण गद्रे हे तर मुळी कडवे सनातनीच! श्री. जोशी हे पुढे सी. आय्. डी. चा ससेमिरा चुकविण्यासाठी १९१७ च्या सुमारास प्रार्थना समाजाचे सदस्य झाले. 'आर्यन् एज्युकेशन सोसायटी'-

अनुक्रमणिका

च्या शाळेचेही ते काही दिवस प्रिन्सिपॉल होते. 'ग्रंथमाला', 'सरस्वतीमंदिर' आणि 'विश्ववृत्त' या तीन मासिकांच्या लेखकवर्गात विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, श्रीपाद दामोदर सातवळेकर, वासुदेव दामोदर मुंडले, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, नारायण रंगनाथ अळेकर, बाळकृष्ण अनंत भिडे, नारायण गोविंद चापेकर यांच्यासारखी पुराणमतवादी मंडळी होती. प्रो. वामन मल्हार जोशी हे तर 'विश्ववृत्ता'चे मुळी सहसंपादकच होते.

* उदारमतवादी आणि पुराणमतवादी असे ज्यांचे वर्णन ढोबळ मानाने करता येईल, त्या या मासिकांनी पुस्तकपरीक्षणाचे आणि साहित्यसमीक्षणाचे असे दुहेरी काम, आपआपल्या कल्पनांनुसार, ज्या अधिकाराने, प्रामाणिकपणाने आणि सडेतोडपणाने केले, त्याला तुलना नाही. त्या जुन्या काळात 'निबंधमाला' आणि 'सरस्वतीमंदिर' या दोन मासिकांनी, अनुक्रमे १८७४ साली 'ग्रंथांवर टीका' व १९०४ साली 'टीका, टीकाकार आणि टीकेचे विषय' हे लेख प्रसिद्ध करून, टीकाशास्त्राची तत्त्वे विशद केल्यामुळे, अनेक होतकरू तरुण लेखकांना मराठीत नव्याने सुरू झालेल्या साहित्यसमीक्षेच्या या शाखेची पुष्कळच चांगली कल्पना आली; व टीकाकार हा किती विद्वान, बहुश्रुत, मार्मिक निःपक्षपाती आणि जबाबदार असला पाहिजे, त्यांच्या मनावर बिंबले. चिपळूणकरांनी 'माले'च्या पंधराव्या अंकातील 'ग्रंथांवर टीका' या आपल्या निबंधात जी पुस्तकपरीक्षणाची प्रमेये विवेचिलेली होती. त्यांना धरून 'माले'तील त्यांची स्वतःची बहुतेक परीक्षणे आहेत, असे म्हणावयाला हरकत वाटत नाही.

* चिपळूणकरांनी राष्ट्रवादाच्या ईर्ष्येने दुर्मतध्वंसनार्थ म्हणून तत्कालीन सुधारकांचा जो बेसुमार उपहास 'निबंधमाले'तून केला, त्यातून उत्पन्न झालेल्या वादात या मासिकांनी त्यांच्या निधनानंतर तितक्याच ईर्ष्येने भाग घेतला. चिपळूणकरांचे धाकटे बंधू श्री. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनी लिहिलेले त्यांचे चरित्र प्रसिद्ध झाल्यावर, श्री. बा. ना. देव यांनी 'ग्रंथमाले'च्या १९०० च्या जूनमधील अंकात त्याचे विस्तृत परीक्षण केले. त्या परीक्षणावर श्री. वा. दा. मुंडले यांनी 'ग्रंथमाले'तून तितकीच विस्तृत कडक टीका केली. तिची हजेरी श्री. देव यांनी, 'ग्रंथमाले'च्या १९०२ च्या जानेवारीतील अंकात, ७८ पृष्ठांचा प्रदीर्घ लेख लिहून घेतली. 'ग्रंथमाले'तून झालेला हा वादविवाद आजही वाचण्यासारखा आहे. राजवाडे यांचे संशोधन आणि व्युत्पत्त्या यांची 'विस्तारा'तून वेळोवेळी आलेली विदारक विचिकित्सा, संतांची कामगिरी, महाराष्ट्रधर्म यांच्यासंबंधी माजलेले वादंग, ब्रह्मेंद्रस्वामीच्या कामगिरीविषयी पारसनीस, राजवाडे आणि अळेकर यांच्यात झालेला सामना, मोरो केशव दामले यांच्या शास्त्रीय मराठी व्याकरणाचा गोव्यातील 'प्राचीप्रभा' मासिकांतून राजवाडे यांनी घेतलेला परामर्श, आधुनिक कवितेच्या योग्यायोग्यतेबद्दल उडालेली खडाजंगी, यमक–निर्यमकाची गद्यपद्यातून रंगलेली चर्चा, 'वीरतनय', 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'मतिविकार', 'प्रेमाभास' इत्यादी नाटकांवर झालेला टीकेचा भडिमार वगैरे त्या काळातील साहित्यसंगराने 'विविधज्ञानविस्तार', 'ग्रंथमाला', 'सरस्वतीमंदिर', 'विश्ववृत्त, 'प्राचीप्रभा', 'मासिक मनोरंजन' इत्यादी मासिके व्यापलेली दिसतात. इतकेच नव्हे, तर 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश', 'सुबोधपत्रिका', 'केसरी' वगैरे साप्ताहिकांनी आणि दैनिकांनीदेखील या संगरात हिरीरीने उडी घेतल्याचे पाहून आचंबा वाटतो. १९१५ च्या जूनमध्ये लो. टिळक यांचे 'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यावर, टिळकाभिमानी आणि आचार्याभिमानी अशा जुन्या–नव्या आणि सुधारक-सनातनी विद्वानांत जे तुंबळ वादरण. १९२० च्या ऑगस्टमध्ये लोकमान्यांचे देहावसान होईपर्यंत, सतत झाले, त्याला तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासात उपमान सापडणे कठीण.

× × × ×

* साठ वर्षांपूर्वीच्या त्या पारतंत्र्याच्या बिकट काळात देखील आमच्या मराठी मासिकांना आणि वृत्तपत्रांना, ब्रिटिश नियतकालिकांइतकीच, आपल्या अंकात पुस्तकपरीक्षणाचे सदर असले पाहिजे आणि ते जबाबदार, बहुश्रुत लेखकांकडेच सोपविले पाहिजे, याची तीव्र जाणीव होती. त्यामुळे, १९२१ च्या फेब्रुवारीत श्री. तात्यासाहेब केळकर यांची आणि माझी जी पहिली भेट मुंबई येथे सरदारगृहात झाली, तीत त्यांनी मला असा प्रश्न विचारला होता की, "मी तुम्हाला 'केसरी'त पुस्तकपरीक्षणाचे काम दिले, तर तुम्ही ते कराल का ? मला त्या कामासाठी तुमच्यासारखा स्वतंत्र व्यासंगी माणूस हवा आहे." या त्यांच्या सूचनेनुसार मी मुंबईस असताना आणि नंतर १९२१ च्या जुलैमध्ये पुण्यास त्यांच्याजवळ रहावयाल

गेल्यानंतर, अनेक पुस्तकांची परीक्षणें 'केसरी'त लिहिली. पुढे, १९२२ च्या नोव्हेंबरअखेर मी पुण्यास सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीत गेल्यावर, १९२३ च्या मार्चमध्ये, 'लंडन टाइम्स' वगैरे ब्रिटिश दैनिकांच्या लिटररी सप्लिमेंटच्या धर्तीवर, 'ज्ञानप्रकाश' दैनिकाची 'काव्य-शास्त्रविनोद' ही साप्ताहिक पुरवणी, माझ्या संपादकत्वाखाली, सुरू करण्यात आली. त्या पुरवणीतही मी, इतर लेखनाप्रमाणे, पुस्तकपरीक्षणाचे काम केले, त्यानंतर, १९२४ च्या जुलैमध्ये 'महाराष्ट्रा'चे संपादक श्री. दादासाहेब ओगले यांची आणि माझी जी पहिली भेट, मुंबई येथे एम्पायर हिंदु हॉटेलमध्ये झाली, तीत त्यांनी मला असे स्पष्टच सांगितले की, "आमच्या 'महाराष्ट्रा'तले पुस्तकपरीक्षणाचे सदर सांभाळण्या-साठी कोणी तरी कसलेला बहुश्रुत तरुण लेखक मला हवा होता. 'आधुनिक कविपंचक' आणि 'चिपळूणकर' ही तुमची दोन्ही पुस्तके मी वाचलेली आहेत. त्यामुळे, नानासाहेब बेहेऱ्यांनी तुमच्या नावाची शिफारस केल्याबरोबर, मी तारेने माझी संमती त्यांना कळविली आणि लगेच तुम्हालाही तार केली. इतर संपादकीय काम तुम्ही करावयाचे की नाही, हे आपण मागाहून पाहू. पण हे पुस्तकपरीक्षणाचे काम मात्र तुम्ही दर आठवड्याला नियमाने केले पाहिजे."

श्री. ओगले यांच्या इच्छेनुसार मी 'महाराष्ट्रा'त, १९२४ च्या सप्टेंबरपासून १९४३ च्या डिसेंबरपर्यंत, सतत एकोणीस वर्षे साहित्यसमालोचनाचे काम केले. ता. २७ ऑगस्ट १९२४ रोजी मी नागपुरास येऊन 'महाराष्ट्रा'च्या संपादकमंडळात दाखल झालो; व ता. ३ सप्टेंबरच्या अंकात सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे यांच्या 'केवळ ध्येयासाठी' या अनुवादित कादंबरीवर माझा पहिला टीकालेख प्रसिद्ध झाला. तो या पुस्तकात दिलेला आहे. महाराष्ट्रा'तील माझ्या वाङ्मयविषयक लेखांपेक्षा माझे राजकीय विषयांवरील लिखाण किती तरी पटींनी अधिक भरेल, ही गोष्ट खरी. पण, अंशतः माझ्या गुरूंकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे आणि अंशतः श्री. दादासाहेब ओगले यांनी दिलेल्या पूर्ण लेखनस्वातंत्र्यामुळे, मी हे परीक्षणाचे काम एक प्रकारच्या ईर्ष्येने केले. १९३९ साली माझे डोळे बिघडल्यामुळे डॉक्टरांनी मला रात्री लेखन–वाचन करण्याची मनाई केली. तेव्हापासून, टीकालेखनासाठी अवश्य असलेले अवांतर वाचन करणे अशक्य होऊन, मला पुस्तकपरीक्षणाच्या कामाविषयी साहजिकच उत्साह वाटेनासा झाला. वाङ्मयाच्या विशाल क्षेत्रावर दृष्टी सदैव चौफेर खेळती असल्याशिवाय आणि जगा-तील नवीन विचारप्रणालींची दक्षतेने ओळख करून घेतल्याशिवाय, ग्रंथपरीक्षण व्यापक बुद्धीने अधिकार-पूर्वक करणे अशक्य आहे, असे मी समजतो. पूर्वी अनेक विषयांच्या अविरत वाचनामुळे हा अधिकार थोडासा तरी आपल्याला असल्याचे जे एक समाधान माझ्या मनाला होते, ते अलीकडे अजिबात नाहीसे झालेले असल्यामुळे, माझे टीकालेखन आपोआपच थांबले. त्यानंतर केवळ एक नियत कर्तव्य म्हणूनच मी 'महा-राष्ट्रा'तील साहित्यसमालोचनाचे काम करीत असे. श्री. कोल्हटकर आणि श्री. लिमये यांच्याप्रमाणे श्री. ओगले यांची वृत्तीही एकंदरीत सौम्यच. त्यामुळे, त्यांनाही ग्रंथ किंवा ग्रंथकार यांच्यावर कडक टीका केलेली आवडत नसे; व 'धर्मरहस्या'वरील प्रतिकूल परीक्षणाबद्दल, श्री. तात्यासाहेबांप्रमाणेच, त्यांनीही आपली नाराजी मजजवळ व्यक्त केलेली होती. पण, श्री. कोल्हटकर आणि श्री. ओगले यांच्या या दुहेरी नियंत्रणाला न जुमानता 'महाराष्ट्रा'तून मी अनेक ग्रंथांची अत्यंत कडक परीक्षणे केली.

तथापि, मी असे अभिमानपूर्वक प्रतिज्ञेने म्हणू शकतो की, जे आज वाचले असता मनाला पश्चात्ताप किंवा शरम वाटावी असे एकही व्यक्तिद्वेषदूषित किंवा अन्यायी ग्रंथपरीक्षण मी 'महाराष्ट्रा'तून केले नाही. इतकेच नव्हे, तर ज्यांच्या वाणीतून किंवा लेखणीतून माझी निरर्गल नालस्तीच नेहमी बाहेर पडत असे, अशा माझा अकारण दुस्वावा करणाऱ्या सज्जन स्त्री-पुरुषांनी जेव्हा आपली पुस्तके माझ्याकडे किंवा 'महाराष्ट्रा'कडे मुद्दाम आर्जवून अभिप्रायार्थ पाठवली, तेव्हा मी त्यांचाही परामर्श, कोणत्याही प्रकारचा राग किंवा अपेक्षा मनात न ठेवता, गुणग्रहणबुद्धीनेच घेतलेला आहे. 'धर्मरहस्य' 'त्रिदल', 'नवयुगधर्म', 'हिंदूंचे समाज-रचनाशास्त्र', 'अटकेपार, 'सावित्री','ब्राह्मणकन्या', 'खरा देशभक्त', 'मेनका' नाटकावरील टीका' वगैरे पुस्तकां-वर ज्या अत्यंत जलाल टीका 'महाराष्ट्रा'तून आल्या, त्या सर्वथैव तात्त्विक भूमिकेवरून करण्यात आलेल्या होत्या; व म्हणूनच टीकाविषयीभूत ग्रंथकारांशी माझे

स्नेहाचे संबंध कायम राहू शकले. गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रातील अनेक वाङ्मयीन वा व्यक्तिविषयक वादांत मी खेचला गेलेलो आहे. पण त्यांपैकी एकाही वादाचा घ्ररळा 'महाराष्ट्रा'तील साहित्यसमालोचनाच्या उन्नत भूमिकेला मी लागू दिला नाही. वृत्तपत्र-व्यवसायात केव्हा कोणाविषयी काय लिहावे लागेल, याचा काही नेम नसतो. म्हणून, त्या व्यवसायात पडतानाच माझ्या गुरूंच्या आदेशानुसार ज्या काही मर्यादा मी स्वतःला घालून घेतलेल्या होत्या, त्यांपैकी एक अशी होती की, ग्रंथपरीक्षण करताना सदभिरुची आणि न्यायबुद्धी यांचे अवधान केव्हाही सुटू द्यावयाचे नाही. ती मर्यादा गेली एकोणीस वर्षे मी दक्षतेने पाळलेली आहे. मराठी वर्तमानपत्रांच्या कचेरीत तरी कोणतेही खाते सर्वथैव 'राखीव' असे राहूच शकत नाही. त्यामुळे, एकाच्या लिखाणाचा आळ दुसऱ्यावर येऊन, संपादकीय गुपिता'च्या अलिखित संकेतानुसार, त्याचे बरे-वाईट परिणाम पुष्कळदा मुकाट्याने भोगावे लागतात. पण, 'महाराष्ट्रा'चे एकंदर धोरणच मुळी सौम्य आणि संभावित असल्यामुळे, ही मर्यादा सोडल्याचा आळ मजवर यावा, असे प्रसंग सुदैवाने फारसे कधी आले नाहीत.

* 'महाराष्ट्रां'तील काय किंवा अन्य नियतकालिकांतील काय पुस्तकपरीक्षणाचे काम करताना शिष्टाचाराची मर्यादा मी किती काटेकोरपणाने पाळीत असे याची दोन ठळक उदाहरणे देण्यासारखी आहेत. श्री. बापुसाहेब भवाळकर यांच्या 'वेहेन पिरोज' या लघुकादंबरीचे परीक्षण ता. ३ जुलै १९२७ च्या 'महाराष्ट्रा'त आल्यावर, नागपूरच्या बार रूममध्ये तो एक कुचाळीचा विषय होऊन बसला. ही कादंबरी श्री. भवाळकर यांनी जरी टोपण नावावर प्रसिद्ध केलेली होती, तरी ती त्यांनी लिहिलेली आहे, हे बार रूम मधील एक उघड गुपित होते. त्यामुळे, श्री. गोपाळराव देव, श्री. नारायणराव वैद्य, श्री. विश्वनाथराव केळकर, श्री. श्रीरामपंत वैद्य, श्री. बाबुराव हिर्लेकर, श्री. रामभाऊ रुईकर, श्री. गजाननराव ढवळ, रावसाहेब फुले प्रभृती बहुश्रुत वकिलांच्या बैठकीत तर, 'इचिभन पिरोज' असे नामाभिधान तिला बहाल करून, तिच्यातील पात्रे, संवाद आणि मते यांच्या बाबतीत बिचाऱ्या बापुसाहेबांची कसून उलटतपासणी घेण्यात आली. मी केलेले तिचे परीक्षण बुधवारी प्रसिद्ध झाल्यावर रविवारी सकाळी श्री. श्रीरामपंत वैद्य, श्री. बाबुराव हिर्लेकर आणि रावसाहेब फुले हे तिघे माझ्या घरी आले; व श्री. श्रीरामपंतांनी त्या परीक्षणाची, कादंबरीची आणि त्याहिपेक्षा श्री. भवाळकर यांची यथेच्छ टवाळी करणारा लेख माझ्यापुढे ठेवला. मी त्यांना नम्रतेने म्हटले, "आपण दादांना भेटून त्यांना हा लेख द्या. या बाबतीत माझ्या हातात काही नाही." त्याबरोबर, श्री. श्रीरामपंत रागाने मला म्हणाले, "हे पहा भाऊसाहेब, असल्या गोष्टी सांगून तुम्ही उगाच आम्हाला बनवू नका. दादांना न विचारता न दाखवता, बापूच्या गचाळ कादंबरीवर तुम्ही एवढा लंबाचवडा लेख 'महाराष्ट्रा'त छापू शकता आणि आम्हाला मात्र दादांकडे जावयाला सांगता, यातला डाव काय आम्ही समजू शकत नाही ? अहो, या बापूचा सगळा जन्म लोकांच्या कुटाळक्या करण्यात गेला. याने कण्हत कुथत ज्या आठ नऊ कविता साऱ्या हयातीत मोठ्या मुष्किलीने रचल्या, त्यातसुद्धा घुलेशास्त्र्यांसारख्या आपल्या मित्राची बदनामी करणारी 'विवाहाभिनंदन' ही कविता लिहून, ती 'पद्यपद्माकरा'त छापली. म. म. प्रि. केशवराव ताम्हण यांनी तंबी दिल्यामुळे ती त्याला नंतर त्या पुस्तकातून कापून काढणे भाग पडले. अशा इसमाने, पन्नाशीच्या घरात गेल्यावर, स्वैराचाराची तरफदारी करणारी कादंबरी लिहावी आणि तिची तारीफ करण्यासाठी 'महाराष्ट्रा'चे चार-पाच रकाने तुम्ही खर्ची घालावेत, हे तुम्हालाच शोभते. 'महाराष्ट्रा'ने डोक्यावर घेण्याइतका मोठा कादंबरीकार हा 'वर्डीबुद्रुक' कधी झाला ? पण, तुम्ही कितीही झाकापाक केलीत, तरी बापूचा बोजवारा उडवल्याशिवाय आम्ही काही राहाणार नाही !" मी श्री. श्रीरामपंतांचे हे बोलणे हशावर नेले; व लाल मिरच्या आणि लसूण यांची खमंग फोडणी दिलेल्या गरमागरम उकडपेंडी, आंब्याचे गुळातले लसणीचे लोणचे, भरपूर चहा आणि दिल्लीच्या किमामासह बंगला-रामटेक पानांचे स्वादिष्ट विडे देऊन त्यांना वाटेला लावले. सुदैवाने ते परीक्षणाचे परीक्षण नंतर कुठेच आले नाही.

* त्याहिपेक्षा नाजूक प्रसंग श्री. पु. य. देशपांडे यांची 'सदाफुली' ही कादंबरी 'महाराष्ट्रा'कडे परीक्षणार्थ आल्यावर ओढवला. त्या कादंबरीसंबंधी नागपुरात काही वाद-प्रवाद उत्पन्न झाले; व श्री. देशपांडे यांच्या

(पुढील मजकूर पुढील पानावर)

माडखोलकरांची दोन पुस्तकें

--प्रो. स. पां. देशपांडे
९२, जयप्रकाश नगर, गोरेगांव पूर्व, मुंबई, ६३.
दि. २०-११-७०

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांस,

कृ. सा. न. वि. वि. आपला माझा काहीच परिचय नसताना अलिकडेच माझ्या वाचनात आलेल्या आपल्या दोन पुस्तकांनंतर माझ्या मनात येतात ते विचार आपणास लिहून कळविण्याचे धाडस करीत आहे. तथापि, मला वाटते, लेखक आणि वाचक यांच्यात जे अनामिक बंध निर्माण होतात, त्याचा हे पत्र लिहिण्यास पुरेसा आधार आहे. कदाचित असे लिहिण्यामुळे आपल्याशी फाजील सलगी होत असेल किंवा मजकडून मर्यादातिक्रम होत असेल, तर आपण मला उदार मनाने क्षमा करावी, ही विनंती.

आपल्या 'अनघा' कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने आपण लिहिलेली विस्तृत प्रस्तावना सप्टेंबरच्या 'ललित'मध्ये वाचनात आली. आपले हे दीर्घ आत्मनिवेदन म्हणजे आपल्या हातून ही कादंबरी कोणत्या मन:स्थितीत लिहिली गेली याचे जिज्ञासू आणि डोळस वाचकांना आपण घडविलेले यथार्थ दर्शनच होय.

त्यामुळे ही कादंबरी मुद्दाम मिळवून वाचावयाची तीव्र उत्सुकता निर्माण झाली. कादंबरी वाचताना वाचक आपल्या शैलीमुळे नेहमीप्रमाणे त्यात रंगून जातो हे खरं असलं, तरी तिचा वर्ण्य विषय वाचकांवर सतत

(मागील पानावरून)

अगदी निकटच्या मित्रमंडळीतही विकोप उद्भवला. त्यामुळेच कदाचित असेल,--'महाराष्ट्रा'त तिचे जे परीक्षण येईल, ते आपल्याला आधी पहावयाला मिळावे, अशी अपेक्षा सौ. प्रो. कुसुमावती देशपांडे यांनी, त्यांचे स्नेही श्री. शंकर बाळाजी शास्त्री यांच्या-मार्फत, मला कळवली. हा निरोप त्यांनी मला सांगितल्यावर मी तत्काळ असे आश्वासन दिले की, "शंकरराव, मी फक्त कादंबरीवर लिहीन. तिच्यातून जे वाद-प्रवाद उपस्थित झालेले आहेत, त्यांचा उल्लेख मी करणार नाही किंवा तिच्यामागे काय आहे, हेही पहाणार नाही. या बाबतीत आपण अगदी निर्धास्त असा आणि बाईंनाही माझे हे म्हणणे सांगा.'' तरीसुद्धा-परीक्षणाची पहिली मुद्रिते, श्री. शास्त्री यांच्या आग्रहा, नुसार, मी त्यांना दिली; व सौ. प्रो. कुसुमावतीबाई-कडून ती संमत होऊन आल्यावर मगच ते परीक्षण 'महाराष्ट्रा'त प्रसिद्ध झाले. असाच थोडासा प्रकार 'सुकलेले फूल' याही श्री. देशपांडे यांच्या कादंबरीच्या बाबतीत घडलेला होता या दोन प्रसंगां-वरून पुस्तकपरीक्षणाच्या बाबतीतील माझी वैयक्तिक आणि सामाजिक जबाबदारी मी कशा रीतीने पार पाडली, हे कळून येईल.

काही एक वेगळाच परिणाम घडवितो, यात शंका नाही. आपण सुरुवातीला उल्लेखिल्याप्रमाणे श्रीमती अनुसूयाबाई काळे यांच्या प्रतिक्रियेसारखीच काहीशी वाचकाचीही मन:स्थिती होते. मात्र श्रीमती काळे आपल्या परिचयाच्या—कमी अधिक प्रमाणात समकालीन—असल्याने, अभय—अनघा यांचे कॉलेजातील प्रेमप्रकरण म्हणजे तत्कालीन प्रसिद्ध व्यक्तींच्या नाजूक संबंधाची पार्श्वभूमी, हे जसे त्या ओळखू शकल्या, तसे आजच्या तरुणवर्गास लक्षात येणे सुतराम अशक्य. तथापि,त्यामुळे कथानकाचा आस्वाद घेण्यात काही उणेपणा येतो, असे मात्र नव्हे. आपल्या पत्नी असाध्य रोगाने जर्जर होत्या, तरी त्या साक्षात जिवंत असताना त्यांच्या मृत्यूची आगाऊ कल्पना करून कादंबरीच्या नायिकेचा मृत्यू घडवून आणणे, हे केवळ अनाकलनीय नव्हे, तर अंगावर शहारे आणणारे आहे. शिवाय नायिका पूर्वायुष्यात टेनीससारखा खेळ सतत खेळणारी असल्याने, अत्यंत निकोप प्रकृतीची असूनही, लग्नानंतर प्रसूतीमुळे तिच्या प्रकृतीत इतका बिघाड झाल्याचे दाखवून पुढे मृत्यू झाला, हे कथानक म्हणून ठीक असले, तरी मनाला पटणारे नाही. या संदर्भात, ललित साहित्यिकांच्या नेहमीच्या युक्तिवादानुसार, येथे वास्तव घटनेबरोबर लेखकाचा प्रतिभाविलास-कल्पनाविलास लक्षात घेऊनही श्रीमती काळे यांच्याशी झालेल्या संभाषणाचे वेळी मुग्ध राहून अप्रत्यक्ष रीत्या आपण दिलेल्या कबुलीप्रमाणे, स्वत:चे पत्नीबद्दल आपणाला—प्रत्यक्ष त्यांच्या पतीला—हे विलक्षण कथानक कसे गुंफता आले, या गूढाची उकल मानवी मनाच्या पलीकडची वाटते.

बऱ्याच कादंबऱ्यांतून सामाजिक अथवा राजकीय विषयांची चर्चा सहेतुक केली जाते. त्यामुळे लेखकाची प्रतिमा स्पष्ट होते. येथेही श्री. डांगे इ. स्नेह्यांमुळे तेव्हा आपल्या मनावर असलेला साम्यवादी विचारसरणीचा असर अभयच्या तोंडून योग्य प्रकारे व्यक्त झाला आहे.परंतु, ज्या गोष्टीचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. ती म्हणजे, पान १११ वरील महाबळेश्वर शिबिरात, अभय आणि कार्यकर्ते यांच्यात पाकिस्तानसंबंधी झालेल्या चर्चेचा. आज तेवीस वर्षांनंतरदेखील ती पूर्णतया खरी ठरली नसली—तसेच दोन्ही बंगालचे अद्याप एकीकरण झालेले नसले—तरी तेथे प्रदर्शित केल्याप्रमाणे याआधीच पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी सरकार आल्याने, मर्यादित अर्थाने का होईना, वीस वर्षांपूर्वी या कादंबरीत आपण केलेले भाकित खरे ठरले आहे. यावरून आपली दूरदृष्टी किती अचूक ठरली, याचे प्रत्यंतर येते. तसेच राजकारण या विषयात—जरी पत्रकारास त्याचा अभ्यास अटळ असतो तरी—आपली गती किती सखोल आहे, याची प्रचिती येते. मात्र त्याच संवादातील उर्वरित भाग अद्याप खरा ठरावयाचा असला, (केव्हा खरा ठरतो तो ठरो) तरी तो केवळ अखंडवाद्यांच्या आग्रही भूमिकेतून आपण मांडला नसून, तो आपल्या वस्तुनिष्ठ दृष्टीचा निदर्शक होय, असे मी समजतो.

आपल्या देशातल्या देशातसुद्धा प्रवास करून निसर्गसौंदर्याचा आनंद लुटणे सर्वानाच जमते असे नव्हे. तेव्हा ग्रंथांच्या माध्यमाने ज्ञान आणि मनोरंजन याबरोबर लेखकाने वाचकास निसर्गसौंदर्याचा आनंद लाभू देणे हे मी एक प्रकारचे लोकशिक्षण समजतो. या कादंबरीत आपण हे कार्य फारच चोखपणे बजाविले आहे. पचमढीचे निसर्गसौंदर्य अत्यंत कुशलपणे वर्णन करून वाचकांना जटाशंकर, छोटा आणि मोठा महादेव यांसारख्या निसर्गाच्या कुशीत वसलेल्या देवस्थानांना, तसेच चौरागड या सातपुड्याच्या अत्युच्च शिखरावर नेण्यात आणि अंधकोह या घळीचे दर्शन घडविण्यात आपण अत्यंत यशस्वी झाला आहात. इतके की, पचमढीला न गेलेल्या वाचकांस आपण केव्हा जाऊ असे तीव्रतेने वाटावे.

शेवटी मैदानी वा मर्दानी खेळ खेळणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत, आपण दाखविल्याप्रमाणे, उत्तरायुष्यात गर्भधारणेबाबत असा काही विक्षेप खरोखरी निर्माण होत असेल, तर ती एक मोठीच चिंतनीय बाब म्हणावयाची. यासंबंधी सांख्यिकीच्या सहाय्याने वैद्यकीय निष्कर्ष काय आहेत, त्याचा तलास लावण्याची आवश्यकता वाटते. कदाचित आपण ह्यापूर्वीच याचा शोध घेतला असावा. परंतु माझ्याबरोबर १५।१७ वर्षांपूर्वी कॉलेजात असताना सतत टेनीस खेळणाऱ्या १।२ मुलींच्या—ज्या आता माता आहेत इतकेच नव्हे तर अत्यंत निकोप प्रकृतीच्या आणि प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या अशा—बाबत असा काही विक्षेप निर्माण झाल्याचे कानांवर नाही. असो.

अशा प्रकारे काही सामाजिक, राजकीय तसेच स्त्री-जीवनविषयक प्रश्नांची चर्चा केलेल्या आपल्या ह्या जुन्या कादंबरीच्या नव्या आवृत्तीला आपण

लिहिलेल्या प्रस्तावनेमुळे चालू पिढीला चर्चा करण्याची आपण संधी उपलब्ध करून दिलीत,त्याबद्दल धन्यवाद!

'अनघा' कादंबरी परत करून नवे पुस्तक आणते वेळी 'कोल्हटकर व्यक्तिदर्शन' हे आणखी एक आपलेच पुस्तक मिळावे,हा योगायोगच म्हणावयाचा. तुलनात्मक दृष्टया अलिकडेच बाहेर आलेले आणि चर्चा झालेले हे पुस्तक असल्याने वाचण्याची आतुरता होतीच.

ह्या पुस्तकांत आपण आपल्या गुरूंच्या ज्या बऱ्याच रोचक आठवणी दिल्या आहेत, त्यातून त्यांच्या स्वभावाचे बरेचसे कंगोरे स्पष्ट होतात. तसेच त्यांच्या रसनेची सूक्ष्मताही प्रकट होते. याशिवाय त्यांच्या सहवासात असताना,निरनिराळ्या प्रसंगाने आपल्याशी झालेल्या त्यांच्या संभाषणातून अथवा इतर अनेक लहानमोठ्या व्यक्तींशी झालेल्या चर्चेतून, त्यांची साहित्यविषयक मते आणि समीक्षेबाबतची त्यांची तसेच आपली विस्तृत भूमिका यांचा फार उत्तम प्रकारे बोध होतो. विशेषत:, कॅथार्सिस आणि ह्यूमर ह्यांचा मागोवा घेतांना दिसून येणारी त्यांची चिकित्सक आणि मूलभूत अभ्यासू वृत्ती. प्रो. ताकाखाव यांच्यासारख्या इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासकाने त्यांच्या व्युत्पत्तीवर शिक्कामोर्तब केलेला वाचून त्यांच्या चिकित्सक वृत्तीविषयी आदर वाटतो. प्रत्येक शब्दाचा असा पिच्छा पुरविला, तर अनेक शब्द नाकारावे लागतील, हे श्री. डांगे यांनी या संबंधात व्यक्त केलेले मतही व्यवहारात फार महत्त्वाचे ठरते. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांशी झालेल्या आपल्या अर्थपूर्ण संवादातून, पुण्या-मुंबईकडील मान्यवर साहित्यिकां-ऐवजी आडगावी राहूनही कोल्हटकरांना शिष्य-प्रशिष्य लाभून एक संप्रदाय कसा निर्माण झाला, यावर प्रकाश पडतो. तसेच कोल्हटकरी संप्रदायाचे वळण पुढील साहित्यिकांत कसे संक्रांत झाले, ते देखील स्पष्ट होते.

अखेर त्यांच्या संगीतातील योग्यतेसंबंधी, प्रसिद्ध हार्मोनियमपटू कै. गोविंदराव टेंबे आणि महाराष्ट्र-कोकील शंकरराव सरनाईक ह्या दोघांना त्यांनी पदांच्या चाली देऊन मेहनत करवून घेतली, हे वाचून कोल्हटकरांच्या संगीतातील अधिकाराबाबतची खात्री पटते. विशेषत:, "पटवर्धन" नाटकाच्या पदाच्या चाली बसवितांना, पदाची गेयता उत्तम व्हावी म्हणून अधिक समर्पक शब्दांची तेथल्या तेथे योजना करून आणि नंतर त्या स्वत:च्या गळयातून काढून दाखवून मग त्या गोविंदरावांच्या सारख्या मान्यवराचे गळयावर चढविण्याची किमया करणे केवळ अलौकिक होय! तसेच शंकरराव सरनाईक यांचे, त्यांच्या संथा देण्यासंबंधीचे, उद्‌गारही कोल्हटकरांचे या क्षेत्रातील कर्तृत्व उंचावणारे आहेत. याचा अर्थ, संगीतातील त्यांचे स्थान हे केवळ जाणकार रसिक म्हणून मर्यादित नव्हते, तर त्यापेक्षा काही अधिक होते. तशी संगीताची जाणकारी बऱ्याचजणां-च्यात असते. परंतु येथे तर कोल्हटकर स्वत:च्या गळयातून मींड, मुरक्या, ताना इ. काढून दाखवीत, तेव्हा या सर्वांतून एक गोष्ट स्वच्छ होते, ती म्हणजे त्यांनी आपल्या पूर्वायुष्यात संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले असले पाहिजे. मात्र त्याचा खुलासा या व्यक्ति-दर्शनात कोठेही होत नाही. तेव्हा अशा प्रकारे त्यांनी एखाद्या गुरूकडे खरोखर शास्त्रीय रीतीने शिक्षण घेतले होते का? असल्यास ते कोणाकडे? आणि किती काळ? मला वाटते,ही माहिती जिज्ञासू वाचकांस कळविण्यास हरकत नसावी. या विषयावर आपणा-शिवाय दुसरे कोण प्रकाश पाडू शकेल?

सारांश, कोल्हटकरांच्या व्यक्तिमत्वाचे बहुविध पैलू अतिशय कौशल्याने आपण दाखविले असून, त्यावरून समकालीन साहित्यिकांपेक्षा त्यांचे मोठेपण कशात आहे, त्याचा उत्तम बोध होतो. पुस्तकाचा विषय कथा–कादंबरीसारखा वाचकाला आकर्षून घेणारा नसतानादेखील, आपण समग्र विषय अत्यंत सोप्या, रसाळ आणि शैलीदार भाषेत चटकदारपणे मांडलेला आहे. त्यामुळे पुस्तक वाचताना वाचक त्यात रंगून जातो. यापरते पुस्तकाचे दुसरे यश ते कोणते?

शेवटी, मी कोण आहे? यापेक्षा मी कोण नाही, याचा वरील, आत्मगताने एव्हाना आपणास उलगडा झालाच असेल गणितासारखा आर्ष विषय तांत्रिक शिक्षणाची पदविका घेणाऱ्या विद्यार्थ्यांना (Polytechnic मधील) शिकविणारा-पण साहित्याची आवड असणारा-एवढेच व्यक्तिगत पुरे.

पत्रासारख्या सोयिस्कर माध्यमाद्वारे एवढे हे तपशीलवार निवेदन करून, मी जणू आपल्या सहन-शक्तीचा अंतच पाहिला, असे वाटते. तरी मोकळेपणाने क्षमा करावी.

अखेर शेवटी माझे हे विचार आपल्याला योग्य वाटले आणि इतरांनाही ते समजावेत असे वाटल्यास आपल्या इतर वाचकांस ते कळविल्यास आभारी होईन मात्र तसे मला समजावे ही विनंती. कळावे, तसदी-बद्दल क्षमस्व.

विदर्भ साहित्य संमेलन

अधिवेशन २९ वे   २५ ते २७ डिसेंबर १९७०

नामदार बाळासाहेब भारदे यांच्या वाग्विलासाने फुललेली घटिका—पळे

—प्रभाकर पुराणिक

'आपल्या देशात सर्व जीवनास आवाहन करणारे साहित्य आज हवे आहे. जनजीवनाच्या प्रेरणांना कलापूर्ण रीतीने हात घालणे हे साहित्यिकावर अवलंबून आहे. नव साहित्यिकाने विकास हा मानबिंदू टाकून विलास हाच मानबिन्दू अनुसरला तर ते प्रेरणांचे आवाहन ठरणार नाही. साहित्य विकासक्षम असावे. विलासक्षम साहित्य म्हणजे साहित्य नव्हे. केवळ वास्तवतेच्या मागे लागून चालणार नाही. मरणाचे चित्र रंगवणे म्हणजेच वास्तवता नव्हे. अमरत्वाचे चित्रण हेही वास्तव आहे' असे विचार महाराष्ट्रराज्य विधानसभेचे सभापती आणि गांधी तत्वज्ञानाचे विचारक श्री. बाळासाहेब भारदे यांनी विदर्भ साहित्य संमेलनाच्या वणी येथील एकोणतीसव्या अधिवेशनात अतिशय मार्मिकतेने व्यक्त केले.

ना. भारदे आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणात पुढे म्हणाले की, साहित्य ही महाशक्ती आहे. ती शक्ती सर्वमान्य झालेली आहे. विशेषत: लोकमत परिवर्तन होत असलेल्या या लोकशाहीत तर या शक्तीचा प्रत्यय येत असतो. या देशातल्या लोकशाहीने शक्तीची आवश्यकता मंजूर केलेली नाही; तेथे साहित्याशिवाय लोकजागृती होणे शक्य नाही. साहित्य हे आनंद निर्माणाचं किंवा ज्ञान कल्याणाचं साधन आहे असेच न मानता ते लोककल्याणाचेही साधन या लोकशाहीत ठरते याची जाणीव साहित्यिकांनी ठेवावी.

सर्व महाराष्ट्रीय अभेद्य आहेत हे मराठी थोर साहित्यिकांनी सिद्ध केलेले आहे. ज्ञानोबापासून विनोबांपर्यंत सगळ्या साहित्यिकांनी केवळ महाराष्ट्र एकतेचाच नव्हे तर विश्वैक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य म्हणजे जे माणसाच्या बरोबर असते, सोबत असते ते. किंवा जे चूक नाही, बरोबर आहे ते साहित्य. जीवनाच्या कल्याणाचे जे बोलले जाते, लिहिले जाते किंवा कल्याणकारी भाव ज्याच्यात असतो ते साहित्य; असे नामदार श्री. भारदे म्हणाले.

उत्तम अभिरुची ज्यात आहे ते साहित्य असे सांगून ना. बाळासाहेब भारदे पुढे म्हणाले की, साहित्य ही केवळ आत्मसाधना नव्हे. पूर्वी ज्ञानाकडे आत्मसाधना म्हणून बघितले जात होते. स्वत:ला मोक्ष प्राप्त व्हावा म्हणून ज्ञानसंपादन केले जात होते. परंतु आधुनिक काळात साहित्यिकांनी साहित्य म्हणजे वैयक्तिक साधना न मानता सामाजिक साधना करणे आवश्यक आहे. जीवन हीच कला आहे असे संत मानतात. संतांच्या जीवनात ज्या ज्या प्रक्रिया आहेत त्याचं उद्दिष्ट कल्याण हेच आहे. साहित्याचा किंवा कलांचा विचार करीत असताना या कल्याणकारी प्रक्रियांचा विचार आपल्याला करावा लागेल.

कलेबाबत म्हणताना श्री. भारदे बोलले की, जीवनावर स्वार होण्याचे सामर्थ्य उत्पन्न होते ती कला आहे. मानवी जीवनात ज्ञानानंद भावानंद, फार मोठ्या प्रमाणात सन्मानिला जात असतो.

साहित्यामुळे समाजाचे उद्‌बोधन झाले पाहिजे असे सांगून श्री. भारदे पुढे म्हणाले की, आजच्या

साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडते का ? ते पडले पाहिजे असा आग्रह नाही. परंतु समाजाचे प्रतिबिंब साहित्यात असणे म्हणजेच साहित्य का ? त्याहीपलीकडे जाऊन साहित्यनिर्मिती करावयाची असेल तर लेखकांनो आपल्या अनुभूतीच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. आपल्या साहित्यावर पाश्चात्य साहित्याचा जबर पगडा आहे. पाश्चात्य लोकांच्या पोटाचा प्रश्न सुटला आहे. म्हणून तेथे प्रेम आणि प्रणय याला प्राधान्य आलेले आहे. पण त्याच कसोटया प्रमाण मानून आपण साहित्य निर्मिती करणे सयुक्त नाही. त्या समाजात प्रभावी असलेले परंतु आपल्या समाजात गौण ठरलेले अंग आज आपल्या वाङमयातून अविष्कृत होत आहे. तेव्हा या नव्या वातावरणात जनतेला व्यापक अनुभूतीकडे नेऊ शकेल असे सामर्थ्य साहित्यातून अपेक्षित आहे.

आपल्या भाषणाच्या शेवटी श्री. भारदे म्हणाले की, नव्या साहित्यात जुन्या श्रद्धा आणायच्या नसतील तरीही हरकत नाही. परंतु नव वाङमयात मानवी श्रद्धा झेलण्याचे सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. आजच्या वाङ्मयात मनोविश्लेषणावर अधिक भर असलेला दिसतो. परंतु रोग्याच्या अभ्यासातून निर्माण झालेले मानसशास्त्र आणि योगाच्या अभ्यासातून निर्माण झालेले मानसशास्त्र यात फरक आहे. मरणाचं चित्र म्हणजे वास्तवता नसून अमरत्वाचे चित्रण हे वास्तव आहे.

कुत्र्यामागे तुपाची वाटी घेऊन धावणारा नामदेव आज कुठे आहे ?

'सातशे वर्षापूर्वी कोरडी भाकरी पळवून नेणाऱ्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन नामदेव धावले. परंतु आजचा विकसित समाज माणसाला कुत्र्याप्रमाणे वागवतो हे फार मोठे दुःख आहे. आज सुद्धा जातीभेद कमी झालेले नाहीत. समाज बदलला की नाही त्यापेक्षा समाज बदलण्याची प्रक्रिया प्रभावीपणे साहित्यातून मांडली जाते की नाही हे महत्त्वाचे आहे. आपल्या देशात संस्काराची आवश्यकता आहे. विज्ञानाने संस्कार होत नाहीत. विज्ञानामुळे आपण अंतरळात जाऊ शकतो पण आत्मज्ञानाने माणसाच्या अंतरंगात प्रवेश करू शकतो.' असे प्रभावी विचार श्री. बाळासाहेब भारदे यांनी साहित्य संमेलनात 'संत नामदेव' या विषयावर झालेल्या परिसंवादातून व्यक्त केले.

संत नामदेवावर बोलताना श्री. भारदे यांनी समारोपात साहित्यासंबंधी वरील विचार व्यक्त केले.

संत नामदेव हे जन्मतःच भक्त होते असे सांगून श्री. भारदे पुढे म्हणाले की, त्यांची भक्ती ही सहज भक्ती होती. संत नामदेव म्हणजे मराठी भाषेतील पहिला आत्मचरित्रकार आहे. सहज भक्ती हा नामदेव-भक्तीचा विशेष आहे.

नामदेव महाभक्ताचा महासंत कसा झाला याचा दृष्टांत देऊन भक्तीबद्दल बोलताना श्री. भारदे म्हणाले की, प्रासंगिक भक्ती म्हणजे भक्ती नव्हे. माणसावर एखादे संकट आल्यावर तात्पुरती देवभक्ती करून देव प्रसन्न करून घेणे म्हणजे भक्ती नाही. देवाचे रूप जाणणे म्हणजे भक्ती. त्याशिवाय भक्ती वा ज्ञान कृतार्थ होणार नाही; असा साक्षात्कार नामदेवाला झाला. त्याच क्षणी 'अवघी सत्ता आली हाता' असे नामदेवांना वाटले. सर्व संतांची देव म्हणजे विश्वात्मक देव अशी कल्पना होती. त्यांनी अध्यात्म हे विश्वात्मक बनविले. गीतेतील ज्ञान प्राप्त करून घेणे ही पूर्वी वैयक्तिक साधना समजली जात असे. तिला सामाजिक आणि जागतिक अर्थ महाराष्ट्रीय संतांनी मिळवून दिला. यामुळे ज्ञानदेव–नामदेवांचे जीवनतत्त्व सर्वरूपी बनले.

श्री. भारदे पुढे म्हणाले की, पांडित्य आणि साधुत्व हा झगडा फार पुरातन आहे. पण विद्वत्ता म्हणजे धर्म नव्हे. जेथे आनंद आहे तेथे ज्ञान आहे. ज्या ज्ञानाने माणसाचे समाधान होईल ते खरे ज्ञान आहे. ज्ञान आणि प्रेम एकत्र आणणे म्हणजे संतत्व आहे. पांडित्य आणि धर्म हे वेगळे आहे. धर्म हा जीवनाच्या साक्षात्काराचा विषय आहे केवळ आचरणाचा नव्हे.

रोटी–बेटी आणि पेटी

समाजातील जातीभेद अद्यापही कमी झालेले नाहीत असे सांगताना श्री. भारदे म्हणाले की, जातीभेद दूर होण्यासाठी रोटी व्यवहार, बेटी व्यवहार व्हावे असे सांगितले जाते, बोलले जाते.

असे आचरण काही प्रमाणात तुरळकपणे होत असले तरी निवडणुकीच्या वेळेस जो पेटी-व्यवहार होतो त्यावेळी हे भेदाभेद पुन्हा वर डोके काढू लागतात.

संमृद्ध योजकतेचा अविष्कार

——आणि वणीचे साहित्य संमेलन आता कुठे हृदयात खोलवर भिनू लागले आहे. ते संमेलन गाजले नाही. वाजले नाही. किंवा गाजावाजा करून थिजले नाही. तर रुजले आहे. रुजण्याची प्रक्रिया दीर्घ आहे. चांगले रुजायला जेवढा काळ लागतो तेवढा काळ हे विदर्भ-साहित्य संघाचे संमेलन मनात राहणार आहे.

वणी म्हणजे श्रीमंतांचे आणि विद्वानांचे गाव, एवढीच एक प्रतिमा माझ्या मनात त्या गावाबद्दल होती. परंतु तेथे गेल्यावर येथील श्रीमंती विद्वान आहे की विद्वत्ता श्रीमंत आहे हा प्रश्न निर्माण झाला, पण ते सारे प्रश्न सहवासाने सुटले. येथील विद्वत्ता श्रीमंत असल्याचे तर त्या मिरमळणाऱ्या लालचुटुक पगडीने मागेच सिद्ध केले आहे. परंतु श्रीमंतीत विद्वत्ता, योजकता असल्याचे या संमेलनात दर वेळी प्रत्ययास येत होते.

माधवनगरात हे संमेलन झाले. ते विदर्भ साहित्य संमेलनाचे एकोणतीसावे अधिवेशन होते. हे कार्यालयीन नोंद घेणारे वाक्य असले तरी ते फक्त साहित्य संमेलन उरले नाही. ते नगर संमेलन झाले. समष्टी-संमेलन झाले. वास्तविक यासाठी भारताचे विद्यमान अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण उद्‌घाटनास येणार होते. मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक स्मरणिकेचे प्रकाशन करणार होते. परंतु ते येऊ शकले नाहीत. तरीही वणीकरांचा उत्साह कुठल्याही प्रकारे मावळला नाही किंवा कमी झाला नाही. हे गावचे वळण असावे. उद्दिष्ट प्रबळ असले की हे शक्य होते. ‘तुमच्या सह किंवा तुमच्या शिवाय’ ही मराठी माणसाची ठेवणच आहे.

माधवनगरात उभारलेल्या त्या भव्य शामियान्यात उद्‌घाटनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सुरवातीस स्वागत गीत झाले आणि कार्याध्यक्ष श्री. म. ता. राजूरकर यांनी सभेचे आवाहन केले. महाराष्ट्राचे राज्यमंत्री श्री. आबासाहेब पारवेकर (देशमुख) यांनी संमेलनाध्यक्ष श्री. पां. श्रा. गोरे आणि उद्‌घाटक नामदार श्री. बाळासाहेब भारदे व इतर प्रमुख उपस्थितांचे स्वागत केले.

मंत्रीमहोदय श्री. पारवेकर आपल्या स्वागतपर भाषणात म्हणाले की, आज या स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याला एकात्म समाज उभारायचा आहे. त्या उभारणी कार्यात साहित्याने आपले स्वातंत्र्य अबाधित राखूनच आपली जोखीम उचलायची आहे. या वणी-सारख्या छोटेखानी गावात सर्व तटावरील नागरिकांच्या उपस्थितीत हे संमेलन भरत आहे हा मोठा शुभशकुनच होय.

त्यानंतर संमेलनाध्यक्ष श्री. पां. श्रा. गोरे व सौ. गोरे, उद्‌घाटक मा. भारदे, पूर्वाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते यांचे पुष्पमालेने स्वागत करण्यात आले. श्री. पांडुरंगपंत गोरे हे त्या विभागातील खरे लोकप्रिय लोककवी आहेत हे त्या दिवशी त्यांना अर्पण करण्यात आलेल्या हारांच्या संख्येवरून दिसत आहे. अनेक संघटना, संस्था आणि व्यक्ती यांच्यातर्फे श्री. गोरे यांना इतक्या पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या की हारांचा अक्षरशः ढीग पडला.

——याच गर्दीत एक अगदी गरीब किसान गर्दीतून वाट काढीत व्यासपीठाकडे पोचला आणि त्यानी ओंजळीत आणलेली रानफुले अध्यक्षांना दिली. प्रत्येकी एक एक फूल तेथे असणाऱ्या प्रतिष्ठितांना देऊन त्याने आपली भावना व्यक्त केली. आपल्या वाङमयातून ग्रामीण जीवनाचा अविष्कार करणाऱ्या अध्यक्षांचा असा हृद्य सत्कार करण्यात आला.

या संमेलनास शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, राज्यपाल श्री. अली यावर जंग, मुख्यमंत्री वसंतराव नाईक, सुप्रसिद्ध साहित्यिक सर्वश्री वा. ना. देशपांडे, अनंत काणेकर, शिवाजी सावंत, सोपानदेव चौधरी, वि. स. खांडेकर, शिरीष पै, य. दि. पेंढरकर (यशवंत), त्रि. द. घाटे, भ. श्री. पंडित, विन्दा करंदीकर, गो. नी. दांडेकर तसेच मान्यवर विद्वान म. म. डॉ. वा. वि. मिराशी, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, डॉ. मा. गो. देशमुख, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. चिंतामणराव देशमुख यांचे संदेश आले होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण, श्रममंत्री श्री. नरेन्द्र तिडके, वनमंत्री श्री. नासिकराव तिरपुडे, पूर्वाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे ‘अनिल’, श्री. शंकरराव सुरडकर या मंडळींनी शुभेच्छा व्यक्त करणारे संदेश पाठविले होते.

या प्रसंगाचे औचित्य साधून नामदार भारदे यांनी स्मरणिकेचे आणि वणी तालुक्यातील कवींच्या

प्रातिनिधिक कविता असलेल्या 'निर्गुंडीची फुले' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन केले.

साहित्य हे वास्तव जीवनदर्शी आणि हृदयस्पर्शी असावे. संमेलनाध्यक्ष श्री. पां. श्रा. गोरे यांचे हृदयसंवादी भाषण.

'आपल्याला भाषण स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य व बुद्धिस्वातंत्र्य हे सत्यशोधनासाठी प्रदान करण्यात आले याची जाणीव आहे. पण कोणतेही साहित्य डोळ्यात भरत असेल, बुद्धीला दिपवीत असेल परंतु जर हृदयात उतरत नसेल, दुःखितांच्या सेवेसाठी हृदये पाझरत नसतील, दलितांच्या रक्षणासाठी बाहू स्फुरत नसतील तर ते साहित्य सत्य आणि समर्थ असल्याबद्दल मी मात्र साशंक आहे. कारण आज हुंदक्यांचे निनाद हृदयात घुमविणारे, रक्ताच्या शाईने लिहिणारे लेखक हवे आहेत! साहित्य हे वास्तवजीवनदर्शी आणि हृदयस्पर्शी असावे अशी माझी धारणा आहे. देव देवळात नाही, दगडातही नाही, तो माणसात आहे. म्हणून माणसाची कदर करण्यातच त्या माणुसकीचा आदर आहे. तेव्हा वास्तव विचाराने वागा, अक्षम्य अन्यायांना डागा आणि माणुसकीची मूल्ये जागा.' असे विचार श्री. पां. श्रा. गोरे यांनी अध्यक्षपदावरून व्यक्त केले.

आजच्या साहित्याची जबाबदारी आहे याची जाणीव करून देताना श्री. गोरे पुढे म्हणाले की, आज संपूर्ण देश अराष्ट्रीय वृत्तीने पोखरला आहे. सर्वत्र भयावह स्थिती निर्माण झालेली आहे. भारतीयत्व कायम राखण्याचे कार्य आपणा सर्वांवर आहे. तेजस्वी राष्ट्राची प्रतिमा उज्ज्वल करण्यासाठी झटल्याशिवाय साम्यवाद्यांनी मांडलेला डाव मोडता येणार नाही. साम्यवाद हे स्वयंपूर्ण तत्वज्ञान नव्हे, ते भांडवलशाहीचेच विकृत रूप होय. या तत्वज्ञानाची बौद्धिक कुवत संपुष्टात येऊन 'नक्षलवादी' स्वरूपात प्रकट होऊन अराजकांचे अरिष्ठ ते निर्माण करीत आहेत. हे अरिष्ठ नष्ट करण्याचे आणि आजच्या तरुण पिढीचे लाल गिधाडांपासून रक्षण करण्याचे कार्य आपल्या साहित्यावर आहे.

ते म्हणाले की, समाजवाद ही आजच्या काळाची हाक म्हणून मराठी साहित्याने तिला साथ दिली पाहिजे. देशापुढे हा समाजवादाचा आदर्श तेजस्वीपणे कार्यान्वित केला पाहिजे. पण तो कार्यान्वित करण्याची भाषा ही वाहत्या आणि धावत्या पाण्याप्रमाणे पवित्र आणि प्रवाही हवी. नवभारत, नवसमाज आज आपणास उभा करायचा आहे. धर्मासाठी माणसाला साधन म्हणून राबविणारा धर्म नको, त्या उगवत्या कामाचे आवाहन व आव्हान आज आमच्या पुरोगामी साहित्यिकांना आहे.

जातीयवाद आणि अश्लीलता याबद्दल बोलताना श्री. पांडुरंगरावजी गोरे म्हणाले की, आजही या विसाव्या शतकात अस्पृश्यतेचा पुरस्कार कालबाह्य चातुर्वर्ण्याचा मुक्तकंठाने पुकार आमचे साहित्यिक आपल्या लिखाणात हिरीरीने करीत आहेत. अशा विषारी विचारांना प्रेरणा देणारे व समाजात तज्जन्य चेतना निर्माण करणारे तथाकथित वैचारिक साहित्य मोठ्या प्रमाणात आजही निर्माण होत आहे. जातीय, धर्मीय वा सांप्रदायिक वाद म्हणजे राष्ट्राला बाधलेला शाप होय! खरी दुःखाची गोष्ट म्हणजे राजकारणात फैलावलेल्या या घाणीचा दुर्गंध आमच्या सरस्वतीच्या पवित्र मंदिरातही पसरला आहे. स्वमताचा पुरस्कार करताना थोर महात्म्यांचा तिरस्कार आणि श्रेष्ठ धर्मात्म्यांचाही धिक्कार करणाऱ्या; अर्वाच्य व अश्लील साहित्याची आज भरमसाठ पैदास होत आहे. वास्तविक या अपप्रवृत्तीबद्दल, मग तो कोणीही आणि केवढाही मोठा असो त्याची गय न करता त्याच्या विरुद्ध खऱ्या साहित्यिकाने आपला आवाज बुलंद केला पाहिजे.

यानंतर सीमावाद, साहित्यिकाचा स्वाभिमान, ग्रामीण वाङ्मय, जीवन आणि कला, बोलभाषा वऱ्हाडी आदी प्रश्नांचा परामर्श घेऊन त्यांनी आपले भाषण समाप्त केले. यानंतर नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी थोडक्यात भाषण करून ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. शेवटी आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

याच रात्री वणी येथील वि. सा. संघाच्या नाट्यसमितीने श्री. पु. ल. देशपांडे यांच्या 'अंमलदार' या नाटकाचा प्रयोग सादर केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी नामदार भारदे यांच्या अध्यक्षतेखाली 'संत नामदेव' या विषयावर परिसंवाद झाला.

अनुक्रमणिका

त्यात भाषण करताना प्राचार्य श्री. वि. प्र. मोहगावकर म्हणाले की, ज्ञानदेवांचे वैशिष्ट्य ज्ञानात तर नामदेवांचे भक्तीत होते. त्या भक्तीनेच स्वत:ला तारून दुसऱ्यांना तारावे हा उपदेश सांगण्याचे कार्य संत नामदेवांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर केले. सर्वत्र परमेश्वर आहे हे सत्य ओळखणे म्हणजे भागवत-धर्म होय. अशा भागवत धर्माचा पुरस्कार संत नामदेवांनी केला. त्यांनी भक्तीचा पुरस्कार केला कारण भक्ती करणे ही गोष्ट सर्व सुलभ आहे. आपल्या संतांनी माणसे घडविण्याचे कार्य केले. मानव धर्म निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही राजकीय क्रान्तीच्या पूर्वी निर्माण करावा लागतो तो मानवधर्म संतांनी निर्माण केला. आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. त्या लोकशाहीतूनच शिवशाहीचा जन्म झाला.

धर्मनिरपेक्षता निराळी आणि धर्माचे अधिष्ठान निराळे असे सांगून प्रा. मोहगावकर म्हणाले की, कुटुंबाला, समाजाला, राष्ट्राला असे एक पारमार्थिक अधिष्ठान असले पाहिजे. माणसाचे हे आधिभौतिक आयुष्य त्यामुळे दृढ राहते. हे अधिष्ठान प्राप्त होण्यासाठी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी निर्माण करण्याचे कार्य संतांनी केले.

कवि संमेलन

'शशिमोहन'कार प्राचार्य या. मु. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली कविसम्मेलनाचा कार्यक्रम झाला. त्यांत प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. वामन इंगळे, श्री. उ. रा. गिरी, श्री. ना. रा. शेंडे, श्री. बाबा मोहोड, 'शिरीष', श्री. कृष्णा चौधरी, श्री. तु. ना. काटकर, प्रा. श्रीधर शनवारे, श्री. सुरेश भृगुवार, 'कुसुमानंद', प्रा. देविदास सोटे, श्री. वसंत सबनीस आणि श्री. बाजीराव पाटील यांनी कविता म्हटल्या. शेवटी अध्यक्षांनी कविता म्हणून संमेलनाचा समारोप केला.

कविसंमेलन रंगले. 'अजून माणूस माणूस आहे' ही प्रलयाच्या काळोखात माणुसकीचा परिचय देणारी श्री. उ. रा. गिरी यांची कविता फार आशादायी आणि माणूस जातीविषयी विश्वास दर्शविणारी होती. प्रा. शनवारे यांची 'पहाट' शुचिर्भूत आणि मुलायम वाटली. 'कुसुमानंद' यांच्या 'व्हेरायटी चौकातून' निर्हेतुकपणे जगणाऱ्या माणसाचा आक्रोश ऐकू येत होता. प्रा. देविदास सोटे यांनी 'लॉटरीचा नंबर' आणि 'घेन्ना रे बापू—पेन्ना रे चाहा' ही कविता म्हणून हास्याचे फवारे उडविले. वसंत सबनिसांचे 'कवि संमेलन' संमेलनाला मानवणारे होते. श्री. वामन इंगळे यांची 'पाकेटमार' ही कविता अर्थगर्भ होती.

दुपारी महिला शाखा संमेलन सौ. शशिकला गंगशेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. ते मात्र मुमार स्वरूपाचे होते. त्यांत सौ. शकुंतलाबाई खोत, सौ. इंदुमती गंधे, श्रीमती उषाताई देशमुख यांनी 'वाङ्मयातील स्त्री' या विषयावर आपापली मते मांडली. त्यात नवीन मुद्दे काहीच नव्हते.

याच संमेलनात सौ. उषाताई लिमये, श्रीमती उषाताई देशमुख, सौ. कुसुम शर्मा, सौ. अरुंधती जोशी आणि मातोश्री राधाबाई देशपांडे यांच्या कविता झाल्या. शेवटी अध्यक्षा सौ. गंगशेट्टीवार यांनी समारोपाचे भाषण केल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

संध्याकाळी कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक साहित्यिक श्री. बळीरामपंत एकबोटे, श्री. शरच्चंद्र टोंगो, पां. श्रा. गोरे, श्री. आबासाहेब पड्डेवार, श्री. नारायणराव सरपटवार, डॉ. द. ह. अग्निहोत्री, डॉ. दा. ल. अडोणी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

याच कार्यक्रमानंतर संमेलनाध्यक्ष श्री. पां. श्रा. गोरे यांच्या हस्ते श्री. कृष्णा चौधरी यांचे 'झळई,' श्री. देविदास सोटे यांचे 'सोटे सरकार' व 'संत सोटे,' श्री. वनकर यांचे 'पंचवटी,' श्री. सुरेश मुळावकर यांचे 'वनवासी सूल' आणि श्री. लोंढे यांचे 'माझा मीच वैरी' या नाटकाचे प्रकाशन झाले.

रात्री मुंबईचे सुप्रसिद्ध गायक पंडित जसराज यांच्या शास्त्रोक्त गायनाचा कार्यक्रम झाला.

रविवार सकाळी 'विदर्भातील प्रकाशन व्यवसाय' विषयावर श्री. शरच्चंद्र टोंगो यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

त्यात भाषण करताना डॉ. भाऊ मांडवकर म्हणाले की, विदर्भातील प्रकाशन व्यवसाय नीट विकास पावत नाही याचे कारण येथील प्रकाशक जास्त ध्येयवादी असतो. तो प्रकाशनाची प्रसिद्धी करण्यात कमी पडतो. तसेच प्रचार यंत्रणा अपुरी पडते. तेव्हा येथील प्रकाशक व्यवसाय विकसिक होण्यासाठी प्रकाशकाने पुस्तके छापल्यावर ती विकत घेण्याची शासनाने

तयारी ठेवावी व विद्यालये, महाविद्यालये यांना ती विकत घेण्याची शिफारस करावी.

येथील चांगले लेखक पुण्या–मुंबईकडे जाऊन पुस्तके प्रकाशित करतात, कारण इकडचे प्रकाशक लेखकांचे पैसे बुडवितात असा अनुभव आहे. विदर्भातील सर्व प्रकाशकांनी एकत्र येऊन सहकार्याने प्रकाशनाचे काम केल्याशिवाय गत्यन्तर नाही; असे डॉ. मांडवकर म्हणाले.

श्री. मामासाहेब गंधे म्हणाले की, उत्तम स्वच्छ मुद्रण आणि कलात्मकता प्रकाशनव्यवसायात फार आवश्यक आहे. आता लोक पुस्तके विकत घेऊन वाचू लागली आहेत. ' फुकटे ' वाचक राहिले नाहीत. त्याचप्रमाणे पुस्तक लिहिणाऱ्या लेखकांना मानधन दिले पाहिजे याची जाणीव येथील प्रकाशकांना नाही असे दिसते. त्यामुळे येथील लेखक पुण्या–मुंबईकडे धाव घेतात.

ते पुढे म्हणाले की; पुस्तके खपविण्यास जसे प्रयत्न हवेत तसे केले जात नाहीत. प्रकाशनाला आपले स्वतःचे व्यक्तिमत्व असावे लागते तसे विदर्भातील कोणत्याही प्रकाशनाला नाही.

प्रा. करंदीकर हे आपले विचार मांडताना बोलले की, विदर्भात वाचक व ग्राहक भरपूर असूनही त्यांना पुस्तके पुरवू शकणारी प्रकाशने नाहीत. उत्तम पुस्तक उत्पादित करण्याची हातोटी नाही. त्यासाठी प्रकाशकांना सहाय्यभूत ठरू शकेल अशी मुद्रकांची एक संघटना असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे येथील प्रकाशकांमध्ये भव्य धंदेवाईक दृष्टिकोनाचा अभाव दिसून येतो.

प्रा. सौ. सुमन पाटे यांनी शास्त्रीय पुस्तके प्रकाशित होऊन त्याचे योग्य वितरण व्हावे यावर भर दिला. आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात श्री. शरश्चंद्र टोंगो यांनी, मराठी वाचकांनी पुस्तके विकत घेऊन वाचण्याची सवय केली पाहिजे, असे प्रतिपादन केले.

याच कार्यक्रमानंतर ' कथाकथन ' झाले. काहींनी कथा वाचन केले. त्यात सर्वश्री म. के. देशपांडे, प्रा. शरश्चंद्र टोंगो, प्रा. मधुकर केचे, वसंत गिरटकर, बाबा मोहोड, प्रा. दि. व्यं. जामिरदार; वाजीराव पाटील आणि वसंत सबनीस यांनी भाग घेतला होता. प्रा. टोंगो यांची भावस्पर्शी कथा आणि श्री. वसंत सबनीस यांची विनोदी कथा विशेष रंगली.

दुपारी पाच वाजताच्या सुमारास कविवर्य श्री. ना. ना. हूड यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. त्यांत सर्वश्री सुरेश भट, प्रभाकर सिरास, ना. मा. सरपटवार, हरीश मानधता, शिवाजी राऊत; गोविंद देशपांडे आणि इतर स्थानिक कविमंडळींनी भाग घेतला होता. तसेच अध्यक्ष श्री. पां. श्रा. गोरे यांनी आपल्या कविता म्हणून दाखविल्या. शेवटी पद्मश्री ग. दि. माडगळकर यांनी दोन कविता म्हणून बैठकीत अधिक रंग भरला. श्री. माडगूळकर यांची उपस्थिती हे या बैठकीचे विशेष आकर्षण होते.

खुले अधिवेशन व ठराव

संमेलनाध्यक्षांच्या उपस्थितीत झालेल्या या खुल्या अधिवेशनात, रसिकाग्रणी श्रीमंत बाबुरावजी देशमुख, श्रीमती माईसाहेब देशमुख आणि कै. मनोहरभाई पटेल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येऊन दुखवटयाचा ठराव पारित करण्यात आला.

दुसऱ्या ठरावात, डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. इरावती कर्वे, डॉ. चंद्रशेखर रामन, डॉ. ना. भा. खरे, श्रीकांत पालेकर, य. हृ. पिटके, श्रीमंत जयसिंगराव भोसले, डॉ. वा. वा. मेत्रे, हृ. ध. सगणे, सुशील कवळेकर, अमृतराव साकळे यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला.

विदर्भातील अनुपलब्ध आणि दुर्मिळ झालेले गेल्या दीडशे वर्षांतील अनेक प्रकाशन ग्रंथ शासनाने पुन्हा मुद्रित करावे. खामगाव येथील कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या स्मारक मंदिराचे आणि गोंदिया येथील महाकवी भवभूतीच्या स्मारकाचे अपुरे राहिलेले बांधकाम त्वरित पूर्ण करण्यास शासनाने सहाय्य करावे, असे तिसऱ्या ठरावाद्वारे पारित करण्यात आले.

अमरावती येथे आकाशवाणी केंद्र व्हावे, हाही एक ठराव मांडण्यात आला.

त्याच रात्री मुंबई येथील रंगशारदा या नाट्य संस्थेतर्फे श्री. विद्याधर गोखले लिखित ' मदनाची मंजिरी ' या नाटकाचा बहारदार प्रयोग करण्यात आला आणि तीन दिवस चाललेल्या साहित्य संमेलनाची समाप्ती झाली.

वणीकरांच्या आतिथ्याबद्दल लिहायचे म्हणजे स्वतंत्र वेगळा लेखच लिहावा लागेल. तीनही दिवस त्यांनी जे जेवण दिले आणि बडदास्त ठेवली, त्यातून त्यांचे सहृदय दातृत्व आणि आतिथ्यशीलता सतत दिसत होती आणि हे सारे अकृत्रिमपणे. वधूपक्षाच्या मांडवातील अगत्य सगळ्यांच्या वागण्यात आढळले. या साहित्य संमेलन प्रसंगी मी माझ्या अविवाहित मित्राला वणीतलीच सोयरिक जोडण्याचा सल्ला दिला. मी हळहळलो. कारण ती संधी माझ्या आयुष्यातून मागेच हुकली होती.

या संमेलनाचे सूत्रधार प्राचार्य राम शेवाळकर हे सतत कार्यमग्न होते. श्री. म. ता. राजूरकर यांच्या उत्साहाला तर तोडच नव्हती. तसेच सर्वश्री बाबुरावजी देशपांडे, दादासाहेब हूड, भालचंद्र पुराणिक, भैयाजी ढुमे, अण्णासाहेब काटपाताळ, माधव सरपटवार, सुधाकर पुराणिक, सौ. नंदाताई दामले ही मंडळी कार्यरत होती. या शिवाय आणखी किती तरी मंडळी होती. पण सगळ्यांचा नामोल्लेख अशक्य आहे. तेथील लोकांच्या सद्भावी वृत्तीवरून तो त्यांना आवश्यक वाटणारही नाही कदाचित !

अनुक्रमणिका

कोल्हटकर शताब्दि

सरकारने समिति नेमली

ता. २ डिसेंबर १९७० रोजी महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण, क्रीडा आणि समाज कल्याण विभागातर्फे पुढील पत्रक प्रसिद्ध करण्यात आले:—

महाराष्ट्र शासनाने कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची जन्मशताब्दि उचित प्रकारे साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. या समारोहासाठी कार्यक्रमाचा विचार करून त्याची आखणी करण्यासाठी शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील समिति नियुक्त केली आहे.

या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे आहेत:– प्रतिनिधी, मराठी महामंडळ, पुणे, प्रतिनिधी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रतिनिधी, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, प्रतिनिधी, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, प्रतिनिधी, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, प्रतिनिधी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, प्रतिनिधी, मराठी नाट्य परिषद, मुंबई, प्रतिनिधी, गोमंतक साहित्य परिषद, पणजी, प्रतिनिधी, किर्लोस्कर स्मारक मंडळ, बेळगाव, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, नागपूर, श्री. गं. दे. खानोलकर, मुंबई, श्री. पु. ल. देशपांडे, मुंबई, श्री. ग. दि. माडगूळकर, पुणे, प्रा. वा. ल. कुळकर्णी, औरंगाबाद, श्री. म. ल. वऱ्हाडपांडे, नवी दिल्ली, श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर, नागपूर, श्री. बाळ कोल्हटकर, मुंबई, श्री. रमेश मुळगुंद, नवी दिल्ली, शिक्षण संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी, पुणे, ग्रंथालय संचालक, मुंबई, प्रसिद्धि संचालक वा त्यांचे प्रतिनिधी, मुंबई, संचालक आकाशवाणी वा त्यांचे प्रतिनिधी.

शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभागांचे उपसचिव हे या समितीचे सचिव राहातील. या समितीची मुदत एक वर्षाची राहील.

संपादकीय

कोल्हटकर शताब्दी समितीला सूचना

महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या कोल्हटकर शताब्दी समितीची बैठक लवकरच मुंबई येथे भरून शताब्दी कशा रीतीने साजरी करावी, याचा कार्यक्रम निश्चित करण्यात येईल. म्हणून, विदर्भाच्या दृष्टीने, काही सूचना या समितीला करणे अवश्य वाटते. विदर्भ ही कोल्हटकरांची जन्मभूमी आणि कर्मभूमी. त्यांचे बहुतेक आयुष्य खामगाव आणि जळगाव या बुलढाणा जिल्ह्यातील दोन गावी गेले. ही गोष्ट ध्यानात घेऊन या सूचना करण्यात येत आहेत.

१. खामगाव येथील विदर्भ साहित्य संघाच्या शाखेने कोल्हटकर स्मारक मंदिर तेथे बांधण्याचे काम बारा वर्षांपूर्वी हाती घेतले होते. श्री. भाऊसाहेब ओझरकर, डॉ. एकबोटे, प्रो. प्र. ना. ऊर्ध्वरेषे प्रभृती तत्कालीन कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे या स्मारक मंदिराचा रंगमंच बांधून झाला; व त्यावर काही नाटयप्रयोगही उत्तम रीतीने करून दाखविण्यात आले. पण त्यानंतर हे काम मागे पडले. समितीने त्याची जबाबदारी आपल्याकडे घेऊन ते पूर्ण करावे, अशी लोकांची अपेक्षा आहे.

२. खामगाव येथे सुस्थितीत असलेले ग्रंथालय असून शासनाने त्याला मान्यता दिलेली आहे. त्या ग्रंथालयाला कोल्हटकरांचे नाव देऊन तेथे त्यांचे चित्र लावण्यात यावे; व त्यांच्या घरासमोरून जाणाऱ्या रस्त्याला ‘कोल्हटकर मार्ग’ असे नांव देण्यात यावे.

३. जळगाव–जामोद येथील शिक्षण मंडळाने तेथे कलावाणिज्य महाविद्यालय स्थापन केलेले असून, ते चांगल्या रीतीने चाललेले आहे. त्या महाविद्यालयाला कोल्हटकरांचे नाव देण्याची त्याच्या चालकांची आणि अध्यापकांची इच्छा आहे त्यासाठी जरूर ती आर्थिक मदत महाविद्यालयाला मिळवून देण्याच्या बाबतीत समितीने पुढाकार घ्यावा; व त्या खेडेविभागातील महाविद्यालयाच्या विकासाच्या योजनांना हातभार लावण्याचे श्रेय घ्यावे. कोल्हटकरांचे पट्टशिष्य कै. रा. ग. गडकरी यांच्या सावनेर येथील स्मारकासाठी दीड–दोन लाख रुपये खर्च करण्याचा स्तुत्य संकल्प मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी दि ३० डिसेंबर १९७० रोजी कळमेश्वर येथे बोलून दाखवला. तसाच संकल्प जळगाव–जामोद येथील कोल्हटकरांच्या स्मारकाच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने करावयाला हवा. जळगाव येथील कोल्हटकरांच्या घरासमोरून जाणाऱ्या रस्त्याला ‘कोल्हटकर मार्ग’ असे नांव देण्यात यावे.

खामगाव आणि जळगाव या दोन ठिकाणी कोल्हटकरांचे स्मारक करण्यासंबंधी जशा या सूचना समितीला केलेल्या आहेत, तशाच कोल्हटकरांच्या दुर्मिळ झालेल्या अनुपलब्ध साहित्याच्या प्रकाशनासंबंधी काही सूचना करणे अवश्य वाटते.

१. कोल्हटकरांच्या सर्व नाटकांची मूळ संहितेनुसार तयार केलेली शुद्ध आणि सुबक आवृत्ती, कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या नाटकांप्रमाणे, एकाच ग्रंथाच्या रूपाने काढण्याचे काम समितीने करावे.

अनुक्रमणिका

२. कोल्हटकरांच्या नाटकांप्रमाणे त्यांच्या दोन कादंबऱ्या आणि कथा आज अनुपलब्ध आहेत. त्यांची मूळ संहितेनुसार शुद्ध आणि सुबक आवृत्ती समितीने प्रसिद्ध करावी.

३. कोल्हटकरांच्या लेखसंग्रहातील आणि 'साहित्यवत्तिशी' या विनोदी पुस्तकातील निवडक लेखांचा संग्रह अधिकारी लेखकांकडून उत्तम रीतीने संपादन करून साहित्य अकादमीने प्रसिद्ध करावा, अशी सूचना समितीने त्या अकादमीला करावी. त्यांचे हे दोन लेखसंग्रह सर्व घटनामान्य भारतीय भाषांत साहित्य अकादमीने अनुवादित करून घेऊन प्रसिद्ध करावेत. त्याचप्रमाणे त्यांची तीन उत्तम नाटकेही साहित्य अकादमीने सर्व घटनामान्य भाषांतून प्रसिद्ध करावीत. या बाबतीत समितीने अकादमीला जरूर त्या सूचना कराव्यात आणि सल्ला द्यावा.

४. कोल्हटकरांचा भारतीय ज्योतिर्गणितावरील प्रबंध, सांगली येथील ज्योतिष संमेलनातील भाषण आणि इतर ज्योतिषविषयक लेख यांचाही एक ग्रंथ काढण्याचा प्रयत्न समितीने करावा.

५. १९७०, ७१ आणि ७२ या तीन वर्षांत कोल्हटकरांवर जे ग्रंथ प्रसिद्ध झाले किंवा होतील, त्यांना, त्यांच्या योग्यतेनुसार, पुरस्कार आणि आश्रय देण्यात यावा. फलटण येथील मुधोजी महाविद्यालयातील मराठीचे अध्यापक प्रो. डॉ. हणमंत बाळकृष्ण कुळकर्णी यांनी कोल्हटकरांवर जो प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली, तो अद्याप प्रसिद्ध झाला नसल्यास त्याच्या प्रकाशनाला समितीने मदत करावी; व श्री. गं. दे. खानोलकर हे लिहीत असलेल्या कोल्हटकर चरित्राच्या प्रकाशनालाही सहाय्य करावे. अशाच प्रकारचे जे कोल्हटकरांवरील इतर ग्रंथ तयार असतील किंवा होतील, त्यांच्याही प्रकाशनाला समितीने पुरस्कार आणि आश्रय देऊन हातभार लावावा.

६. श्री. खानोलकर यांच्या संग्रही कोल्हटकरांची सुमारे ५०० पत्रे आहेत. ही पत्रे साहित्यचर्चात्मक आहेत. या पत्रांचा संग्रह उत्तम रीतीने संपादन करून पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था समितीने करावी.

७. इंदूरचे डॉ. रा. वा. आपटे यांनी 'कोल्हटकरांच्या साहित्यवत्तिशी'तील विनोदी पात्रांचे नाट्यीकरण केले आहे. ते कितपत चांगले झाले आहे, याची चाचणी करून, शताब्दीच्या समारंभात त्याचे प्रयोग करावेत.

८. महाराष्ट्र राज्याबाहेर बेळगाव, पणजी, दिल्ली इत्यादी शहरी कोल्हटकर शताब्दी साजरी करण्यात येईल, असे दिसते. त्या दृष्टीने या सर्व ठिकाणच्या उत्सवांतून काही तरी विधायक स्वरूपाचे साहित्योपयोगी असे त्यांचे स्मारक किंवा त्यांच्याविषयी उच्च दर्जाचे साहित्य निर्माण होईल, अशा दृष्टीने समितीने मार्गदर्शन करावे.

— **संपादक**

सर्व सभासदांना निवडणूक–विषयक सूचना

सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, दि. १–४–१९७१ ते ३१–३–१९७४ ह्या तीन वर्षांकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे १६ सभासद यांच्या निवडणुकीचे कार्यक्रम पुढील प्रमाणे राहतील.

१. वरील पदाकरिता पाठवावयाच्या नामनिर्देशक पत्रिका निर्वाचिनाधिकाऱ्याचे नावे केंद्रीय कार्यालयात शुक्रवार दि. १५ जानेवारी १९७१ सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोचावयास पाहिजेत. मतदारांच्या सूचीतील कोणत्याही व्यक्तीस सभासदांची सूची (अ) (दुरुस्त्यांसहित) मधील कोणत्याही व्यक्तीचे नाव तिच्या लेखी अनुमतीसह सुचविता येईल. नामनिर्देशनपत्र जर पोष्टाने पोचते करणे असेल तर ते रजि. पोष्ट अॅक्नॉलेजमेंट ड्यू पद्धतीनेच पोहोचते केले पाहिजे. अशा तऱ्हेने पोचते झालेले नामनिर्देशनपत्र जर नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत निर्वाचनाधिकाऱ्यास मिळाले असेल तरच ते छाननीत घेतले जाईल.

२. नामनिर्देशक पत्रिका केंद्रीय कार्यालयात मिळतील. नामनिर्देशक पत्रिकेच्या शेवटी दिलेल्या टीपेतील सूचना बंधनकारक राहतील.

शनिवार दि. १६ जानेवारी १९७१ ला सायंकाळी ६–३० वाजता केंद्रीय कार्यालयात उमेदवारांच्या नामनिर्देशक पत्रिकांची छाननी करण्यात येईल. ह्यावेळी उमेदवारांनी किंवा त्यांनी लेखी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

४. छाननीनंतर स्वीकृत झालेल्या उमेदवारांची यादी केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर दि. १६–१–७१ रोजी लावण्यात येईल,

५ नामनिर्देशन पत्रांच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीबाबत लवादाकडे तक्रारअर्ज करण्याची तारीख बुधवार दि. २०–१–१९७१ ही राहील.

६. लवादासमोर पहिल्या सुनावणीकरिता शुक्रवार दि. २२–१–१९७१ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.

७. तक्रारीच्या अंतिम निकालाची तारीख सोमवार २५–१–१९७१ ही राहील.

८. नामनिर्देशन परत घेण्याची तारीख बुधवार २७–१–७१ ही राहील

९. उमेदवारी परत न घेतल्या गेलेल्या व ज्यांची उमेदवारी वैध आहे अशा उमेदवारांची यादी शुक्रवार दिनांक २९–१–१९७१ रोजी सूचना फलकावर लावण्यात येईल.

१०. मतपत्रिका केंद्रीय कार्यालयातून मंगळवार दि. १६–२–७१ ला पाठविण्यात येईल.

११. सभासदांकडून मतपत्रिका केंद्रीय कार्यालयाकडे बुधवार दि. ३–३–१९७१ पर्यंत पोचणे आवश्यक आहे.

१२. मतपत्रिकांची मोजणी रविवार दि. ७–३–१९७१ रोजी सकाळी ८ वाजेपासून होईल.

१३. निवडणुकीचा निकाल सोमवार दि. ८–३–१९७१ रोजी घोषित करण्यात येईल.

१४. [अ] घटना कलम १२ (ड) प्रमाणे तक्रार नोंदविण्याची तारीख मंगळवार १६–३–१९७१ ही राहील.
[ब] लवादाने तत्संबंधी निकाल देण्याची तारीख बुधवार ३१–३–१९७१ ही राहील.

टीप––निवडणुकीसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार निर्वाचनाधिकारी, विदर्भ साहित्य संघ उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर–१ ह्या पत्त्यावर करावा. अन्य पत्त्यावर केलेल्या व्यवहाराची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

नागपूर
दि. ३० डिसेंबर १९७० }

गिरीश मोडक
निर्वाचनाधिकारी, वि. सा. संघ

सभासद सूची--प्रसिद्धीनंतर (दि. १५-१२-१९७० पर्यंत) आलेल्या दुरुस्त्या

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	नाव	पत्ता	ऐवजी दुरुस्ती
१	१	२	श्रीमंत देशमुख, सत्यभामाबाई लक्ष्मणराव	महाल, नागपूर २	वारल्या
२	१ (अमरावती)	७	प्रा. मांडवकर, भाऊ	विजय कॉलनी, अमरावती	प्रा. ऐवजी डॉ.
३	२७	२८	श्री. जोग, आनंदराव	कॉंग्रेसनगर, नागपूर,	गोखले व्हिला, कॉंग्रेसनगर, नागपूर असे पाहिजे
४	२७	१	श्री. अत्रे, वा. के.	राणी लक्ष्मीनगर, नागपूर ३	श्री. अत्रे; वासुदेव केशव असे पाहिजे
५	२७	३५	श्री. देवघरे, जयंत	मनोहर यांचे घरी, धरमपेठ, नागपूर	श्री. देवधर असे पाहिजे
६	१५ (वणी)	११४	श्री. रायगडकर, मा ता	जनता विद्यालय, वणी जि. यवतमाळ)	श्री. राजगडकर असे पाहिजे
७	१४३	४०९३	श्री. शेंबवणेकर, जनार्दन अरविंद	द्वारा पॉप्युलर बुकडेपो, सीताबर्डी नागपूर	अरविंद ऐवजी वासुदेव पाहिजे
८	१५०	४३४८	सौ. सोनक, नारायण दिनकरराव	प्लॉट नं. ५४, काचीपुरा, रामदासपेठ नागपूर	नारायण ऐवजी तारा
९	६१	१२९६	श्री. जावळे, भालचंद्र भास्करराव	झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर	जावळे ऐवजी जावडे
१०	१५२	४४०१	प्रा. श्रीमती वियाज हमिदा	द्वारा, नागपूर महाविद्यालय, नागपूर	वियाज ऐवजी रियाज
११	४१	५०९	श्री. कुमरे, सोनदेव टुनाजी	द्वारा हि. रा. सरायकर, लक्ष्मीनिवास, अग्रसेन रोड, धरमपेठ, नागपूर १	टुनाजी ऐवजी ठुनाजी पाहिजे
१२	८५	२१९०	प्रा. दंडे, निरंजन नारायणराव	नागपूर महाविद्यालय, सीताबर्डी, नागपूर १	पत्ता–राजाराम कॉलेज, कोल्हापूर असे पाहिजे
१३	४४	६७१	श्री. कोलते, यशवंत गंगाधर	द्वारा पॉप्युलर बुकडेपो, सीताबर्डी नागपूर	गंगाधर ऐवजी गंगाराम पाहिजे
१४	१४७	४२४५	श्री. माने, वासुदेव दत्तात्रय	सोनी लेन, सीताबर्डी, नागपूर	माने ऐवजी साने पाहिजे
१५	१५३	४४५१	श्री. क्षीरसागर, माधव लक्ष्मण	५३, माधवनगर, नागपूर	६३, माधवनगर असा पत्ता पाहिजे
१६	८७	२२४२	श्री. नभाने, पेवीदास किसन	परसोडी, भामटी, पो. जयताळा, वार्ड ७५, नागपूर	श्री. तभाने, देविदास किसन, परसोडी (भामटी) पो. जयताळा, वार्ड ७५, नागपूर असे पाहिजे

१७	८४	२१५१	श्री. देशमुख, वसंत दत्तात्रय	डॉ. काळे यांचे घर, ८५, रामनगर, नागपूर १	दत्तात्रय ऐवजी नारायण पाहिजे
१८	६६	१५११	श्री. झक्कुलवार, प्रभाकर रामलू	नेमाडवाडा; अजनी चौरस्ता, नागपूर	नेमाडवाडा ऐवजी नेमाऊवाडा पाहिजे
१९	१७४	१७८६	श्री. दर्प, कमलाकर विनायक	डॉ. पाठक बंगला, नवाब कुवा लेन, ७५, गोकुळपेठ, नागपूर १	दर्प ऐवजी दर्पे पाहिजे.
२०	५९	१२३१	श्री. चौहान, मनोहरसिंह मंगलसिह	प्लॉट नं. ३८, आझमशहा लेआऊट, गणेशनगर, वार्ड २० नागपूर	पत्यात प्लॉट नं. ३८ ऐवजी ३८५ पाहिजे.
२१	८९	२३०५	श्री. नानोटकर, नरेश गजाननराव	द्वारा के. व्ही. पुराणिक, प्लॉट नं. १७८, गोकुळपेठ, नागपूर–१	नरेश ऐवजी रमेश पाहिजे.
२२	८७	२२५३	श्री. नवगिरी, घोंडीराम कृष्णराव	३८ ए, टिळक नगर, नागपूर	नवगिरी ऐवजी नवगिरे पाहिजे.
२३	६८	१५६५	श्री. टेंभुर्णे, रामचंद्र हरिभाऊ	द्वारा श्री. शेंडे, इंदोरा, साधुपुरा, नागपूर ४	द्वारा श्री. शेंडे ऐवजी द्वारा श्री. नाना शेंडे पाहिजे.
२४	२८	५५	श्री. बऱ्हाणपुरे, योगेश महादेवराव	ऑक्ट्राय सुपरिंटेंडेंट, विश्वेश्वरय्या एंजिनियरिंग कॉलेज, नागपूर	ऑक्ट्राय सुपरिंटेंडेंट ऐवजी ऑफिस सुपरिंटेंडेंट पाहिजे.
२५	३३	२०५	सौ. उपासनी, मीना व.	द्वारा डॉ. व. म. उपासनी, बुडी रोड, सीताबर्डी, नागपूर	मीना अ. असे पाहिजे त्याचप्रमाणे द्वारा डॉ. अ. म. उपासनी असे पाहिजे.
२६	२३ (इतर विभाग ब)	९ (नाशिक)	प्रा. पीरजारे, महंमद हुसेन अल्लाउद्दीन	ग्रीन कॉलेज, पूना रोड, वडाळा नाका, नाशिक १	प्रा. पीरजारे ऐवजी पिरजादे पाहिजे ग्रीन कॉलेज ऐवजी ग्रीन कॉटेज पाहिजे.
२७	५०	९२०	श्री. गुडघे, हनमंत मोरबाजी	गांधीनगर, प्लॉट नं. ३६८, नागपूर	हनमंत ऐवजी हनुमंत पाहिजे.
२८	१२०	३३३६	प्रा. मित्र, सुधान्द्रनाथ	१२९, धरमपेठ एक्स्टें. नागपूर	सुधान्द्रनाथ ऐवजी सुधीन्द्रनाथ पाहिजे.
२९	२६	३	श्री. टोंगो, मनोहर नारायण	पारखी भवन, सिव्हील लाईन्स, चंद्रपूर	टोंगो ऐवजी टोंगे पाहिजे.
३०	६१	१३०८	श्री. जुनागडे, विजय जगन्नात्र	५० डी, गुरुकृपा, गोकुलपेठ, नागपूर १	जगन्नात्र ऐवजी जगन्नाथ पाहिजे.
३१	६३	१३७३	श्री. जोशी, चंद्रकान्त लक्ष्मण	एन. पी. कळमकर यांचे घर, टांगास्टँड धरमपेठ, नागपूर १	चंद्रकान्त ऐवजी चंद्रहास पाहिजे
३२	८०	२००७	श्री. देशपांडे, दत्तात्रय श्रीधर	प्लॉट नं. ३४, वर्मा लेआऊट अंबाझरी-जवळ, नागपुर १	श्रीधर ऐवजी वामन पाहिजे
३३	१०६	२८६९	श्री. बडक, दत्तात्रय गोपाळराव	८३ माधवनगर, नागपूर ३	श्री. बडकस, दत्तात्रय गोपाळराव पाहिजे
३४	१०५	२८२८	प्रा. फडणवीस, नारायण प्रल्हाद	२३२, शंकरनगर; दुग्धकेंद्राजवळ, नागपूर १	नारायण प्रल्हाद ऐवजी प्रल्हाद नारायण पाहिजे

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	नाव	पत्ता	ऐवजी दुरुस्ती
३५	७९	१९८५	सौ. देशपांडे, किशोर गोपाळ	द्वारा–श्री. गोविंद आत्माराम भोसुले, टिकेकर रोड, धंतोली नागपूर	किशोर ऐवजी किशोरी पाहिजे
३६	१४२	४०७५	श्री. शेख. एम्. एम्.	नागपूर महाविद्यालय, ७, स्टॉर्टा टाऊन, नागपूर १	७ स्टॉर्टा टाऊन ऐवजी ७ स्टॉर्की टाऊन पाहिजे
३७	१३२	३७२३	श्री. लांडगे, रमेश शरथ	एव्हरीडे बुकडिस्ट्रिब्युटिंग कंपनी, १६९ मेनरोड. सीताबर्डी, नागपूर १	शरथ ऐवजी शरद पाहिजे
३८	५२	९७७	श्री. गोडघाटे, रामदास मोतीराम	भीमनगर, पोष्ट अजनी, नागपूर ३	गोडघाटे ऐवजी गोळघाटे पाहिजे
३९	६४	१४१४	श्री. जोशी, मधुकर शंभूराव	६७, काचीपुरा, रामदासपेठ, नागपूर	६७ ऐवजी ५७ पाहिजे
४०	११४	३१४१	श्री. भावे, कमलाकर भास्कर	मानेवाडा, सोनी लेन सीताबर्डी, नागपूर	मानेवाडा ऐवजी भावेवाडा पाहिजे
४१	९१	२३७७	श्री. पगाडे, देवचंद रामजी	सुगत बुक डेपो, कमाल टी. चौक, नागपूर	पगाडे ऐवजी पगारे पाहिजे
४२	१०२	२७२७	श्री. पेंडके, अरुण नारायण	भोसला वेदशाळेजवळ, अयाचित रोड, नागपूर २	पेंडके ऐवजी पेंडसे पाहिजे
४३	१३२	३७३८	श्री. लालधाणी, वालचंदजी जुमेरामजी	द्वारा–कुमार मेडिकल स्टोअर्स गांधीबाग, २४ जनरलमर्चंट मार्केट, नागपूर २	जुमेरामजी ऐवजी जुमरोमलजी पाहिजे
४४	८५	२१८५	श्री. दोडके, देवदत्त गणपतराव	द्वारा–एफ्. जी. आय., अजनी, नागपूर ३	एफ्. जी. आय. ऐवजी एफ्. सी. आय. पाहिजे
४५	१०३	२७७५	श्रीमती प्रधान. सुहासिनी शशीकुजार	२२५ बजाजनगर, नागपूर	शशिकुजार ऐवजी शशीकुमार पाहिजे
४६	१७ (जि. वर्धा)	४० (आर्वी)	सौ. नारळे, घारूलता वसंतराव	स्टेशन रोड, आर्वी जि. वर्धा	घारूलता ऐवजी चारूलता पाहिजे
४७	१७ (जि. वर्धा)	३९ (आर्वी)	कु. देशपांडे, सुधा वसतराव	जोधालाल चाळ, स्टेशन रोड, आर्वी, जि. वर्धा	वसंतराव ऐवजी यशवंतराव पाहिजे
४८	१८ (जि. वर्धा)	५० (आर्वी)	श्रीमती पुरोहित, सुमनबाई रामचंद्र	स्टेशन रोड, आर्वी, जि. वर्धा	सुमतबाई ऐवजी सुमतीबाई पाहिजे
४९	१७ (जि. वर्धा)	४ (आर्वी)	श्री. आसोले, दौलत बाबूराव	महादेव वार्ड, आर्वी, जि. वर्धा	दौलत ऐवजी थोरात पाहिजे
५०	१७ (जि. वर्धा)	२७ (आर्वी)	सौ. दिवाकर, सुधाबाई वासुदेवराव	पालीवाल सदन, घोड्याचे मंदिरासमोर, आर्वी, जि. वर्धा	सुधाबाई ऐवजी सुशिलाबाई

५१	१८ (जि. वर्धा)	४५ (आर्वी)	श्री. पंड्या, मनश्याम	स्टेट बँक ऑफ इंडिया, आर्वी, जि. वर्धा	मनश्याम ऐवजी घन:श्याम पाहिजे
५२	१४७	४२३९	सौ. सातोरकर, विमलाताई सदाशिवराव	द्वारा :– श्री. स. अ. सातोरकर, डेप्यु. कलेक्टर, प्लॉट नं. एच. १, लक्ष्मीनगर, नागपूर–३	सातोरकर ऐवजी सातोकर पाहिजे
५३	९७	२५७९	सौ. पारखी, उषा रामचंद्र	एल्. बी. ३०, 'रियाज' एल्. आय. जी. कॉलनी नं. १, लक्ष्मीनगर, नागपूर–३	एल्. बी. ३० ऐवजी २७ पाहिजे
५४	९७	२५८२	श्री. पारखी, एम्. के.	द्वारा: – श्री. के. पी. पारखी, ३२४, अभ्यंकर नगर, नागपूर–३	पत्त्यात – के. पी ऐवजी के. बी. असे पाहिजे
५५	८८	२२८९	श्री. नाजपांडे, कमलाकर कृष्णराव	श्री. शं. ना. आर्वीकर यांचे घरी, कार्यालयाजवळ, महाल, नागपूर–२	पत्त्यात – कार्यालयाजवळ ऐवजी संघ कार्यालयाजवळ पाहिजे
५६	१०३	२७६२	श्री. पोळकट, पद्माकर नीळकंठ	द्वारा :– विठ्ठलराव घुले, संघ बिल्डिंगजवळ, महाल, वार्ड–१३, नागपूर	पोळकट ऐवजी पोळकर
५७	१३०	३६६५	श्रीमती राय, कौशल प्रसा	आनंद, रामदास पेठ, नागपूर–१	श्रीमती राय, कौशलप्रसा ऐवजी श्री. राय, कौशलप्रसाद असे पाहिजे
५८	१२५	३५२२	श्री. मोहाडीकर, गजानन शिवनाथ	नवीन मंगळवारी, वार्ड ४३, मेहदीबाग रोड, नागपूर–२	मोहाडीकर ऐवजी मोहाळीकर पाहिजे
५९	५६	११३५	श्री. चारपे, महादेव संभाजी	झुनके मोहल्ला, गोळीबार, नागपूर–२	चारपे ऐवजी चापरे पाहिजे
६०	७५	१८१५	श्री. दाणी, प्रभाकरराव	प्लॉट नं. २७०, ढेवरभाई मार्ग, नवी रामदास पेठ, नागपूर–१	श्री. दाणी प्रभाकरराव ऐवजी श्री. दाणी, संजय प्रभाकरराव असे पाहिजे
६१	४५	६९०	श्री. कोल्हटकर, अनिल दत्तात्रय	मोहोनी बंगला, राणी लक्ष्मी नगर, नागपूर–३	मोहोनी बंगला ऐवजी सोहोनी बंगला पाहिजे
६२	३१	१२०	श्री. आमटे, मनोरमा विनायक	लक्ष्मीनगर १९–ह–३, नागपूर	श्री. आमटे ऐवजी श्रीमती आमटे असे पाहिजे. तसेच पत्त्यात लक्ष्मीनगर १९–ह–३, नागपूर ऐवजी ई १९–३, राणी लक्ष्मीनगर नागपूर असे पाहिजे.
६३	१४७	४२४७	श्री. सावरे, पुरुषोत्तम नीळकंठराव	सुंभाची चाळ, धंतोली, नागपूर १	श्री. सावरे ऐवजी श्री. सांवरे असे पाहिजे.
६४	२८ (नागपूर अ)	४७	प्रा. पाठक, यादव मुकुंद	३३९, अभ्यंकर नगर, नागपूर	पत्त्यात–३३९ अभ्यंकर नगर ऐवजी 'सौंदर्य लहरी' २३७ अभ्यंकर नगर, नागपूर असे पाहिजे.

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	नाव	पत्ता	ऐवजी दुरुस्ती
	(नागपूर जिल्हा) इतर				
६५	३	१	श्री. ठेंगठी, गोविंद दिवाकर	मु. बोरगाव पो. धानला त. रामटेक जि. नागपूर	ठेंगठी ऐवजी ठेंगडी असे हवे.
६६	३०	५३	श्री. अवस्थी, कमला नारायण देवीसहायजी	ट्रान्सलेटर, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नागपूर	पत्त्यात—ट्रान्सलेटर रिझर्व बँक ऑफ इंडिया ऐवजी द्वारा—नुतन टाईप फोन्ड्री, महाराष्ट्र प्रेसच्या मागे, ओगले रोड, महाल, नागपूर असे पाहिजे.
	(भंडारा जिल्हा)				
६७	८	५	श्री. ठोकळ, सखारामपंत दत्तात्रय	मॅनेजर, राजलक्ष्मी टॉकीज, गोंदिया, जि. भंडारा	सखारामपंत दत्तात्रय ऐवजी दत्तात्रय सखारामपंत असे पाहिजे.
६८	८	११	श्री. वाडी, रावजीपंत प्रभाकर	रेलटोली, गोंदिया, जि. भंडारा	रावजीपंत प्रभाकर ऐवजी प्रभाकर रावजीपंत असे पाहिजे.
६९	८	१२	श्री. वाडी, रावजीपंत मधुकर	रेलटोली, गोंदिया, जि. भंडारा	रावजीपंत मधुकर ऐवजी मधुकर रावजीपंत असे पाहिजे.
	(वर्धा जिल्हा)				
७०	२१	५१ व ५२	श्री. पांडे, प्रभाकर नीळकंठराव	डॉ. वादेकरांचा वाडा, वार्ड ४, वर्धा	क्रमांक ५१ व ५२ वर नाव दोनदा आले आहे त्यापैकी क्रमांक ५२ रद्द समजावा.
७१	२२	६५ व ७०	श्री. भुते; प्रभाकर गंगाधरराव	रामनगर, वर्धा	पुनर्मुद्रित झाले ते क्र. ६५ ठेवून क्र. ७० वरील नाव रद्द समजावे.
७२	११५	३१८९	श्री. भिलवडीकर	द्वारा मा. गं. चिटणीस यांचे वाड्यात, चिटणवीसपुरा, नागपूर २	श्री. भिलवडीकर ऐवजी श्री. भिलवडीकर, सीतारामपंत असे पाहिजे. तसेच पत्त्यात चिटणीस यांचे वाड्यात ऐवजी चिटणवीस यांचे वाड्यात असे पाहिजे.
७३	११८	३२६५	श्री. मसे, प्रभाकर त्र्यंबक	श्रद्धानंद पेठ; नागपूर ३	श्री. मसे ऐवजी म्हसे असे पाहिजे.

७४	२७	२६	श्री. जहागीरदार, अरविंद	१०९०, डॉ. य. खु. देशपांडे यांचे घरी, धरमपेठ एक्स्टेंशन, नागपूर १	श्री. जहागीरदार ऐवजी जागीरदार असे पाहिजे
७५	८८	२२८९	श्री. नाजपांडे, कमलाकर कृष्णराव	श्री. शं. ना. आर्वीकर यांचे घरी, संघकार्यालयाजवळ, महाल, नागपूर २	पत्ता श्री. अंभईकरचे घरी, राजविलास टॉकीजचे मागे, महाल, नागपूर २ याप्रमाणे पत्ता आहे
७६	२१ (वर्धा जिल्हा)	२५	श्री. जवपेंड, केशवराव	नाथेक यांची चाळ, वार्ड ४ वर्धा	जवपेंड, केशवराव ऐवजी जवदंड भैय्या केशवराव असे पाहिजे तसेच पत्त्यात नाथेक ऐवजी नाईक पाहिजे
७७	१३७	३९००	श्री. वासनिक, शेषकान्त सहादेवजी	द्वारा जगदीश बडगे बारशेनगर, पाचपावली, नागपूर	वासनिक ऐवजी वासनिककर असे पाहिजे
७८	८६	२२००	श्री. धर्माधिकारी, य. खुं.	द्वारा श्री. वि. स. गोखले, क्वा. नं. एफ–१०१ अजनी, नागपूर	य. खुं. ऐवजी य. धुं. असे पाहिजे
७९	९४	२४६२	श्री. पाकी, माधव लक्ष्मण	साठेंचा वाडा, मोदी नं. १ सीताबर्डी, नागपूर	पाकी ऐवजी पत्की पाहिजे
८०	१५०	४३४८	सौ. सोनक, नारायण दिनकरराव	प्लॉट नं. ५४, काछीपुरा, रामदासपेठ, नागपूर	सौ. सोनक नारायण दिनकरराव ऐवजी सौ. सोनक, तारा दिनकरराव पाहिजे
८१	४१	५१४	श्री. कुन्हेकर, दिगंबर लक्ष्मण	शिक्षक, बडनेरा रोड, नागपूर	नागपूर ऐवजी अमरावती पाहिजे
८२	४३	५९१	श्री. केतपूरे, गोविंदराव वासुदेवराव	प्लॉट नं. १४, बावने बिल्डिंग, बजाजनगर, नागपूर	केतपूरे ऐवजी केकतपुरे पाहिजे
८३	४२	५५१	श्री. कुळकर्णी, एन्. पांडुरंग	विद्यानगरी, उमरेड मार्ग, क्वा. नं. ५ बिं. सिटी कॉलेज क्वार्टर्स, उमरेड रोड, नागपूर	एन्. पांडुरंग ऐवजी मदन पांडुरंग पाहिजे
८४	१२९	३५१५	श्री. मोहरील, गोविंदराव गोविंदराव	४५२, नाईक रोड, महाल, नागपूर	श्री. मोहरील, गोविंदराव गोविंदराव ऐवजी श्री. मोहरील, श्याम गोविंदराव पाहिजे
८५	१३५	३८४६	श्री. वळतकर, कृष्णा	द्वारा रामकृष्णा जामगडे, सतरंजीपुरा, सुभाष पुतळ्याजवळ, नागपूर २	श्री. वळतकर, कृष्णा ऐवजी श्री. घळतकर, कृष्णा गणपतराव पाहिजे
८६	१०६	२८७५	श्री. बहुडाळ, रावन्द्र वसंतराव	सी. २२–३, रविनगर, नागपूर १	श्री. बहुडाळ, रावन्द्र वसंतराव ऐवजी श्री. वल्लाळ, रविन्द्र वसंतराव पाहिजे

अनुक्रमणिका

क्रमांक	यादीतील पृष्ठ	यादीतील अनुक्रम	नाव	पत्ता	ऐवजी दुरुस्ती
८७	५७	११७५	श्री. चितळे, कृष्णराव वामनराव	३२२, शंकरनगर, नागपूर १	चितळे ऐवजी पितळे पाहिजे
८८	११३	३१०८	श्री. मंदागे, महादेव राजाराम	१७०, गांधीनगर, नागपूर	मंदागे ऐवजी भंदीर्गे पाहिजे
८९	९१	२३७८	श्री. पंचवटी, मधुसूदन लक्ष्मणराव	द्वारा श्री. मनोहर म्हैसाळकर ओक यांचा बंगला, धंतोली, नागपूर	पंचवटी ऐवजी पंचवटीकर पाहिजे
९०	११९	३३००	डॉ. हैसाळकर, राम	२८, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, अजनी पो. नागपूर ३	हैसाळकर ऐवजी म्हैसाळकर पाहिजे
९१ (यवतमाळ जिल्हा)	१५	१११	श्री. मुरक्कर, नारायण कृष्णाजी	वार्ड १५ वणी, जि. यवतमाळ	मुरक्कर ऐवजी मुरसकर असे पाहिजे
९२	१३८	३९४७	श्री. वैद्य, बाबू काळूराम	१६०, न्यू रामदास पेठ, नागपूर	पत्यात १६०, न्यू रामदासपेठ नागपूर ऐवजी १२०५/४, शिवाजीनगर, पुणे ४ असे पाहिजे

सभासद यादीतून खालील नावे गळाली आहेत

(ब-विभाग)

१ प्रा. कोकजे; अनंत केशव
बी /२, रविनगर, नागपूर

२ डॉ. पारवे; दादाराव सीताराम
द्वारा—डॉ. लीला गोडघाडे
४५१, हनुमाननगर, नागपूर ३

३ श्री. पगारे, देवचंद रामाजी
सुगत बुकडेपो, कमाल टॉकीज चौक, नागपूर

४ डॉ. सौ. मोने, मंदाकिनी
ए ८/२; रविनगर; नागपूर

५ श्री. मोरैय्या, श्यामसुंदर लक्ष्मीनारायण
एम्प्रेस मिल्स रोड नं. १, नागपूर

६ श्री. मोकाशी, वसंत शांताराम
एम/२, यशवंतनगर, नागपूर

७ श्री. ढगमवार, किशोर मारोतराव
वझलवारांचा वाडा, सोनीलेन,
सीताबर्डी, नागपूर १

८ श्री. चौधरी, करतारसिंह टेकचंद
५६६; वसंत निवास,
जलालपुरा, पोलिस चौकीजवळ, नागपूर

९ सौ. कानेटकर, नलिनी प्रभाकरराव
४४ अ; गोकुळपेठ, नागपूर २

१० श्री. पाठक, वसंत रामकृष्ण
नबाबपुरा, पातुरकर राममंदिराच्या
मागच्या बाजूला, नागपूर २

११ श्री. नाईक, वसंत चंद्रशेखर
रामवाडी; रणभोर चाळ,
त. मु. पो. माळेगाव—कॅम्प, जि. नाशिक

१२ श्री. खोत, शरद स्कंद
भुसारी वाडा; हिन्दीनगर, वर्धा

१३ श्री. जोशी, भास्कर आत्माराम
खटी भवन, नागजीभाई—टाऊन,
सीताबर्डी, नागपूर

१४ श्री. सूर्यवंशी, यादवराव आप्पाराव
मु. पो. जांब—बाजार, पुसद, जि. यवतमाळ

१५ श्री. दांडेकर, पांडुरंग विष्णु
आपटे बिल्डिंग, ४१
पंडितारमाबाई रोड, मुंबई ७

१६ श्री. दांडेकर, कमळाबाई पांडुरंग
आपटे बिल्डिंग, ४१ पं. रमाबाई
रोड, मुंबई ७

१७ श्री. परांजपे, मोरेश्वर विष्णु
३४, परांजपे बंगला, म. गांधी रोड;
विलेपार्ले, मुंबई ५७

१८ सौ. परांजपे, सरस्वतीबाई मो.
३४ परांजपे बंगला, प. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

१९ श्री. परांजपे; भालचंद्र विष्णु
३४ परांजपे बंगला म. गांधी रस्ता,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२० सौ. परांजपे, इंदिराबाई भा.
३४, म. गांधी रस्ता,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२१ श्री. परांजपे; माधव भालचंद्र
३४, म. गांधी रस्ता,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२२ सौ. परांजपे, मीरा माधव
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२३ श्री. परांजपे, गोविंद दिनकर
३४, परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२२ श्री. परांजपे, शंकर विष्णु
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२५ सौ. परांजपे, शकुन्तला शंकर
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२६ श्री. परांजपे, वसंत शंकर
३४, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२७ श्री. परांजपे, दत्तात्रय विष्णु
३४ परांजपे बंगला, म. गाधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२८ सौ. परांजपे, निर्मला दत्तात्रय
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

२९ श्री. परांजपे, पुरुषोत्तम विष्णु
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

३० सौ. परांजपे, पुष्पा पुरुषोत्तम
३४, म. गांधी रस्ता,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

३१ श्री. सप्रे, अनंत दत्तात्रय
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

३२ सौ. सप्रे, सुप्रिया अनंत
३४ परांजपे बंगला, म. गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

३३ श्री. आकांत, कृष्ण गोपाळराव
द्वारा माझे वाचनालय, सिव्हिल लाईन्स,
गोंदिया, जि. भंडारा

३४ श्री. क्षिरे, वसंत विश्वनाथ
सी. एन्. विसेन यांचे घरी,
श्रीसरस्वती विद्यालयाचे जवळ,
आनंदनगर, गोंदिया, जि. भंडारा

३५ श्री. मातुरकर, वसंत हिरालाल
आनंदनगर, गोंदिया, जि. भंडारा

३६ श्री. पुराणकर, मधुकर सदाशिवराव
चौरासिया बिल्डिंग, आनंदनगर,
गोंदिया, जि. भंडारा

३७ श्री. बार्करे, सच्चितानंद
हेडमास्तर, न्यू इंग्लिश हायस्कूल, वर्धा

———

डॉ. यशवंत खुशाल देशपांडे



विदर्भातील अग्रगण्य इतिहास संशोधक, ग्रंथकार आणि विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष यांना ता. २०–११–१९७० रोजी नागपूर येथे वयाच्या ८६ वर्षी देवाज्ञा झाली. हे कळवण्यास आम्हास अत्यंत दुःख वाटते.

अनुक्रमणिका

दूरध्वनी क्रमांक २२५२९

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिती, नागपूर

उत्तर अंबाझरी मार्ग नागपूर–१.

श्री. केंद्राधिकारी, आणि विद्यार्थी यांचेकरिता आवश्यक माहिती

प्रस्तुत पत्रकाद्वारे आपणास विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश:—मराठी भाषा आणि वाङ्मय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील **अ–मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार** करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. १५६९–३३६७३ म. दि. २४ जुलै १९६९ च्या अन्वये अ–मराठी भाषिकांसाठी घेण्यात येणाऱ्या **मराठी प्रवीण व मराठी प्राज्ञ** ह्या नवीन परीक्षांना अनुक्रमे मराठी निम्नस्तर व मराठी उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष परीक्षा म्हणून मान्यता दिली आहे. (‘ मराठी प्रवीण ’ व ‘ मराठी प्राज्ञ’ परीक्षांचे स्थानिल केन्द्रांची व्यवस्था फक्त विदर्भ साहित्य संघातच राहील व वरील दोन्ही परीक्षांचे वर्ग संस्थेतर्फे चालविण्यात येतात. विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.)

फेब्रुवारी १९७१ पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परीक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२. सूचना आणि विनंती.

आपण केन्द्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात येईल. तसेच अ–मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३. आगामी फेब्रुवारी १९७१ सत्राच्या **परीक्षा शनिवार, दिनांक १३ आणि रविवार, दिनांक १४ फेब्रुवारी १९७१ ला घेण्यात येतील.**

४. नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेस बसविले तरच केंद्र मान्यता देण्यात येईल असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी–आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केंद्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परीक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केंद्रातून **दिनांक १५ जानेवारी १९७१ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केंद्रीय कार्यालयाकडे दिनांक २० जानेवारी १९७१ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी.** तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे, ही विनंती.

ग. स. देशपांडे

दिनांक ३० डिसेंबर ७० संचालक, परीक्षा समिती, वि. सा. संघ

प्रकाशक व मुद्रक : **मा. नी. गलगलीकर,** सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१
मुद्रणस्थळ : **नारायण मुद्रणालय,** धनतोली नागपूर–१

अनुक्रमणिका